म. ग्रं. सं. ठाणें

विषय

नाटक

संग्रहालय क्रमांक

लेखक त्र्यं. र. मुथोळकर

सन

पुस्तकाचें नांव सवाई माधवराव

६३०

नाटक

ना. ला. ३०

ग्रं. ६३८
ता. १४-१०-२८

ग्रं. ३

(६३८)

# A DRAMA

OF

# SAVAYI MADHAVARAO PESHVE.

COMPOSED BY

VENKAT RUNGO KATTI.

*( Canarese Translator Educational Department.)*

---

## सवाई माधवरावांचें नाटक.

मराठी ग्रंथ संग्रहालय

व्यंकटरंगो कट्टी मुधोळकर.

( कानडी ट्रान्सलेटर निसबत विद्याखातें. )

यांनीं

रचिलें

तें

बेळगांव समाचार छापखान्यांत छापिलें.

( सन् १८६७ च्या आक्ट २५ प्रमाणें रजिस्टर केलें आहे. )

सन् १८७९.

# प्रस्तावना.

या देशांत आपल्या लोकांचीं जीं मोठ मोठीं राज्यें होऊन गेलीं, त्यांत पेशव्यांचें राज्य शेवटचें असून, त्यांतही सवाई माधवरावांची कारकिर्द विशेषेंकरून वर्णन करण्याजोगी झाली. या कारकिर्दींत पश्चिमेकडील भागांत इंग्लिश लोकांचें तादृश प्राबल्य नव्हतें, आणि दिल्लीचें सार्वभौम राज्य बहुतेक माहादजी सिंद्यानें आकलन करून टाकिलें होतें. या शिवाय निजामअली आणि टिपू सुलतान, जे पेशव्यांचे बलिष्ट शत्रु, तेही या काळच्या शूर सरदारांनीं निस्तेज केले. तेव्हां सवई माधवरावांच्या वेळेस सर्व हिंदुस्थनात पेशव्यांचें राज्य पहिल्या प्रतीचें झालें होतें असें ह्मणण्यास चिंतानाहीं. याखेरीज आणखी एक असें कीं, या कार किर्दिंत पेशव्यांच्या दरबारीं ज्या मोठमोठ्या गोष्टी घडल्या त्या फार मनोवेधक आणि स्मरणांत ठेवण्यासारिख्या आहेत, आणि त्या घडून अद्यापी नव्वद वर्षें पुरीं झालीं नाहींत. याजकारितां या कारकिर्दीचें वर्णन यथामतिने नाटकरूपानें करून माझ्या देशबांधवांच्या नजरेसमोर आणावें या हेतूनें मी हा यत्न केला आहे.

वर लिहिल्या प्रमाणें खरा इतिहासच वाचकांच्या डोळ्यांपुढें आणण्याचा माझा मुख्य उद्देश असल्यामुळें यांतील मुख्य मुख्य गोष्टी इतिहासांतूनच घेतल्या आहेत. कथासंदर्प दाखविण्याकरितां योजिलेले भाग व आनुषंगिक वर्णनें हीं माझ्या पदरचीं आहेत हें उघडच आहे. याशिवाय केवल वाचणाऱ्यांच्या मनोरंजनार्थच कांहीं लहान लहान गोष्टी जाग जागीं घातल्या

आहेत; त्या काढून टाकिल्याअसतां कथेचा विच्छेद होतो, किंवा-ग्रंथाच्या पूर्णतेस न्यूनता येते असें नाहीं. तत्रापि पहिल्यापासून शेवटपर्यंत एकच चेऱ्हाट लावण्यापेक्षां मध्यें मध्यें थोड थोडा फेर फार दाखविणें बरें वाटल्यावरून तसें केलें आहे.

परंतु एक गोष्ट येथें सांगितली पाहिजे. ती ही कीं, पहिल्या दोन अंकांतल्या हकीगती घडल्या तेव्हां माधवराव केवळ अल्प वयी असून ते प्रौढावस्थेंत होते असें या ग्रंथांत दाखविलें आहे. याचें कारण असें कीं ते ग्रंथांतले मुख्य नायक असून त्यांस एकीकडे कोपऱ्यास बसवून उगाच पाल्हाळ लावीत बसणें हें मला बरोबर दिसलें नाहीं. तत्रापि या दोन अंकांत कोणत्या ही कृत्यांत ते पुढारी होते असें दाखविलें नाहीं. हे दोन अंक पुढील तीन अंकांचें अनुसंधान ह्मणून समजलें तरी चिंता नाहीं.

मी इंग्रजींत किंवा संस्कृतांत चांगलीं नाटकें फारशीं वाचलीं नाहींत; मराठींत नवा ग्रंथ रचण्याचा यत्न या पूर्वीं कधीं केला नाहीं; आणि मराठी भाषा माझी जन्म भाषाही नव्हे. असें असून मी प्रथमच हें नाटक रचण्याचा यत्न केला हें कितीं एकांस अप्रयोजक वाटेल यांत संशय नाहीं. परंतु माझ्या मनाची कांक्षा तशी झाल्यामुळें मी निरुपाय झालों, येवढ्या पेक्षा माझ्यानें विशेष कारण सांगवत नाहीं. तत्रापि माझ्या मध्यें किती ही न्यूनता असल्या तरी त्यांमुळें या ग्रंथास न्यूनता असलीच पाहिजे असें नाहीं. याज करितां रसिक विद्वज्जनांस माझी विनय पूर्वक प्रार्थना अशी आहेकीं, त्यांनीं निदान एक वार तरी हे पुस्तक हातांत घेऊन वाचावें. यांत गुणलेश असेल

त्याचा स्वीकार करावा, आणि कोठें कांहीं शुद्ध करितां ये-
ण्या जोगे दोष आढळतील तर ते मला कळवावे.
बेळगांव ता० २५ मे १८७१.

ग्रंथ कर्ता.

ग्रं. क्र. ३
३१
सं.ग्रं. ५३५
१५-१०-२५
मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. २२७
ठाणे सन १८

अंक पहिला

पात्रें.

सवाई माधवराव पेशवे ........................पुण्याचे राजे.

नाना फडणीस, सखाराम बापु ....................प्रधान.

हरीपंत फडके, परशुरामभाऊ पटवर्धन................सरदार.

आप्तन...................................इंग्रजांचा वकील.

भास्करजी..................................त्याचा कारकून.

रामजी पाटील..............................सिंद्याचा सरदार.

काळू......................................त्याचा हुजरा.

गणपतराव..................................नानाचाकारकून.

सदोबा...........................तोतया सदाशिवराव भाऊ

भवानराव, चिमाजी................................देवडीवाले.

सवाईमाधवराव पेशवे

## प्रवेश १

### पेशव्यांची कचेरी. (पुरंदर)

(माधवराव पेशवे, नाना फडणीस, सखाराम बापू, हरिपंत फडके प्रवेश करितात. पेशवे मुख्य स्थानीं बसतात, व बाकी सर्व आप आपल्या जागीं बसतात.)

**पेशवे**–(तिघांस) कां? कसा काय विचार ठरवितां? आतांचा समय फार कठिण आला आहे.

**सखा**–होय तें तर खरें; परंतु पाहिजे तशी युक्ति लढवितां येईल. श्रीमंतांनीं कांहीं काळजी करूनये.

**हरी**–अॅं, कशाला काळजी; आणि युक्ति तरी कशाला बापू. पेशव्यांची तरवार अटकेपलीकडे चमकल्ये. पाहिजेत तितके शत्रु येऊंदेत; हा (उरास हात लावून) चाकर जींवंत आहे तों पर्यंत परचक्राची काळजी करणे नलगे.

**पेशवे**–शाबास फडके! तुमची हिंमत अशीच आहे, हें मी पक्कें समजतों. परंतु मला वाटतें कीं, आपणांस चोहोंकडून शत्रु लवकरच दिसूं लागणार. तथापि मी ही त्या गोष्टीला झणजे भ्यालों आहे असा अर्थ नाहीं. तर तसा प्रसंग आला असतां आपणांस फार यातायात पडणार; आणखी हजारो गरीबें उभय पक्षीं व्यर्थ प्राणांस मुकतील. या गोष्टीकडे आपण विशेषेंकरून लक्ष्य दिलें पाहिजे. याजकरितां युद्ध प्रसंग कमी करवेल तितका कमी करण्याची तजवीज योजावी हें मला बरें दिसतें, कां नाना?

**नाना**–(हात जोडून) होय सरकार, माझें ही मत तसेंच आहे. श्रीमंतांच्या पदरीं फडके, पटवर्धन, रास्ते यां सारिखे मोठे

मोठे पराक्रमी योद्धे अद्यापि आहेत यांत संशय नाहीं. परंतु प्रसंग कसला आहे हें पाहिलें पाहिजे. आपले गृह कंटक दादा साहेब एकतर शत्रु आहेतच. त्यां शिवाय इंग्रजांनीं कांहीं कारण नसतां त्यांचा पक्ष घेतला; तेव्हां तेही शत्रूंतच मोजिले पाहिजेत. सिंदे व होळकर हे गादीचे विश्वासू चाकर असून, इकडून कांहीं कारण घडलें नसतां त्यांनीं बेमानपणानें इंदूर मुकामीं दादा साहेबांस आपल्या लष्करांत घेतलें, आणि त्यांस आश्रय दिला. नागपुरच्या भोंसल्यानें नुकतींच जीं चिन्हें दाखविलीं त्यांच्यावरून त्याच्याही आंगांत कांहीं मगरूरी आल्याचा रंग दिसतो. इकडे निजाम अलीतर आपला वंश परंपरेचा शत्रु आहेच. सिंदे व होळकर यांचा रंग बदलल्याचा पाहून तो दादा साहेबांचा पाटलाग करण्याचें सोडून तुर्त स्तब्ध राहिला आहे; लवकरच आतां तो आह्मांवर उलटणार. त्याच्या बंदोबस्ताची तजवीज प्रथम पाहिली पाहिजे. आतां आमच्या दरबारची स्थिति पाहिली तर तीही असावी तशी नाहीं. मोरोपंत फडनीस, बजाबा पुरंधरे, वगैरे मोठ मोठे मसलती आणि छातीचे लोक दादा साहेबांकडे जाऊन मिळाले. तेव्हां या सर्व गोष्टींचा विचार नकरितां आह्मी आमच्या तरवारीच्या भरंवशावर स्वस्थ झोंपा घेऊं लागलों तर आयते वेळेस कदाचित् गोत्यांत पडूं. आतां भरंवशाचे शूर तरी आपणांजवळ कितीसे राहिले आहेत? मी ज्या दोघां तीघांचीं नावें घेतलीं, तेवढेच कायते. ते एकीकडे गुंतून राहिले असतां दुसरीकडे प्रसंग आलातर कोणाच्या तोंडाकडे पाहात बसावें? तितकें कशाला? नुक-

तीच मुंबईजवळ समुद्रांत इंग्रजांशीं जी छोटीशी लढाई झा-
ली, तिचा परिणाम काय झाला? असेंच वरचेवर होऊं ला-
गलें तर पुढें गोष्ट कोणत्या पल्याला पोंचेल हें पाहिलें
पाहिजे.

**हरी**—काय नाना, ती कसली लढाई, बुदबळांतली. नागझरींतलीं बेडकें दिवसांतून शें पन्नास तसल्या लढया मारीत असतात.

**सखा**—तें कसेंही असो, पण नानाचा विचार बराबर आहे. आग लागले वेळीं विहीर खणीत बसणें हें शहाण्याचें काम नव्हे. (नाना कडे वळून) मग नाना, यावर तुमचा विचार कांय ठरला?

**नाना**—माझ्या एकल्याचा विचार काय उपयोगी? मुख्य श्री-मंतांची आज्ञा होईल तो विचार खरा.

**पेशवे**—मला असें वाटतें कीं, सिंदे व होळकर यांस तुर्त त्यांच्या मनास वाटेल त्याप्रमाणें वागण्यास मोकळीक द्यावी. माहा-दजी पक्का कारकून आहे, आणि त्याजवर माझा भरंवसाही चांगला आहे. परंतु यासमयीं त्या दोघांचें आर्जव करणें मला बरोबर दिसत नाहीं. त्यांच्या वांचून पेशव्यांचें संस्थान कसें चालतें हें त्यांस दाखविलें पाहिजे. पण मुधोजी फार संभावित आणि एक चालीचा मनुष्य आहे. त्याला कां राग आला आहे हें मला माहीत आहे; आणि तो गैरवाजबी ना-हीं. याजकरितां त्याचें समाधान होण्याजोगें पत्र लिहून जासूद पाठविला असतां उद्यां तो लश्कर सुद्धां पुण्यास येऊन हाजर होईल. याशिवाय गायकवाड जे दोघे भाऊ निरर्थक आपसांत घरीं भांडत बसले आहेत, त्याचें भांडण

युक्तीनें मिटवून त्या उभयतांस इकडे बोलवावें ह्मणजे झालें.

हरी—होय, ही युक्ति मला बरी दिसत्ये.

सखा—साधली तर बरी खरी. पण साधेलशी मला वाटत नाहीं. फतेशिंग व गोविंदराव गायकवाड यांचा तंटा इंग्रजांनीं मिटविला ह्मणून मी कालच ऐकिलें. तेव्हां ते तत्पक्षीय झाले. मुधोजीवरही इंग्रजांनीं जाळें पसरल्याचें माझ्या ऐकिवांत आहे. तेव्हां सिंदा व होळकर यांचें आर्जव करणें जसें बरोबर नाहीं, तसें या तिघांचें ही आर्जव करणें बरोबर नाहीं असें मी समजतों. तेव्हां हा मार्ग धरणें बरोबर दिसत नाहीं. (पेशव्यांस हात जोडून) माफी असावी.

पेशवे—माफी कशाची बापू, तुमचें ह्मणणें आगदी बरोबर आहे.

नाना—होय बापूंचें ह्मणणें मी ही मान्य करितों. आणखी अशा प्रसंगीं नवे लढाऊ लोक जमवून खर्च व खटपट वाढवून युद्धाची तयारी करित बसण्यापेक्षां मुळीं युधाचेच प्रसंग कमी होतील असे कांहीं उपाय योजणें बरें ह्मणून आतां श्रीमंतांनीं फर्माविलेंच आहे. तेंच आपण पाहिलें पाहिजे. सांप्रत चोहोंकडून सर्व सरदार लोक जरी आपणांस प्रतिकूळ दिसतात, तरी आपले मुख्य शत्रु ह्मटले ह्मणजे दोघेच. एक दादासाहेब अथवा तत्पक्षी इंग्रज लोक, आणि दुसरा निजाम अली. बाकी आमचे मराठे सरदार आह्मांस कितीही प्रतिकूळ झाले तरी इकडून कांहीं कारण उद्भवल्याशिवाय व एकादा बलाढ्य शत्रु तोंडीं उभा राहाण्यास तयार झाल्याशिवाय ते आह्मांवर कधींही शस्त्र धरणार नाहींत. आतां पेशवाईची गादी रिकामी करून दिल्यावांचून दादासाहेब तर

उगीच बसणार नाहींत हें उघडच आहे. तेव्हां निजाम अली तुर्त युक्तीनें अनुकूळ करून घ्यावा हेंच मला बरें दिसतें. ह्मणजे अर्धा उपद्रव कमी झाला. मग दादासाहेब व इंग्रज राहातील, ते राहूंदेत बिचारे. नेहेमी एकादा प्रतिकक्षी असल्याशिवाय आह्मांसही चैन पडत नाहींच.

**पेशवे**—पण तो मुसलमान अनुकूळ होतो कसा?

**नाना**—त्याला इतकाच उपाय. गुदस्त सालीं आह्मी जो त्याचा अठरा लाखाचा मुलूख घेतला आहे, तो त्याचा त्यास तुर्त परत द्यावा ह्मणजे झालें.

**हरी**—काय नाना, काय हें! तुह्मी इतक्यांत इतके भ्यालेत? कढी भाताचा विचार खरा हा! हातीं सांपडलेला येवढा मोठा मुलूख त्या लुच्चाला परत द्यावा? मला ही गोष्ट बिलकूल पतकरत नाहीं.

**नाना**—फडके, तुह्मी यावेळेस दोन शिव्या दिल्या तरी मला त्याचा राग नाहीं. या प्रसंगी हाच मला सुलभ आणि योग्य उपाय दिसतो. आपली गरज झाली ह्मणजे त्या दाढीवाल्याच्या तोंडांत मारून पुनः दुपट मुलूख हिसकून घेण्याला किती उशीर लागणार?

**सखा**—हें खरें आहे; एकंदरीवरून पाहातां नानाची मसलत मी ही पसंत करितों. कुतऱ्याला भाकरीचा तुकडा दाखवूनच घर राखायाला लाविलें पाहिजे. परंतु श्रीमंतांची आज्ञा होईल तसें.

**पेशवे**—काय, बापू, तुह्मां उभयतांच्या विचाराबाहेर मी आहे काय? तुह्मांस मान्य तेंच मलाही मान्य. पण फडक्यांची

संमति या कामांत दिसत नाहीं.

नाना—त्यांची संमति मी कशी तरी घेतों. त्यांच्या पायां पडतों पाहिजे तर.

हरी—मीही "अष्टपुत्रा सौभाग्यवतीभव" ह्मणेन पाहिजे तर.

पेशवे—(तोंडाला पदर लावून हांसतात) पण फडके, थट्टा पाठी-मागून. हा समय नव्हे.

हरी—बरें तर मग, यजमानांची आज्ञा होईल तसें.

पेशवे—ठीक आहे तर. नाना, होऊंद्या तयारी. जाऊंद्या पत्र आतांचे आतां; उशीर नको.

नाना—आज्ञा, (असें ह्मणून कलमदान उघडून पत्र लिहितो, आणि सर्वांस वाचून दाखवितो.)

"कलमी ऐसाजे, इकडून कांहीं सूचना नसतां आपण आप
"खुषीनें दादासाहेबांचा पाठलाग केला, व त्यांस बरेंच लांब
"हांकून लाविलें. हें पाहून आह्मी फार खुष आहों. सबब
"गुदस्त सालीं जो अठरा लाखांचा मुलूख आपला आह्मां-
"कडे आला, तो आपणांस परत देण्याचें ठरवून त्याबरहुकुम
"आजच ताकीदी रवाना केल्या आहेत. तर याउपर हालीं
"प्रमाणेंच आह्मां उभयतांची दोस्ती कायम राहून, आह्मां
"पैकीं एकांचा दोस्त अगर दुसमान असेल तो दुसऱ्याचाही
"दोस्त अगर दुसमान आहे, असें मानून वहिवाट ठेवण्याचा
"इकडून ठराव झाला आहे. त्याच प्रमाणें आपणांकडून ही
"वहिवाट राहील अशी फार फार उमेद आहे."

सखा—बस्, बस्, येवढेंच.

पेशवे—या पेक्षां जाजती लिहिण्याची गरज नाहीं. (असें ह्मणून

नानाच्या हातांतून कागद घेऊन त्यावर शिक्का मोर्तब करून परत देतात,) कोणाबरोबर रवाना करितां?

**सखा**—आमचे गोविंदराव काळे याकामावर नेमावे. ते फार हुषार आहेत.

**नाना**—होय, मी ही त्यांनांच योजिलें आहे. आतां तयारी करून त्यांची रवानगी करितों.

**पेशवे**—बरें तर; आपलें काम संपलें.

(सर्व निघून जातात.)

---

## प्रवेश २

### पेशव्यांची कचेरी. (पुरंदर)

(सखारामबापू, नाना फडनीस, हरीपंत फडके, परशुरामभाऊ पटवर्धन वगैरे कारभारी व मुत्सद्दी लोक प्रवेश करितात)

**परशु**—वास्तविक पाहिलें असतां आमच्या घरगुती तंट्यांत इंग्रजांचा कांहीं संबंध नाहीं. ते मोठे तंटेखोर लोक दिसतात.

**नाना**—जरा थांबा, हा आजचा येवढा तह होऊंद्या. मग मी सांगतों.

**हरी**—होय; ह्मणजे त्यांची शेंडी आपल्या हातीं सांपडली. मग जरा कोठें निमित्त सांपडलेंकीं, त्यांच्या हाडांचे चक्रांकित झाले ह्मणून समजा.

**सखा**—असो, ह्मणा; पुढचें पुढें पाहूंया. पण तो वकील अजून कोठें दिसत नाहीं!

**नाना**—तो केव्हांच आला आहे; बाहेरच्या दिवाणखान्यांत बसला आहे.

[library stamp]

हरी—बलावा तर बलावा; मुखडा तरी बघूंद्या.

नाना—रखमाजी, जारे, त्या गोऱ्याला बलाव.

रख—जी, हुकुम (असें ह्मणून जातो आणि इंग्रजांच्या वकीलाला घेऊन येतो. तो वकील सर्वांस सलाम करून एका बाजूला बसतो, व त्याच्या मागें त्याचा कारकून बसतो)

नाना—स्वारी अजून कां येतनाहीं? जारे रखमाजी, जा; स्वारी बाहेर निघाली कीं नाहीं बघून ये (रखमाजी जातो)

सखा—आतां येतील येण्याचा मात्र अवकाश; बाकीची तयारी झालीचआहे. (वकीलाकडे पाहून) क्यौं, वकीलसाहेब, आपकी अबी कुच् तक्रार रही?

वकील—साहेब, कुच् नहीं; आपने सरकारकी मंजुरी मिलेसो हो गय.

(इतक्यांत रखमाजी येतो)

रखमा—(हात जोडून) सरकारस्वारी आली महाराज. (इतक्यांत भालदार ललकारतो, सर्व उठून उभेरातात, व पेशवे दोहों बाजूंनीं नमस्कार वमुजरे घेत आपल्या स्थानीं येऊन बसतात)

पेशवे—कां बापू, नाना, (वकीलाकडे बोट करून) यांचीं सर्व कलमें ठरलीं नां?

सखा. व नाना—(हात जोडून) होय सरकार.

पेशवे—त्यांचीं जीं तक्रारीचीं दोन कलमें होतीं, त्यांचा निकाल कसा केला?

सखा—(हातजोडून) सरकारच्या अभिप्रायाप्रमाणेंच झाला.

पेशवे—हं, त्यांची संमति पडली?

नाना—(हातजोडून)—होय सरकार, पडली.

**हरीपंत**–(हलकेंच) पडली कसची, पाडली ह्मणा.

**पेशवे**–त्यांचें नांव काय? विसरलों.

**वकील**–(उभा राहून हात जोडूत) सरकार, नौकरकूं आप्‌टन् कहटा

**पेशवे**–आछा, तुमकूं हमारी जबान मालूम पडती?

**आप्‌टन्**–जी सरकार, थोडे थोडे समजतो.

**पेशवे**–कीधर शिका?

**आप्‌टन्**–सरकार, दो बरसके पीछे नौकर बोंबेमे था; ऊदर मरेठी बाटकी स्टडी नौकरनें जार, जार, कीय.

**पेशवे**–काय! स्तडी! स्तडी काय ह्मणता तें?

**भास्करजी**–(उभा राहून हात जोडून) सरकार, स्तडी ह्मणजे अभ्यास.

**पेशवे**–स्तडी ह्मणजे अभ्यास, स्तडी ह्मणजे अभ्यास. स्तडी, स्तडी (भास्करजीकडे वळून) पण हे कोण?

**सखा**–(हात जोडून तेवकील साहेबांचे कारकून आहेत सरकार.

**पेशवे**–असें काय? बरें बसा. (वकीलास)बैठो. (नानास)काढा तुमचा मसूदा तर मग; वाचा.

**नाना**–(हात जोडून)आज्ञा. (मसुदा घेऊन उभा रहातो)

**आप्‌टन्**–वेल् भास्कर, यू बेटर् ओपन् युवर् कापी; आंडकंपेयर व्हट् ही रीडस्.

**भास्करजी**–यस् सर. (असें ह्मणून तो मसुद्याची नकल उघडून हतांत धरतो. मग नाना आपल्या हातांतला कागद वाचूं लागतो)

"१ सास्टी बेट इंग्रजांनीं घेतलें तें सांजकडेच राहू द्यावें"

"२ भडोच शहरांतला पेशव्यांचा हिस्सा व त्यांच्या भोंव-तालचा तीनलक्षांचा मुलुख जो गायकवाडांनीं इंग्रजांस दिला, तो देण्यास गायकवाडाला अधिकार नाहीं- सबब तो पेशव्यांस परत द्यावा. अगर त्यांनीं खुषीनें दिल्यास इंग्रजांनीं घ्यावा.,,

" ३ रघुनाथराव दादांशीं इंग्रजांनीं बिल्कुल् दोस्ती ठेऊं नये."

"४ दादांनीं दरमाहां ५२ हजार रुपये खर्चास घेऊन को "परगांवीं रहावें अशी तजवीज इंग्रजांनीं करावी."

५ " ते तसे राहिले तर सांजवळ केवळ शोभार्थ एक हजार घोडे स्वार मात्र असावे."

नाना—झालें, इतकेंच कायतें तुर्त ठरवायाचें होतें.

पेशवे—(वकीलास) ये सब् तुमकुं कबूल हाय्?

आपटन्—(भास्करजीकडे वळून हलकेंच) इझिट् आल् रायिट्.

भास्करजी—येस् सर् आल् रायिट्.

आपटन्—(उभ्यानें हात जोडून) सरकार, कबूल हाये.

पेशवे—आछा, दस्गत करो.

(आपटन सहीकरून मोठ्या अदबीनें कागद गादी पुढें ठेऊन तीन वेळ मुजरा करून आपल्या जागीं उभा रहातो)

पेशवे—नाना, आपला कागद द्या इकडे. (असें ह्मणून तो कागद घेऊन त्यावर शिका मोर्तब करून नानाच्या हातीं देतात) द्या तो सांस.

आपटन्—(तो कागद घेऊन आणखी सलाम करून हात जोडून)

सरकारकी हामेशा दोस्ती रहना ए अमारे सरकारका बौत बौत इरादा हाय्. अमारे सरकार आपने जबानका बंदा गुलाम हाये; और खावंदके दर्बारमेबी ये (कारभारी मंडळी कडे हात करून) बौत बरे, बरे मुचादी लोक हाये. सबब आज जो दोस्तीका इकरार हुवा, ओ बौत दिनचलेगा, और एक सरकार दूसरे सरकारकूं आपने भायीके माफक देखेगा एसा—

**पेशवे**—(मध्येंच) बहूत अछा हाये; हमारी बहूत खुषी हाये.

**हरी**—(हलकेंच) कसा बोके सन्यासी ब्रह्मज्ञान सांगतो पाहा. आतां पण बेह्या. कज्जा कोणीं उकरून काढिला होता?

**आप्टन्**—(पेशव्यांस) आब् हुकूम हायगा?

**पेशवे**—आछा, चलो.

(मग आप्टन् तीन वेळ पुनः सलाम करून आपल्या कारकुनासुध्धां चालता होतो)

**पेशवे**—हा मनुष्य फार गरीब दिसतो.

**परशु**—(हात जोडून) सरकार, तो कसचा गरीब आला आहे? पेशव्यांच्या प्रतापानें त्याला गरीब केला आहे.

**हरी**—पण मांजराचा पाय; प्रथम मात्र मऊ.

**सखा**—असो, ते आपणांशीं गरिबीनें वागतात, तेव्हां त्यांस आपण गरीबच मानिलें पाहिजे.

(मग पेशवे उठतात, व त्यां बरोबर सर्व लोक उठून जातात).

---

## प्रवेश ३.

### शनिवारवाड्याची देवडी.

(चिमाजी प्रवेश करितो, व कांहीं शिवण काम घेऊनएकी कडे शिवीत बसतो, मग भवानराव प्रवेश करितो)

**भवा**—अरे चिमा.

**चिमा**—(बसल्या जाग्यावरूनच) ओ काका, काय ह्मंता?

**भवा**—जरा घुडघुडी भरून आनरे बच्चा.

**चिमा**—होय काका. (असें ह्मणून घुडघुडी भरून महाताऱ्याच्या हातींदेतो; तो एक झुरका घेऊन मोठ्यानें ओढून घाबरा होतो)

**भवा**—कायरे मर्दा, कसली वंगळ तमाखू ही; लै कडाक, कोनीरे आनली?

**चिमा**—सकाळीं तमाखू नवती, तवा परशाच्या हातीं पैसा देऊन धाडला वता.

(इतक्यांत काळोबा प्रवेश करून घाईनें जातां जातां भवानरावाला रामराम करितो)

**भवा**—कोन स्यो, काळबा.

**काळू**—व्हय काका. जरा वर्दी द्यायची हाय्; आतां असाच आलों.

**भवा**—अरे ये बेट्या, जरा तमाखू तरी प्येवून जा. कंदी आलास!

**काळू**—पन सरकाराला भेगियान् निरूप कळवायचा हाय्.

(असे ह्मणत जवळ येऊन घुडघुडी ओढूं लागतो)

**भवा**—पन संबाळ हो, तंबाकू लै कडक हाय्.

**काळू**—(जारा ओढून) ही कडक ह्मंता काका! मी तर चिलमींत कायी हाय की न्हाय ह्मंत होतों. पन काका, जातों आतां.

**भवा**—जरा बैस तरी बैस ह्मंतो न्. कंदी आलास!

**काळू**—काल सांचं आलो काका.

**भवा**—काय काय तलवार मारली? कुट कुटं गेला वता?

**काळू**—त्यो वगा कोनी सोदा मी सदासिवरावबाबू मनून शानि मागंदी आला वता, याद हाय?

**भवा**—व्हय गड्या एक लुचा आला वता खरा; आन् सांगे की मोच सदासिवराव चिमणाजी हाय; आन् सोनपत पानपतच्या लडईंत चुकून गेलों तो आज पौत मुलूख हिंडत हुतो ह्मनून शान् लोकाला भुलताप देयी. पन शिर्मंतांनीं त्येला पकडून कैदेत टाकला वता.

**काळू**—व्हाय्; आन् त्येला रतनागेरीस तुरुंगात ठेवला वता नाय्, तवा वगा तुरुंगातून निसाटला.

**भवा**—व्हय; त्येबी ह्मायित हाय; आन् तत त्यो रामचंदर नायिक सुबेदार, त्येला मिलापी झाला; मंग द्वागा सोद्येनी भल म्हाटं बंड माजावल. पन फुडं त्यो कोनीकडे गेला कि काय जनो.

**काळू**—मंगशानी की न्हाय्, त्ये दोघ गुलामानी कोकनातले समदे किल्ये पडाव केले. आन् घाटावर चडून राज्माचीचा किलाबी घ्येटला. मंगशानी हामी आन् आमच रामजी पाटील सिंगडांत हुतो. तवा सिंदे सरकारनीं पत्तर दरसणी लश्कर संगं घ्येवून राज्माचीकडे जावें ह्मनून लिवल. त्ये परमान् हामी त्येच दिसी निघून जाताना वाटंत पुन्यावून भिवराव पानशाबी अमाला येवून मिळाला. चौते रोजी राज्माची । पोचलो वगा. तत पन काका, काय विगुत केली ह्मंता, हामी एकदं किल्यावर हला न्हाय् केला; फुडं

दोन कार्कून आन् धा पंदरा शिपायी घेवून किल्यात धाडले. आन् हामी समदे दडून -हायिलो. सिर्मतानी सला करा या हामाला पाटावलाया, असे तुमी सांगाजा, ह्मनून हामी कार्कूनास्नीं हुकूम दिला. ते ते परमान् गेल्यावर मंदी एक दिस जाऊं दिला; आन् दुसरे दिसी काय यिचार्ता, मैदान राचेंच् उटलो बगा; आन् जे गेलो, हरहर ह्मादेव ह्मनून किल्याला शिड्याच लावल्या. मंग काय पुसता, पार्वे गटके मंदी समदे लस्कार किल्यावर. पन काय करावे हो, आमचा समदा पिरात्न येरुत जाला; पाकरु पळाले, यिच वन.

भवा–काय! त्यो आमच्या इकत्यामंदी निसाटला!

काळू–व्हय जी, व्हय्. पन् हामीबी भादर त्येला सोडतो कुटें पंदरादी त्येची पाटलाग केली बगा. आकरशेवटी त्यो कुला ब्यास रगूजी आंग्रेयांचेय हातीं गवसला गुलाम. त्यिनें पकडून आमचे सवादीन केला. आन् तसाच त्येला मुसक्या आवळून काल सांचें हितें आनला बगा मजी जालें.

भवा–आन् तुमचें पाटील आता त्येला काय कर्नार!

काळू–सिर्मताच्या कच्येरीत आत्तां हाजर कर्नार. तुमी इकत्या मंदी त्येला बगाल. छावनीतून त्ये निघाले; आन् हामी फुडे वर्दीद्याया आलो.

(असें ह्मणून निघून जातो)

---

**प्रवेश ४.**

पेशव्यांची कचेरी.

(नाना फडनीस वगैरे कारभारी लोक प्रवेश करितात).

**नाना**—कां गणपतराव, आज बापू कां आले नाहींत?

**गणप**—(हलकेंच) त्यांचा मोर्चा फिरल्या सारखा रंग दिसतो.

**नाना**—होय, मला तें सगळें माहित आहे.

**गणप**—(हलकेंच) काल रात्रीं मोरोबा दादांच्या येथें दादा साहेबांला एकदम आणण्या विषयीं बरीच वाटा घाट चालली होती-म्हणून मी ऐकिलें!

**नाना**—हां, त्या मंडळींत बापूही होते!

**गणप**—होय, तेही होते; आणि त्यांच्याच कडून मंडळीला जरा ज्यास्त उमेद आल्या प्रमाणें दिसतें.

(इतक्यांत काळू प्रवेश करितो)

**काळू**— सरकार, (असें म्हणून जमीनीला हात लावून पांच चार वेळां मुजरा करितो)

**नाना**—कां काळू, कोठें आहेतरे पाटील?

**काळू**—छावनीतून निगाले सरकार; आन् म्होरे वर्दी द्याया मला धाडलया.

**नाना**—आणि त्या लुच्चा चोराला घेऊनच या म्हणून इकडून निरोप पाठविला होता; त्याप्रमाणें त्याला आणितात कीं नाहीं?

**काळू**—(हात जोडून) जी सरकार, त्याला मुसक्या आवळूनच संग घेवुन निगालयातीं.

**नाना**—बरें तर, गणपतराव. श्रीमंतांकडे सूचना पाठवा.

**गणप**—बरें आहे. कोणरे तो, हरीबा.

**हरी**—जी.

**गणप**—जारे, दिवाणखान्यांत जा आणि फडनीसांनी सूचना

द्यायाला सांगितलें आहे म्हणून सरकाराला कळव.

(हरीबा निघून जातो)

**नाना**—सातान्याहून आलेलें पत्र कोठें आहे गणपतराव?

**गणप**—हें येथें आहे (दप्तर सोडून पत्र काढून देतो)

**नाना**—(तो कागद घेऊन बराच वेळ पर्यंत ~~वाचून~~ बसतो, मग म्हणतो) बरें आहे, असूं द्या; (मग पागनीसाकडे वळून) पागनीस, आतां तळावर हत्ती किती आहेत?

**पागनीस**—सदुतीस आहेत. पैकीं चौदा उद्यां कोकणांत जाणाऱ्या फौजेबरोबर रवाना व्हायचे आहेत.

**नाना**—बरें, त्यांतमस्तीस आलेला एकादा आहे कीं नाहीं.

**पागनीस**—तीन आहेत. त्यांत सिंद्यांकडून आलेला जो अंबाप्रसाद म्हणून आहे, तो तर माणसांला पुढें फिरकूं देत नाहीं. त्याला सांभाळणें फार मुष्कील झालें आहे. हमेषां बारा असामी त्याच्या तैनातीस असतात.

(इतक्यांत हरीबा येऊन सूचना दिली म्हणून गणपरावास कळवितो.)

**काळू**—(दरवाजाबाहेर पाहून) पाटील आले सरकार. (रामजी पाटील व त्याजबरोबर पांच असामी नागवे तरवारीवाले कैदी सदोबा सुद्धां प्रवेश करितात.)

**रामजी**—(नानाला मुजरा करून) हुकुमापरमानें ह्यो कैदी हाजर हाय् सरकार.

**नाना**—ठीक आहे. त्याला उभा राहूं द्या तसा गादी समोर)

(पेशवे प्रवेश करितात आणि सर्व उठून उभे राहातात.

**पेशवे**—(तक्याशीं बसल्यानंतर) नाना, हाच (कैद्याकडे बोट

दाखवून) नव्हे कां तो बंडखोर?

**रामजी**–(पुढे येऊन हात जोडून) जी सर्कार हाच.

**पेशवे**–शाबास रामजी, तुह्मी मोठी कमाई केली; तरच सिंद्यांचे सरदार.

**रामजी**–ह्ये कामांत माज्ये येकल्याची शिपारस न्हायीं सर्कार; पानशानींबी लै झटून सर्कारची नौक्री बजावली. आन् आंग्र्यानीं आमास्नी भौत मदत केली सर्कार.

**पेशवे**–नाना, या तिघांचा मान चांगला केला पाहिजे.

**नाना**–(हात जोडून) आज्ञा.

**पेशवे**–बरें आतां बोलवा त्या भामट्याला.

**सदोबा**–सरकारची आज्ञा झाली, तेव्हां दोन शब्द बोलतों माफी असावी. सरकार, मी आतां सरकारच्या कैदेंत सांपडलों; सरकार आतां मला जबर शिक्षा देणार; कदाचित् जीवही घेणार यांत संशय नाहीं. परंतु या गोष्टीला मी ह्मणजे भ्यालों आहें असा अर्थ नाहीं. मी ज्या दिवशीं पेशव्यांवर शस्त्र धरिलें, त्याच दिवशीं मरायाला सिद्ध झालों. आतां या प्रसंगीं मी खराच या गादीचा मालक आहे या विषयीं आणखी नवे पुरावे देण्यास इच्छित नाहीं; आणि देऊं लागलों तरी सरकार त्यांकडे कान देणार नाहींत हें मी पक्कें समजतों. तथापि माझें अखेरचें मागणें इतकेंच आहे कीं, गरीब, निराधार व पडलेल्या शत्रूवर धन्यांनीं क्रूर दृष्टि धरून जिवानिशीं मारण्याचें मात्र करूंनये. (असें ह्मणून साष्टांग नमस्कार घालितो, आणि पुनः उठून उभा राहातो) मी जरी सदाशिवराव भाऊ नसलों तरी

श्रीमंतांच्या प्रजेपैकीं एक आहे हें तरी खरें आहे. तेव्हां या समयीं या अनाथाकडे माते प्रमाणें दया दृष्टीनें पाहिल्या-पासून श्रीमंतांच्या प्रतापाला विशेष भूषण आहे. या शिवाय जो सदाशिवराव भाऊ श्रीमंतांच्या कुटुंबांतला, आणि वयानें, मानानें हालींच्या पेशव्यांपेक्षां मोठा त्याचें मी सोंग घेऊन आलों आहे इतकें तरी खरें आहे! आणि मी तो नव्हे असें आज पर्यंत कोणत्याही प्रकारें सिद्ध झालें नाहीं. याजकरि-तां मी खराच सदाशिवराव भाऊ असलों तर माझा जीव घेतल्यापासून श्रीमंतांच्या पदरीं केवढें पातक पडेल, याज-कडे धन्यांनीं नजर द्यावी, इतकीच गरिबाची विनवणी आहे. (पेशव्यांच्या तोंडावर दयेचें लक्षण पाहून) महाराज, मजवर जेव्हां आंग्र्यानें दगाकरून हल्ला केला, त्या वेळीं माझ्या हातीं तरवार अद्यापि होती, व मी स्वतंत्रही होतों; तेव्हां मी त्या शस्त्राचा उपयोग केला असता तर आणखी पांच चार असामी तरी घायाळ केले असते; अथवा निदान माझा जीव तरी मी त्याच तरवारीला आर्पण केला असता. परंतु जे सवाई माधवराव हालींचे पेशवे, ज्यांच्या चरणासमोर उभा राहून हा बंदा गुलाम आपल्या जिवाची खैरात मागतो, ते मोठे दयाळु, उदार आणि हिय्येचे सरदार आहेत असें पक्कें समजून, मजवर आणखी मेहेर नजरेनें पाहातील या आशेनें हातांतली तरवार फेंकून दिली; आणि एकदम आंग्र्यांच्या स्वाधीन झालों.

**नाना**—(पेशव्यांच्या तोंडाकडे पाहून, सदोबाचें बोलणें मध्येच बंद करून) पुरे; पुरे आतां तुझी बडबड. विपत्तीच्या समयीं

कोणही माणूस गरीब होतो; तेव्हां तू आतां गरिबीनें मागून घेतोस यांत नवल नाहीं. (मंडळीकडे पाहून आवेशानें) पाहा, हा आतां देखील केवळ गरिबीनेंच बोलतो असें नाहीं. आरंभीं मी मरायाला तयारच आहे ह्मणून मगरूरीनें बोलतो; आणि शेवटीं जीवदान द्या ह्मणून मागून घेतो. तेव्हां याच्या मनांत आणखी पुढें काय विचार असतील, हें नाहीं कां समजत? आणि अशा राजद्रोही, कपटी, छिद्रदर्शी आणि घातकी मनुष्यावर दया करणें ह्मणजे केवळ राजनीतीला कळंकच लावणें आहे, हें पेशव्यांला माहीत नाहीं काय? ते अशी दया करूं लागले तर त्यांच्यानें आपल्या जिवाचें तरी रक्षण करवेल? आतां हा ह्मणतो कीं मी खराच सदाशिवराव भाऊ असलों तर तुह्मांला मोठें पाप घडेल. परंतु ज्या पेशव्यांच्या घराण्यांत आजपर्यंत कोणी कधींही नादान मनुष्य निपजला नाहीं, आणि विशेषें करून जे सदाशिवराव भाऊ जिवाची खबर नसतां फक्त आपल्या मणगटाच्या जोरावर एकटेच शत्रूच्या सैन्यांत शिरून नाहींसे झाले, त्या पेशव्यांच्या वंशांत जन्मलेले ते सदाशिवराव भाऊ आज सभेंत उभे राहून आपल्या एकट्याच्या जिवाकरितां भिकाऱ्या प्रमाणें मागून घेऊन लोकांकडून नादान ह्मणवून घेतील हें तिळभर तरी संभवतें काय? नाहीं, नाहीं, कधीं नाहीं; पूर्वेचा सूर्य पश्चिमेस उगवला तरी असें घडणार नाहीं. हा लुच्चा तोतयाच खरा. याला चांगलें शासन झालें पाहिजे; चांगलें असें कीं, पुष्कळ दिवस तें लोकांच्या मनांत राहिलें पाहिजे; आणि याच्या सारिखे जे ठगेखोर असतील

त्यांना चांगली दहशत पडली पाहिजे. याजकरितां (रामजीकडे पाहून) पाटील, पाहातां काय? उचला मादरचोदाला. पागनीसाला बरोबर घ्या. आणि शिंद्यांचा हत्ती अंबाप्रसाद मस्त झालेला आहे. त्याला प्रथम दारू पाजा; आणि दाहा पांच असामी चोहोंकडे जमून त्याला भाल्यांनीं टोंचून खूब चिडवा; आणि मग या अवतारी पुरुषाला द्या त्याच्या लाथेंत ढकलून. सारांश असें झालें पाहिजे कीं पहिल्या सपाट्या सरशीं याच्या सर्वांगाचे तुकडे उडाले पाहिजेत. (हें नानाचें भाषण ऐकून सर्व लोकांचे हात पाय गार होतात; पेशव्यांच्या अंगावर रोमांच उभे राहातात; आणि सदोबा चित्रा प्रमाणें पेशव्यांकडे पाहात राहातो.)

**पेशवे**—(हळूंच नानाला खुणावून त्याच्या कानांत) ही तुह्मी फार क्रूर शिक्षा सांगितली. तो निदान जातीचा ब्राह्मण आहे; तेव्हां त्याला इतकी कडक शिक्षा देणें बरोबर नाहीं.

**नाना**—(डोळे वटारून पेशव्यांच्या कानांत) तो कसचा ब्राह्मण आला आहे! तो जातीचा सोनार आहे, हें मला खचीत माहीत आहे. आणि याला ही शिक्षा दिलीच पाहिजे; ह्मणजे बापू, मोरोबा वगैरे मंडळीला चांगली दहशत पडेल.

(मग पेशवे निरुपाय होऊन उगेच बसलेसे पाहून सदोबा उभ्यानेंच कोसळून पडतो)

**नाना**—(रामजीला) कां पाटील उभे कां राहिलेत? (असें ह्मणून डोळ्यांनीं खुणावतो; रामजी आपल्या माणसांकडून सदोबाला उचलून घेऊन चालता होतो)

**पेशवे**—(घटकाभर स्तब्ध बसल्यानंतर) आजचा दिवस मोठ्या खेदाचा मी समजतों.

**नाना**—खेदाचें आणखी एक वर्तमान कळवायाचें आहे. छत्रपति माहाराज कैलासवासी झाले.

(असें ह्मणून खिशांतून गणपतरावाकडून घेतलेलें पत्र काढून दाखवितो)

**पेशवे**—हर, हर, हर; माझ्यानें आतां बसवत नाहीं.

(असें ह्मणून उठून जातात आणि कचेरी बरखास्त होत्ये).

---

## अंक दुसरा.

### पात्रें.

सवाई माधवराव पेशवे.... .... .... .... .... ....पुण्याचे राजे.

नाना फडणीस.... .... .... .... .... .... .... .... ..प्रधान.

हरीपंत फडके, महादाजी सिंदे, परशुराम भाऊ पटवर्धन, तुकोजी होळकर }.... .... ...सरदार.

विठ्ठल भट, हर भट, यज्ञेश्वरदीक्षित..बुधवार पेठेंत जमलेले ब्राह्मण.

गणपतराव.... .... .... .... .... .... ....नानाचा कारकून

कृष्णाजीपंत.... .... .... .... .... .... ....सींद्याचा कारकून.

नीळकंठराव. .. .... .... .... .... .... .... ....एक कारकून.

——000——

## स्थळ पुणें.

### प्रवेश १.

बुधवारांतील बळवंतराव गंध्याचें दुकान.

(विठ्ठल भट्ट, हरभट्ट प्रवेश करितात).

वि—हर भट्ट, अजून मंडळी जमल्यासारिखी दिसत नाहीं,

हर—आपण आज जरा लवकर आलों वाटतें.

वि—इतक्यांत येतील सगळे, जातात कोठें वेटे! डबी काढा, एक चिमूट ओढूं तों पर्यंत. आतां आमंत्रणांत कांहीं जीव राहिला नाहीं.

हर—(कंबरेची डबी उघडून तपकीर ओढीत ती पुढें करितो) आतां कोणी गृहस्थ पुण्यांतल्या भिक्षुकांवर भरंवसा ठेवीनासा झाला बुवा.

वि—कां बरें!

हर—परवां काय झालें, आपला लट्टेश्वर गोविंद भट्ट ठाउक आहे कीं नाहीं; त्याच्या घरीं मिरज सांगलीकडचा कोणी एक गरीब गृहस्थ येऊन उतरला होता. त्याची एक बायको होती, आणि तो एक; आणि त्या दिवशीं त्याचे घरीं श्राद्ध होतें. ह्मणून त्या बिचाऱ्यानें गोविंद भट्ट घरचा एक होताच ह्मणून त्याला एकाला सांगितलें; आणि गोविंद भट्टानें मला ही आमंत्रण देवविलें होतें. त्याच्या बायकोनें चवघां पुरता बेताचा सैंपाक केला होता. पण गोविंद भट्ट हाराक्षस; त्याला जेवण्याची घाई. तो गृहस्थ वैष्णव सांप्र-

दार्यी होता, ह्मणून ब्राह्मण भोजना पुर्वींच पिंड प्रदान झालें पाहिजे ह्मणून त्यानें सांगितलें; ह्मणून मी संकल्प सांगूं लागलों. पण या राक्षसाला धीर कोठचा? त्यानें मला धड संकल्पही सांगूं दिला नाहीं. गडबड गुंडा करून आईचा पिंड बायकोच्या जागीं, बायकोचा पिंड बहिणीच्या जागीं, असें करून जो एकच घोंटाळा उसळून दिला ह्मणता, तो गरीब बिचारा यजमान गोंधळून गेला. बरें, इतकें होऊन जेवायाला बसलों; त्यांत तरी त्या सोंटाला भीड, मर्यादा, लज्जा, कांहीं! घारगे सरले, वडे सरले, भजी सरली, तरी याचें पान कोरडे आहे तें आहेच. शेवटीं तीं दोन्ही, नवरा बायको, पश्चात्तापास पडून एकमेकाचीं तोंडें टकमक पाहात उभीं राहिलीं. अखेरीस तो नवरा जरा धूर्त होता; त्यानें युक्तीनें आह्मां देखत बायकोला विचारिलें कीं, "काय, आतां करपलेले घारगे राहिले! असूंदेत, ते कशाला ब्राह्मणांला वाढतेस; भात आण ह्मणजे झालें." इतकें ऐकून तरी यानें उगें राहावें कीं नाहीं! त्या यजमानाला ह्मणतो, "तुमच्या कुटुंबाला घारगे करण्याची संवय नसली तर जरासे करपले असतील; तरी कांहीं चिंता नाहीं आणा; आह्मांला सगळे चालतात." मग तो यजमान ह्मणे, छे, छे, ते कशाला; आणि हा ह्मणे, कांहीं चिंता नाहीं आणूं द्या. मग मला मोठी लाज वाटली बुवा. अखेरीस मीं ह्मटलें, "गोविंद भट्टाचा जरा थट्टेखोर स्वभाव आहे; त्याच्या बोलण्यावर तुह्मी जाऊं नको; आपले भात आणा कसा." असें सांगून सरासरी वेळ मारून नेली.

(इतक्यांत यज्ञेश्वर दीक्षित छाटी बिटी वेतानें चुण्यांशीं खो वून डौलानें येतात)

यज्ञे—विठ्ठलभटजी, नमस्कार.

वि—आहा! नमस्कार, नमस्कार. दीक्षितांचें आगमन कधीं झालें!

यज्ञे—आजच सकाळीं.

वि—स्वस्तिक्षेमनां! फार दिवस राहिलां!

यज्ञे—राहिला झालें. अह्मांला काय घरनांदार. काशीक्षेत्रीं नित्य भागीरथींचें स्नान घडत होतें; आणि रोजआमंत्रणां ची समृद्धि. येथें तरी काय आहे! बरें, तुह्मी सर्व खुशा ल नां!

वि—हो, सर्व खुशाल.

यज्ञे—आणखी दर्बारीं बिर्बारी काय वर्तमान! बरीच गडबड चालली आहेशी दिसते!

वि—दर्बारी वर्तमान काय पुसतां! एक सारिखी गडबड चाल ली आहे.

यज्ञे—ती कशी काय! कांहीं घृतकुल्या, मधुकुल्येचें संधान!

वि—छे, तें कांहीं नांव काढूं नको. मुख्य वर्तमान हें कीं, सिंदे आणि हरीपंत फडके मिळून पंन्नास हजार सैन्य घेऊन दादासाहेब आणि इंग्रज यांशीं लढण्याकरितां तळे-गांवाकडे गेले होते. त्यांचा जय झाला. आणि दादा साहेब, चिंतो विठ्ठल त्यांचा कारभारी व सखाराम बापू या तिघांस पकडून सर्व फौजेसुद्धां आमचे विजयी सरदार काल रात्रौ येथें घेऊन पोंचले.

यशे—हें कसें झालें? इंग्रजांशीं तह झाला ह्मणून मीं ऐकिलें होतें.

वि—तें खरें; पण दोघांलाही एकमेकास बुडविण्याची इच्छा तेव्हां त्यांचा तह ह्मणजे खुसपट काढण्याला आधार असें समजलें पाहिजे.

यशे—आणखी तंटा कसला निघाला?

वि—कसला म्ह काय. श्रीमंतांनीं त्या गोऱ्यांनां तीन लाखांचा मुलुख मेहर्बानीनें दिला होता. पण यानीं फ्रेंचांशीं स्नेह ठेविल्याचें पाहून त्यांना सहन होयीनां. मग तुमच्या मुलखाचा वसूल तीन लाख होत नाहीं, कमी होतो, तो लवकर भरती करून द्यावा ह्मणून त्यांनीं धमकीनें पत्र लिहिलें; आणि यांजकडून समर्पक उत्तर कांहीं येत नाहीं असें पाहून त्यांनीं पुनः दादासाहेबांस हातीं धरिलें आणि लढाई जुंपली. पाहा बुवा.

हर—बरें, आतां तुमचें वर्तमान राहूं द्या; आमची सर्व मंडळी त्या तेथें कशाला जमली आहे, पाहूं चला.

(सर्व निघून जातात)

---

## प्रवेश २.

### शनिवारवाड्यांतली कचेरी.

(नाना फडनीस वगैरे दरबारची मंडळी प्रवेश करित्ये; त्यांच्या मागून कांहीं वेळानें पेशवेही प्रवेश करितात)

पेशवे—(बसतां बसतां आतुरतेनें) नाना, दादाही कचेरीस येणार आहेत नाहीं?

नाना—मीमहादजीला सांगून पाठविलें होतें कीं श्रीमंतांला दादा साहेबांस भेटण्याची फार इच्छा आहे; तेव्हां कचेरीस येतानां त्यांसही घेऊन यावें. परंतु दादासाहेबांची प्रकृत बरी नाहीं, याजकरितां त्यांच्यानें येवत नाहीं ह्मणून सिद्यांनीं सांगून पाठविलें. परंतु बापूला आणि चिंतो विठ्ठलाला आपल्या बरोबर आणितों ह्मणून त्यांनीं कळविलें आहे. (हळूंच कानांत) सिंदे कचेरीस आल्या नंतर दादांसही कसें तरी करून आणवा ह्मणून श्रीमंतांनीं त्यांनां जरा सूचना केली तर ते सुद्धां आतां येतील. कांहीं झालें तरी ते वडील आहेत. लोक रीतीप्रमाणें त्यांनां भेटून आदर सत्कार करण्याला काय चिंता आहे!

पेशवे—(नानाच्या तोंडाकडे निरखून पाहून) कशाला पाहिजे! त्यांची मर्जी नसली तर ते न कां येत नां. मीच पाहिजे तर त्यांच्या ठिकाणीं जाऊन त्यांनां भेटून येईन. (असें ह्मणून तोंड बाजूला फिरवितात)

(हरीपंत फडके प्रवेश करितो, व श्रीमंतांस नमस्कार करून आपल्या जागीं उभा राहातो)

पेशवे—कां फडके, खुशाल नां!

हरी—(हात जोडून) खुशाल ह्मणून काय विचारावयाचें! यजमानांचे चरण खुशाल तर सारें जग खुशाल.

नाना—पण सिंदे कोठें आहेत!

हरी—आमच्या घराहून तर सर्व मिळूनच निघालों; परंतु कांहीं कारणामुळें ते जरा पाठीमागें राहिले. (नानाच्या कानांत) एका पात्र ह्मणून.

(इतक्यांत माहादजी सिंदा, सखाराम बापू व चिंतो विठ्ठल प्रवेश करितात; आणि ते सर्व आप आपल्या रीतीप्रमाणें पेशव्यांस मुजरा व नमस्कार करून उभे राहातात)

पेशवे—बसा, सारे बसा.

(मग ते सर्व आप आपल्या मरातबा प्रमाणें बसतात)

नाना—सिंदे, फडके, आतां तिकडची सारी हकीगत श्रीमंतांला व आह्मां सर्व कचेरीच्या लोकांला तुह्मी आपल्या तोंडांनीं एकदां ऐकवा.

महादजी—हूं फडके हें तुमचें काम.

हरी—इकडून गेल्यापासून झालेलीं कचीं वर्तमानें त्या त्या वेळीं विनंती पत्रद्वारें कळविलींच आहेत. आतां सर्व वर्तमान थोडक्यांत सांगतों ह्मणजे झालें. आह्मी प्रथम तळेगांवीं जाऊन तो गांव सगळा उजाड केला, आणि दूर एकीकडे राहिलों. शत्रूंचे लोक तेथें पोंचले तेव्हां त्या गांवाची अवस्था पाहून पुढचीं सारीं खेडीं अशींच झालीं असलीं तर सामग्री मिळण्याची पंचाइत पडेल ह्मणून मागें परतण्याची गोऱ्यानीं मसलत काढिली. पण आह्मी त्यांच्या बापाचे बाप; त्यांना सोडतों? परतून जरासे पुढें येतात तों आह्मीं रस्ता आडवून धरिलेला त्यांनीं पाहिला; आणि आमची फौज पाहून दचकून ते तेथेंच राहिले. त्यांच्या फौजेंत २५००० दादासाहेबांचे लोक, तीन इंग्रजांच्या पलटणी, आणि १००० गोरे लोक होते. ती सर्व फौज झाली आहे अशी संधि पाहून आमच्यांतील पांच चार टोळयानीं चोहोंकडून तिजवर हल्ला केला, आणि बरीच कत्तल

उडविली. परंतु इतक्यांत संध्याकाळ झाला, आणि माझ्या दोस्ताच्या (सिद्याकडे बोट दाखवून) मनांत आलें कीं लढाई-वांचून काम होण्याजोगें आहे. मग आह्मी भ्यालों असें दाखवून त्यांच्या डोळ्यासमोरून नाहींसे झालों. ती संधि पाहून ते अकलेचे खंदक आपल्या तोफा वगैरे जड सामान तळ्यांत बुडवून मागें चालूं लागले. मग दोन प्रहर रात्री नंतर आह्मी पुनः त्यांच्या सभोंवती गराडा देऊन तुरळक लढाईचा व लुटण्याचा क्रम चालवीत दुपारच्या सुमारास वड-गांवच्या जवळ त्यांना नेलें, आणि तेथें एकदम त्यांच्या अंगावर तुटून पडून मुंडकीं उडविण्याची सुरुवात केली. तें पाहून गोऱ्यांनींच प्रथम पळ काढिला; आणि ते गांवांत शिरले. कांहीं केलें तरी गोरें कातडें बेटें, नरम; ऐन उन्हाची वेळ, पोटांत अन्न नाहीं; घाबरले गुलाम. पळतां पळतांच डोळे रुप्याचे करूं लागले. सरासरी जेम् तेम् करून ते गांवांत जाऊन पडले एकदां. मग काय विचार-तां? सांपळ्यांत उंदीर आडकल्याप्रमाणें झालें. आह्मी गांवाला घेरा देऊन स्वस्थ राहिलों. पण त्यांनींहि पुढें आह्मांला फार तसदी दिली नाहीं; लागलाच वकील पाठ-वून तहाचें बोलणें सुरू केलें. तहाचीं कलमें कळविलींच आहेत.

पेशवे—तीं कशीं काय? माझ्या ध्यानांत नाहींत.

हरी—आलीकडे इंग्रजानीं हिंदूंचा जितका मुलूख घेतला असेल, तितका ज्यांचा त्यांस परत द्यावा. कलकत्त्याहून जी फौज मुंबईला येत्ये, ती परत गेली पाहिजे. भडोच

शहरांतला इंग्रजांचा हिसा सिंद्यांस मिळावा. स्वारीच्या खर्चा बद्दल इंग्रजांनीं ४१ हजार रुपये द्यावे. तहा प्रमाणें वागण्याच्या खातरी करितां त्यांनीं दोन मुख्य गोरे आमच्या ताब्यांत द्यावे. इतकें झाल्यानंतर दादासाहेब, बापू व चिंतोपंत आपण होऊन आमचे स्वाधीन झाले, व ते दोघे गोरेही आह्मांकडे आले. मग बाकीचे मुंबईकडे निघून गेले, व आह्मी या चरणांच्या दर्शनाकरितां इकडे निघालों.

नाना—शाबास, बाहादर हो शाबास! असावे तर असे सरदार असावे.

पेशवे—(हांसून) हें लढईचें वर्तमान मला मोठया गमतीचें वाटतें. पण नाना, मेजवानीचा बेत कधीं ठरविला!

नाना—आज्ञेप्रमाणें उद्यांच ठरविला आहे; आणि पोषागांचीही तयारी ठेविली आहे.

महादजी—(हात जोडून) सरकार, गरीब चाकरास्नी कशाला मेजवानी, आन् पोशाक? सिरमंतांची द्या असली तर बस् आहे.

हरि—कां? पेशवे सरकाराला काय झालें. होऊं द्या कीं हो; नको कां ह्मणतां? अशा प्रसंगीं खर्च करूंनये तर मग केव्हां करावा?

महाद—आमचे हारिपंत लै भिडस्त!

नाना—सिंदे, आतां तुह्मांशीं बोलणें थोडें राहिलें.

महाद—तें काय? नानासाहेब.

नाना—सरकारचे अपराधी आणि सर्व तंट्याचें मूळ जे हे तिघे

तुमच्या ताब्यांत आहेत, त्यांची व्यवस्था कशी काय करायाची?

**महाद**—आपुन सांगाल तशी.

**नाना**—त्यांनां आमच्या नजरेसमोर येथेंच कैदेंत ठेविलें पाहिजे.

**महाद**—पन दादासाबांला मी वचन दिलेयाकीं तुमास्नी मी आपल्या जवळ ठेवीन म्हनून

**नाना**—ते तर प्रथम पेशव्यांच्या कैदेंत असले पाहिजेत.

**महाद**—आन् माज्या कैदेंत असले तर कुनाच्या कैदेंत असल्या वानी झालें?

**पेशवे**—तें बरोबर आहे. परंतु अमचा अभिप्राय असा कीं, त्यांनां दंगा करण्याला पुनः सवड सांपडूंनये, अशा बंदोबस्तानें ठेविलें पाहिजे.

**महाद**—सरकार, (हात जोडून) मी त्याला जामीन.

**नाना**—छे छे, तें उपयोगीं नाहीं.

**पेशवे**—(कपाळाला आंठया घालून) कांहीं चिंता नाहीं दादा जामीन झाल्यानंतर मग कांहीं काळजी नाहीं.

**हरी**—असेंच करणें बरोबर आहे. त्यांनां वचन देऊन दगा करणें आगदीं बरोबर नाहीं. आणि आतां त्यांचें महातारपण झालें आहे. कोठें तरी थोडी बहूत पोटगी करून दिली म्हणजे स्वस्थ राम राम म्हणून राहातील.

**महाद**—व्हय, मींबी त्योच यिचार केलाया; त्यास्नी अकशी या मुलकाच्यांच काडतों. बुंदेल खंडांत धा बारा लाकांचा मुलुक लावून देतों; खुशाल खाऊन त्यास्नीं न्हावू द्या.

**नाना**—(निरुपाय होऊन) सर्वांच्या मनांस येतें तर तसेंच होऊं

द्या. पण या दोघां विषयीं कसें काय!

महाद —त्यास्नीबी मजकडेच न्हावूद्या ह्मतों.

पेशवे छे छे, तें बरें नव्हे. तिघेही एके ठिकाणीं जमले ह्मणजे पुनः कदाचित् त्यांनां उमेद येणार; आणि आमचें मन स्वस्थ व्हायाचें नाहीं. त्यांनां हुजूरकैदेंतच ठेविलें पाहिजे.

महाद—ठीक हाय् तर; सर्कारची मर्जी. नानासाहेब, घ्या तर त्यास्नी आपुल्या ताब्यांत.

नाना—(हर्षानें) ठीक आहे, (सखाराम बापूस) बापू पाहा. ज्या दरबारीं तुह्मी बसून मुख्य प्रधानाचें कामकेलें, त्या दर बारचे आज कैदी झालेत. दुष्कर्माचें हें फळ. (गणपत रावाला) गणपतराव, आजच्या पुरता त्यांचा बंदोबस्त ठेवा, आणि उद्यांसकाळीं सिंव्हगडाला रवाना करण्याची तयारी करा.

गणप—आज्ञा. (उभयता कैदीस) चला.

(ते दोघे निमूट पणें चालते होतात)

नाना—पण सिंदे, ते दोघे इंग्रज कोठें आहेत!

महाद—येतानां वाटेंत जरा दुकनेंकरी दिसलें; ह्मनून त्यास्नी चिचुडांत ठेवून आलों.

नाना—बंदोबस्त चांगला ठेविला आहेनां!

महाद—जी हे काय यिरतीं!

(सर्व निघून जातात)

---

## प्रवेश ३.

पेशव्यांचा दिवाणखाना.

(पेशवे प्रवेश करून तक्याशीं विचार करीत बसतात;

इतक्यांत नाना प्रवेश करितो)

**पेशवे**—(वरपाहून) या नाना. (जवळ जागा घेतात)

**नाना**—(बसून) सिंद्याकडचें वर्तमान ऐकिलें काय)

**पेशवे**—(विस्मयानें) काय झालें?

**नाना**—दादासाहेबांला बुंदेल खंडाकडे रवाना केलें होतें.

**पेशवे**—बरें मग?

**नाना**—दादा पळाले. मग दुसरें काय?

**पेशवे**—(विचारांत पडून) हां असें कसें झालें!

**नाना**—तें असें झालें. दादांबरोबर सिंद्यांचे लोक होते. आतां ते काय हेतूनें पाठविले होते कोणास माहित. परंतु दादा नर्मदेवर पोंचले तेव्हां, तुह्मांस झांसीस नेऊन सिंद्या कैदेंत ठेवणार ह्मणून कोणीं कंडी उठविली. त्यावरून नदी उतरतानां दादानीं दंगा करून सिंद्याच्या लोकांस हांकून लाविलें, आणि आपण भडोचास पुनःइंग्रजांकडे गेले ह्मणून पत्र आलें आहे. यांतलें खरें काय असेल तें ईश्वर जाणें.

**पेशवे**—ही सारी सिंद्याची तर मसलत नसेलना?

**नाना**—त्याचीच मसलत. तो लंगडा मला माहीत आहे. याजकरितांच मी दादांला येथेंच ठेवून घेणार होतों. परंतु तें तुमच्या मनास आलें नाहीं. सिंद्याच्या गोड गोड बोलण्याला भुललेत. अतां निस्तरा, माझें काय गेलें. तुह्मी कचेरीस बसलेत ह्मणजे शुद्ध पोरकटपणा करितां; कांहीं विचार पाहात नाहीं मूर्खपणा यजमानाचा; अपेशाला मात्र धनी पदरचे लोक.

**पेशवे**—(क्षणभर उगेच बसून) होय नाना, मी कबूल करितों.

मी कांहीं अविचार केला खरा. असें होईल ह्मणून माझ्या स्वप्नींहि नव्हतें. तरी असो, चिंता नाहीं; लुच्चांचा कावा एकदां चालतो. दादांनांआणखी पकडून आणूं, तुह्मी कां काळजी करितां? जातात कोठें? इंग्रज ह्मणजे काय विशाद आहे? चला (असें ह्मणून त्यचा हातधरून नि घून जातात).

——000——

## प्रवेश ४.

### फडनीसाची कचेरी.

(गणपतराव, कृष्णाजीपंत आणि नीळकंठराव प्रवेश करितात)

**नीळकं**—आलीकडे पुष्कळ दिवसांत दरबार भलें नाहीं. उद्यां आतां आपणांस बरीच गमत वाटेल; आणि टिपूला कस कसा नरम केला हेंही समजेल.

**कृष्णा**—फडक्यांच्या मनांतून आजच दरबाराला येण्याचें होतें; परंतु परशुराम भाऊ फार दमून आले होते ह्मणून त्यांनीं उद्यांवर घातलें.

**गणपत**—फडके आणि पटवर्धन मोठे इमानी आणि शूर सरदार खरे.

**कृष्णा**—कां? सिंदे काय कमी आहेत? मला वाटतें या दोघांवर त्यांची कडी आहे.

**गणपत**—होय, तो तसा दाखवितो खरा; परंतु मोठा मतलबी. आपला मोठेपणा साधायाला नेहमी पाहात असतो.

**नीळकं**—छे, त्यानें काय तसें केलें?

**गणपत**—मागें दादासाहेबांला त्यानें नाहीं कां मतलबानें पळ

विलें! अशीं किती उदाहरणें! परंतु तें आतां बोलून काय!

**कृष्णा**—तें कसेंही असो; पण पुढें इंग्रजांनीं कोठें दादांचापक्ष घेतला! त्यांनीं स्वतःच आह्मांशीं कंबर बांधिली.

**नीळकंठ**—तुह्मी कांहीं ह्मणा; दादासाहेब इतके शूर असून फार भोळ्या स्वभावाचे होते बरें. गरीब बिचारा! पेशवाईची गादी त्याच्या हक्काची असून ती अखेरपर्यंत त्याला मिळाली नाहीं. भांडला, भांडला, भांडला; आणि शेवटीं कोपर गावीं बायकोजवळ पडून मेला.

**कृष्णा**—याची बायकोमात्र कृत्या खरी बुवा.

**गणपत**—पण आतां भोगत्ये कीं नाहीं?नवरा तर मरून गेला; आतां तिघांही मुलां सुद्धां कैदेंत दिवस काढित्ये. करील तो भरील. (क्षणभर विचार करून)दादा तरी कसला चांगला? भोळसर होता इतकाच कायतो त्याचा गुण; पण तिच्या नादीं लागून त्यानें केवढें अघोर कर्म केलें! आणखी पाहा, त्याच्या पश्चात् सुद्धां त्याच्यामुळें आह्मांस किती सोसावें लागलें!

**नीळकंठ**—काय सोसावें लागलें?

**गणपत**—इंग्रजांशीं तंटा उत्पन्न होण्याला मूळ कोण? दादाच. ते वारल्यानंतर सुद्धां इंग्रजांशीं थोड्या लढया कराव्या लागल्या? थोडा पैसाखर्चला? थोडे लोक मेले? या सर्वांला मूळ दादाच?

**कृष्णा**—परंतु त्या सर्व लढईंत पेशवे बहादरांच्या सरदारांनीं यश मिळविलें बरें. माळव्यांत, गुजराथेंत, कोंकणांत, जेथें जेथें

इंग्रजांशीं सामना केला, तेथून म्हणजे रडवें तोंड घेऊन ते परत आले असें झालें नाहीं-

**नीळकं**—असें कां म्हणतां? माळव्यांत सरोजाजवळ सिंद्याची फजीती नाहीं कां झाली?

**कृष्णा**—होय, थोडी झाली खरी; परंतु त्याच फजीतीनंतर सिंद्यांनीं सालप्याचा तह कसला केला! त्यावरून. खरोखर भ्यालेले कोण, सिंदे कीं इंग्रज! याखेरीज सिंदेबाहादरांनीं गुजराथेंत पावनगडाजवळ नव्हता कां त्यापूर्वींच हात दाखविला! आतां तर सगळ्या हिंदुस्थानाचा तोच राजा आहे म्हटलें तरी चालेल.

**गणपत**—पण सिंद्यांची इतकी प्रतिष्ठा वाढण्याला आणि सालप्याचा तह आमच्या मनाजोगा होण्याला काय कारण झालें हें तुम्ही पाहात नाहीं. इंग्रजांला हैदर अली एक जबरदस्त शत्रु दक्षिणेंत होताच. त्याशिवाय इकडे पेशव्यांचा तर त्याहीपेक्षां सवाई सोटा. म्हणून तो तह तसा साधला. आमच्या सरदारांनीं कोंकणांत आणि घाटावर इंग्रजाचे बुरे हाल उडवून दिले.

**नीळकं**—होय बुवा, हें खरें; आणि त्या समयीं नानांनीं खुद्द स्वारि केली,

**कृष्णा**—अॅं, नानांनीं स्वारी केली यांत कांहीं अर्थ नाहीं.

**गणपत**—मग तुमच्या बोलण्यांत तरी काय अर्थ आहे? फडनीस निघाले नसते तर खोपवलीचा जय मिळाला असता कां?

**कृष्णा**—तें कांहीं मला समजत नाहीं. फडके, पटवर्धन, होळ-

कर, रास्ते वगैरे मोठ मोठे शिपाई होते ह्मणून खोपवलीस यश मिळालें. पण त्या पूर्वीं वसईजवळ दुधारची लढई कोणीं मारिली? तींत तर नाना नव्हते नां?

**नीळकं**—त्या लढईत फडके, आणि होळकर असतांही रामचंद्र गणेश कायते मुख्य; आणि पटवर्धन, रास्ते हे त्याच्या हाता-खालीं. पण त्या लढईत आपला अपजय जरी झाला नाहीं, तरी रामचंद्र गणेश पडले, दुसरा एक फिरंगी सरदार होता तोही जखमी झाला. खोपवलीची लढई मात्र वाखा-णण्याजोगी खरी.

**गणपत**—वाखाणण्याजोगी ह्मणजे हो, रक्ताचा पूर वाहिला. आठ दाहा तर गोरे सरदार पडले. त्यांत एक तर मोठा जर्नल् होता ह्मणतात. आणि ही कत्तल कोणी केली? फडनीसांचा जिवलग मित्र फडके बाहादर यानें- त्या वाघाला अपजय ह्मणून कधींच माहीत नाहीं. आणि त्यावेळीं दुसरे सरदार वेगवेगळ्या जागीं गुंतले होते- फड-नीस मात्र फडक्याजवळ होते.

**नीळकं**—सखाराम बापूची आणि नानांची अशीच प्रथम दोस्ती होती बरें. पण बिचारा व्यर्थ कैदेंत मरून गेला.

**कृष्णा**—(खोंचून) बापूंचा आणि चिंतो विठ्ठलाचा तसाच बंदो-बस्त केला होता ह्मणून ते दोघे कैदेंत मेले.

**गणपत**—हो, तसें कां ह्मणानां? परंतु ते दोघे आणि रघुनाथ-रावदादा हे नाहींसे झाले, निजाम अलीशीं आणि इंग्रजांशीं तह ठरला; ह्मणून पेशव्यांचें राज्य सुरक्षित चालूं लागलें, आणि सगळ्या भरतखंडांत त्यांचें नांव गाजूं लागलें.

**नीळकं**—होय, हे तिघे दंगेखोर असते तर आतां टिपूला पाताळीं घालायाला सांपडलें नसतें. सालप्याच्या तहा-नंतरच नानांनीं हैदर अलीकडे विशेष लक्ष्य दिलें.

**गणपत**—होय, त्यापूर्वीं आमचा मोर्चा तिकडे फिरविण्याचें कार-ण नव्हतें. हैदराचे मुख्य शत्रु ह्मटले ह्मणजे इंग्रज. इंग्रजांचा आणि आमचा तंटा चाललाच होता.

**कृष्णा**—पण हैदर मेला तोंपर्यंत सालप्याच्या तहावर आमची मान्यता नव्हती.

**गणपत**—ती मान्यता घातली तरी परवां निजाम अलीचे आणि इंग्रजांचे वकील येथें येऊन टिपूवर नवीन स्वारी तिघांनीं मिळून करण्याचा बेत ठरविला. तोंपर्यंत इंग्रज आणि पेशवे एकदिल झाले नव्हते. पूर्वीं जे नरगुंद, बादामी, कितूर, वगैरे किल्ले टिपूचे घेतले, ते आमच्याच लोकांनीं घेतले. निजामाचें मात्र कांहींसें सहाय होतें.

**नीळकं**—बदामीच्या लढाईंत फडक्यांनीं जो पराक्रम केला तोही मोठा वर्णन करण्या जोगा खरा.

**गणपत**—तेव्हांही पण फडणीस हरीपंताजवळ होते.

**कृष्णा**—कां होळकर, पटवर्धन, गणेशपंत बेहेरे यांनीं कांहीं कमी केलें नाहीं बुवा-

**नीळकं**—पण या खेपेस पटवर्धन मोठया आवेशानें गेले होते ऑ. येथून निघतानां त्यांजबरोबर पांच हजारच फौज होती खरी. परंतु जाण्याचे दिवशीं दरबारांत बसून काय बोलले, कीं टिपूची खोड पुरी जिरवीन एक, नाहींतर मी तरी लढाईंत पडेन. त्याच प्रमाणें त्यांनीं त्या लुच्चाची खातरी केली

असेल यांत संशय नाहीं.

कृष्णा—हें मात्र खरें ऑ, टिपूसारिखा लुच्चा आणि कपटी दुसरा कोंणी नसेल.

गणपत—या लढईंतही फडक्यांनीं मोठ मोठीं पराक्रमाचीं कृत्यें केलीं ह्मणून माझ्या ऐकण्यांत आहे.

नीळकं—आतां ह्या गोष्टी दुसऱ्या तिसऱ्याच्या तोंडांतून ऐकणें कशाला? फडक्यांनीं काय काय केलें, आणि पटवर्धनांनीं काय काय केलें, याचा सर्व तपशील आपण उद्यां दरबारीं त्यांच्याच दोघांच्या तोंडांनीं ऐकूं. चला आतां आपण तुळशी बागेकडे जरा असेंच हिंडत जाऊं.

तिघेही निघून जातात.)

---

## प्रवेश ५.

( शनिवारवाड्यांतील कचेरी. )

(हरीपंत फडके, परशुराम भाऊ पटवर्धन, तुकोजी होळकर वगैरे सरदार प्रवेश करितात.)

तुकोजी—(फडके, व पटवर्धन यांस) कारंड्या मुलकांत लै दिस गमलत से!

परशु—होय, कामच तसलें जिकीरीचें लागलें; मग काय करावें!

हरी—( होळकरास ) मग तुम्ही नव्हतेत कां मागल्या खेपेस त्या बदामीच्या वडारणी पाहून भुलले होतेत!

तुकोजी—काय दादा ह्ये! तुमाला बायका बगून भुललेत ह्मनून मी ह्मतलें?

परशु—छे छे, आमचे होळकर तसले नव्हेत. पण त्यांनीं

कितुरास मात्र जराशी गंमत उडविली ह्मणून ऐकिलें खरें.

हरी—जराशी कां? बरीचशी ह्मणा. दोन दिवस हेच दे साई बनले होते-

तुकोजी—झालें तर मग; दोगेवी बामनं एका जागीं जमलें; आतां मी कशाला बोलूं!

(इतक्यांत भालदारांचा ललकारा ऐकूनसर्व उभे राहतात; आणि पेशवे व नाना प्रवेश करून आपापल्या स्थानीं बसतात. मग फडके, पटवर्धन, होळकर, वगैरे पेशव्यांस नमस्कार व मुजरा करून आपापल्या ठिकाणीं बसतात)

पेशवे—(फडके व पटवर्धन यांस) कां, रणपंडित हो, स्वस्थनां?

दोघे—(हात जोडून) चरणांच्या कृपेकरून स्वस्थ आहों.

पेशवे—चरणांच्या कृपेकरून कां? आपल्या बाहु बळें करून कां ह्मणत नाहीं? पण येतानां वाटेंत तुह्मांस फार उपद्रव झालेला ऐकून आह्मी मोठ्या काळजींत होतों.

परशु—(हात जोडून) भुरट्या लोकांनीं जरासा उपद्रव दिला खरा. पण तो कांहीं तितका मनांत आणण्यासारिखा नव्हता.

हरी—मनांत आणण्यासारिखा नव्हता खरा; पण एके ठिकाणीं मात्र भाऊला पत्रांतून पुण्यास येण्याचा प्रसंग आला होता.

पेशवे—(आश्चर्यानें चकीत होऊन)तो कसा!सांगा, सांगा लवकर.

परशु—(हरीपंताकडे पाहून)त्याची काय तितकी मातबरी नाहीं.

हरी—तितकी नाहीं; पण थोडी तरी आहे, (पेशव्यांकडे वळून हात जोडून) सरकार, येतानां वाटेंत बंकापुराजवळ तळ

दिला होता; तेव्हां संध्याकाळीं दिवस मावळण्याच्या सुमारास भाऊ बाहेर जवळच एका टेकडीपलीकडे गेले होते. तेव्हां आंगावर एक धोतर मात्र होतें, डोकीला पटका, बरोबर एक हुजऱ्या होता. ही संधि पाहून पांच असाम्यांनीं नागव्या तरवारींनिशीं यांस गांठिलें. त्यांनां पाहून शिपाईबुवांनीं तर दुरूनच रामराम ठोकला, आणि डेऱ्याकडे मोर्चा फिरविला. एकाला पांचांशीं गांठ. पांचही जणांनीं यांच्या सभोंवतीं घेरा दिला; आणि सपाट्यासरशीं तिघांनीं एकदांच वार केले. पण बेटे अडाणीच कीं नाहीं; कुदळ खोऱ्यांशीं काम करणारे. दोघांनीं तरवारी उचलून डोकीवर घातल्या; त्या पटक्यानें बऱ्याच सांभाळल्या गेल्या. तिसऱ्यानें मात्र खांद्यावर आठचार दिवसांच्या बेगमीचा वार केला. इतकें सगळें सोसून नंतर आमचा हा शिपाईगडी खवळला; मग तो ऐकतो? प्रथम यांनीं हातांतला तांब्या उचलून एकाच्या डोळ्यावर जो दणका दिला, त्यासरशीं त्याला जमीनदोस्त केला. मग त्याच्या हातची तरवार हिसकून घेऊन आधीं त्याचेंच गर्दन उडविलें; आणि लागलीच आणखी दोघांचीं त्याच प्रमाणें गठडी वळली. मग बाकी दोघांनीं सूं केलें.

**पेशवे**—यॅा रे शिपाई! याला ह्मणावा शिपाई!

**नाना**—ही गोष्ट मोठी स्मरणांत ठेवण्याजोगी खरी.

**तुकोजी**—(आवेशानें) समर्नात मंजे वो! आयिक्तानां माज्या आंगावर तर काटॅ वुबॅ -हायिलॅ.

**पेशवे**—(हरीपंतांस) बरें आतां तुह्मी मेल कोटास लाट साहेबास

मटल्यानंतर पुढं काय काय केलें तें सांगा.

हरी—(हात जोडून) आज्ञा. त्यानंतर टिपूच्या बारा महाल प्रांत व श्रीरंगपट्टणाच्या वाटेवरचे किल्ले घेण्याचें ठरवून आह्मीं विशेष श्रमावांचून तें काम संपविलें. इतक्यांत निजामाचा मुलगा शिकंदरजा हाही येऊन पोंचला. मग आह्मी तिघांनीं आपल्या सर्व फौजा एकत्र करून श्रीरंगपट्टणावर स्वारि केली. तेथें पोंचल्याबरोबर टिपूचें बुणगें जें तटाबाहेर होतें, तें प्रथम हुसकून दिलें, आणि किल्याला वेढा दिला. अंत टिपू होताच. आह्मांपैकी कोणी त्याशीं सांगण्यासारिखी लढाई केली असें नाहीं. परंतु आह्मा तिघांची जूट आणि फौज पाहून तो लुच्चा घाबरला, आणि आइयाच विद्यमानें तहाचें बोलणें करूं लागला. त्याचा निःपात करण्याचा आपला निश्चय खरा; परंतु तसें केल्यानें इंग्रज निर्धास्त झाले असते. ह्मणून तुर्त तह करून त्याला तसाच राखून ठेविला. तहांत असें ठरलें कीं, त्याचा अर्धा मुलूख आह्मी तिघांनीं वाटून घ्यावा, आणि त्यानें एक कोटि पासष्ट लाख रुपये रोख व तितकीच रकम पुढे एक वर्षांत तीन हप्तयांनीं द्यावी. परंतु टिपू तो, त्यावर भरंवसा ठेवणें बरोबर नाहीं असें पाहून आह्मांकडे त्याचे दोघे मुलगे घेऊन शिकंदरजाच्या ताब्यांत दिले. त्यानें दिलेला मुलूख वांटून घेतां आमच्या वांटणीस कृष्णा आणि वरधा यांच्या मधला आणि सोंडूर प्रांत मिळून ४० लाखांचा मुलूख आला. या शिवाय ५५ लाख रुपये मिळाले. ते घेऊन आह्मी निघणार होतों इतक्यांत

भाऊही तेथें येऊन पोंचले. नंतर आह्मी उभयता मिळून इकडे निघून आलों; आणि शिकंदरजा व लाट कानवाली हेही आप आपल्य ठिकाणांस गेले.

**नाना**—तुर्त झालें हें फार ठीक झालें. टिपूनें आह्माशीं फार लबाडी केली आहे; त्याला रसातळास घालायाचें खरें; पण तुर्त तर त्याला झिजवूं या.

**पेशवे**—आणखी आह्मांकडचें एकही मनुष्य नमरता आपणांस येवढा लाभ झाला, ही सर्वांत उत्तम गोष्ट झाली असें मला वाटतें. बरें, आतां पटवर्धनांचें वर्तमान ऐकूं या.

**परशु**—(हात जोडून) माझ्या वर्तमानांत थोडीं बहुत माणसें पडल्याचें ऐकून श्रीमंतांस कदाचित् तितकें समाधान वाटणार नाहीं. परंतु झालें तें चरणांपाशीं निवेदन करितों.

**पेशवे**—(किंचीत निष्ठुरतेनें) पटवर्धन, मनुष्यें आगदींच न मरावीं असें माझें मत्त नाहीं. अपेश घेऊन जगण्यापेक्षां लढाईत मरावें हेंच शूराला योग्य आहे. परंतु लढाईवांचून आपला हेतु सिद्धीस जात असलातर निष्कारण लढाई माडूं नये, इतकेंच माझें ह्मणणें आहे.

**परशु**—(हात जोडून) क्षमा असावी- श्रीमंतांची अज्ञा घेऊन मी येथून निघाल्यानंतर लवकरच प्रतिनिधि, धोंडोपंत गोखले, सचिव वगैरे सरदार येऊन मिळाले; व इंग्रजांच्या दोन पलटणीही आल्या. या सर्वांसहित धारवाडाला गेलों, आणि त्या किल्यावर तोफा सुरूं केल्या. तोफांचा मार चागला लागू होत नाहीं असें पाहून तटाला शिड्या लाविल्या मग बरीच चकमक झाली. आमचे समारें [illegible]

लोक मेल्यानंतर पेंठ हातीं लागली. ती माझ्या अप्पाच्या ताब्यांत देऊन मी छावणीवर आलों. इतक्यांत किल्ले- कऱ्यांनीं पेठेंत उतरून फार धांदल केली. अप्पा मोठया शर्थीनें लढला, आणि दोन घटिकांच्या आंत हजार पंधराशें किल्लेकरी त्यानें लोळविले. माझा ह्मणून मी त्याला वा- खाणितों असें कोणाला वाटेल; परंतु खरोखर त्याचें शौर्य पाहून मलाही मोठें आश्चर्य वाटलें. त्या लढाईत आमचेही पांच चारशें लोक पडले. इतकें झाल्यानंतर राहिलेले किल्लेकरी पळून किल्ल्यांत गेले. मग पेठेंत सर्व स्वस्थता झाली असें पाहून अप्पाला फार जखमा लागल्या होत्या, ह्मणून तो मला भेटण्याकरितां बाहेर आला. तों किल्ले- कऱ्यांनीं पुनः दंगाकरून आमच्या लोकांस हांकून लाविलें, आणि पेंठ परत घेतली.

**पेशवे**—(खेदानें) हो, हो; तुमच्या चिरंजीवांनीं त्या समयीं बाहेर येण्याचें नव्हतें.

**परशु**—तरी त्यानेंच पुनः तो अभिमान धरिला; आणि आमच्या सर्व सरदारानींही झटून त्याला मदत केली. गोरे मात्र फुगून बसले. ते ह्मणूं लागले कीं, पहिल्यानें आह्मी शर्थ करून पेंठ मिळविली होती, ती आतां तुह्मी घालविली. तेव्हां तुह्मी आतां स्वस्थ बसा ह्मणून त्यांस सांगून आमच्या लोकांनीं कंबरा बांधिल्या. मग बाहेर आह्मी उगेच पडून राहिलों आहों असें दाखवून आंतल्या आंत तयारी केली, आणि रात्रीं एकाएकीं किल्यालाच शिड्या लाविल्या. पे- शव्यांच्या सरदरांनीं शिड्या लाविल्या, आणि किल्ला मिळाला

नाहीं असें कधीं झालें आहे?

**पेशवे**—शाबास, एकूण किल्ला त्याच सपाट्याला घेतला तर मग.

**परशु**—(हात जोडून) या पायांचा प्रताप. शिड्या लावून सर्वांच्या पुढें मी, अप्पा आणि रास्ते असे तिघे चढून गेलों; मग आमच्या शिपाई लोकांच्या रांगा मुंग्यांसारिख्या आमच्या पाठीमागून वर येऊं लागल्या. इतके लोक किल्ल्यांत उतरले तरी एकाच्या तोंडांतून हूं कीं चूं नाहीं. तरी आमच्या पायांच्या अवाजांनीं किल्लेकरी जागे झाले. परंतु आमचे फार लोक आंत उतरले, व आजून उतरत आहेत असें पाहून ते मऊ आले; आणि आह्मांस जिवानिशीं जाऊंद्या ह्मणून मागून घेऊं लागले. त्याप्रमाणें आह्मीं त्यांस जाऊं दिलें, आणि किल्ला ताब्यांत घेतला.

**नाना**—वाहवा! पटवर्धन, यांत तुह्मी दोन गोष्टी केल्या. टिपूच्या लोकांलातर आपला पराक्रम दाखविलाच; त्याशिवाय इंग्रजांला ही दाखविला. बरे, त्यानंतर कोण कोणते किल्ले कसे घेतले?

**पेशवे**—त्यानंतर बंकापूर, होळी होनूर, शिवमोग्गा वगैरे कांहीं लहान मोठे किल्ले घेतले. पण यापैकीं कोणत्याही किल्याशीं फारसें लढावें लागलें नाहीं. नंतर बेदनुरास वेढा देणार होतों, इतक्यांत श्रीरंगपट्टणावर तह झाल्याचें ऐकून तिकडे चालता झालों.

**पेशवे**—(फडके व पटवर्धन यांस) तुह्मां उभयतांची स्तुतिकरून लोकांस जें माझ्यानें कळववेल, त्याच्या दसपट तुमच्या तरवारींनीं आणि लोकांनीं यापूर्वींच कळविलें आहे. आतां

तुह्मांस सांगणें इतकेंच आहे कीं, या गादीचा अभिमान तुह्मांस सर्वदा असाच असला पाहिजे. पेशव्यांची गादीही एकाची नव्हे, तर सर्व मराठे सरदारांची आहे. तेव्हां सर्व मराठे व ब्राह्मण सरदार यानींच तिचें रक्षण केलें पाहिजे. (इतकें बोलून नानास) नाना, मेजवानीच्या दिवशीं, उभयांस हजार हजार रुपयांची एकेक तरवार व रुप्याच्या अंबारीसुद्धां एकेक हत्ती बक्षीस देण्याची तयारी ठेविली पाहिजे.

**नाना**—आज्ञा.

मग पानसुपारी, अत्तर गुलाब वगैरे झाल्यानंतर सर्व उठून जातात.

## अंक तिसरा.

## पात्रें.

---

| | |
|---|---|
| सवाई माधवराव पेशवे | पुण्याचेराजे. |
| यशोदाबाई | त्यांचीस्त्री. |
| नानाफडनीस | प्रधान. |
| महादजीसिंदे, तुकोजीहोळकर, हरीपंतफडके, गोविंदराव गायकवाड, परशुरामभाऊ पटवर्धन, | सरदार. |
| आप्पाशास्त्री | न्यायाधीश. |
| दौलतरावसिंदे | महादजीचा दत्तपुत्र. |
| गोविंदराव पिंगळे | हैदराबादेस राहणारा वकील. |
| कृष्णाजीपंत | सिंद्याचाकारकून. |
| गणपतराव | नानाचा कारकून. |
| गोविंदहरी | एककारकून |
| इमामबक्ष | सिंद्याचा मुनशी |
| संताजी | पेशव्यांचा हुजरा. |
| अमीन | सिंद्याचा चोपदार. |
| गिरजा, तुळजा | यशोदाबाईच्या दासी. |

## स्थळ शनिवारवाडा.

### प्रवेश पहिला.

### पेशव्यांची बसण्याची खोली-

(पेशवे प्रवेश करितात, आणि मोठ्या काळजींत मुख म्लान करून लोडाशीं बसतात; इतक्यांत त्यांची स्त्री यशोदाबाई येत्ये आणि यजमानाची मुद्रा पाहून स्तब्ध उभी राहत्ये)

**यशोदाबाई**—(कांहीं वेळ उभी राहून) कां झोंप लागली आहे वाटतें?

**पेशवे**—(वर पाहून) वा, केव्हां आली स्वारी? या, बसा (हात धरून जवळ बसवून घेतात)

**यशो**—बसून काय करूं? योगभ्यास चालला आहे तो चालूं द्या. मी आपली जात्यें.

**पेशवे**—छे, छे, माझा कसचा योगाभ्यास! एकटा होतों ह्मणून मनांत कांहीं विचार घोटाळूं लागले होते. आतां ते सगळे गेले.

**यशो**—कसचे विचार ते? केव्हां पाहावें तेव्हां असेंच. घटकाभर जिवाला सुख नाहीं जळलें.

**पेशवे**—असूंद्या करितां काय? वेळ येईल तसें वागलें पाहिजे. हेही दिवस जातील.

**यशो**—झालें काय पण? आपल्याच मनांत चुरमुरत असावें. मी नाहीं कां अर्धी वाटेकरीण?

**पेशवे**—होय. पण बायकांनां कशाला पाहिजे? त्यांना सुख देववेल तितकें द्यावें, चिंतेत आणि तापत्रयांत त्यानां घालूं नये, हा पुरुषांचा धर्म आहे. दुःखाचे पूर्ण भागीदार

आह्मीच समजलें पाहिजे.

यशो—नाहीं, नाहीं; मी कधीं ऐकायाची नाहीं. सांगितलेंच पाहिजे. (लार्डीनें हात धरून हालविले)

पेशवे—(क्षणभर स्तब्ध बसून दीन मुद्रेनें स्त्रियेच्या तोंडाकडे पाहातात; मग उद्गारानें) येशोदे, काय सांगूं! मला आतां या जगांत माझें असें मनुष्य कोणीच राहिलें नाहीं. जिला लोक माझी आई ह्मणतात, तिजजवळ सुद्धां समयानुसार एकादी गोष्ट बोलून दाखविली तर त्यापासून भलतेंच कांहीं तरी होतें.

यशो—अगे बया, ती कसली आई! पण तिच्या जवळ काय बोलणें झालें?

पेशवे—मी परवां बोलतां बोलतां तिजजवळ सहज इतकेंच ह्मटलेंकीं, नानाचें मन फार संशयी आहे; सिंदा इतक्या इमानें इतबारें आपणांशीं वागत असतां ते विना कारण त्याचें मन दुखवितात.

यशो—असें कशाला बोलावें! तिनें तें त्याला कळविलें असेल.

पेशवे—होय, तसेंच झालें. आणि त्यावरून नाना मला फार टाकून बोलिला; तेव्हांपासून मला कांहीं सुचेनासें झालें आहे.

यशो—(रागानें) त्या थेरड्याचा कशाला इतका दिमाक? सुनेप्रमाणें सारावेळ त्याची जाचणी कां सोसावी! बंदोबस्त नाहीं कां करवत?

पेशवे—एका क्षणांत; पापणी हालते नहालते इतक्यांत करीन. परंतु तें अविचाराचें कर्म होईल, आणि पुढें आपणाला पश्चात्ताप करावा लागेल. आतां मला मात्र त्याची कांहींशी

इजा आहे; परंतु दरबारचें काम त्यानें एकंदरींत बरें चालविलें आहे. त्याच्याइतका अनुभविक, हुषार आणि विचारी मनुष्य आपल्या दरबारांत थोडाच आहे. त्याच्या अब्रूंत किंवा अधिकारांत कांहीं कमजस्त झालें तर फडके, पटवर्धन वगैरे मोठ मोठे खात्रीचे लोक आह्मांस सोडणार. महादजी या सवाला खिशांत टाकण्यारिखा आहे खरा; परंतु इतक्यांत त्याजवर येवढा मोटा भरंवसा ठेवणें बरोबर नाहीं. येव्हड्याच करितां तुर्त ह्याचा उद्धटपणा सोसणें जरूर आहे.

**यशो**—बरें तर; तो एक कुत्रा आपण बाळगला आहे ह्मणून समजावें ह्मणजे झालें. ह्याचें बोलणे मनांत आणूंनये; आपल्या पायांतला किडा; तुडवून चिरडायाला किती उशीर लागणार?

**पेशवे**—होय मीही तसेंच समजून आहे. पण, कोणरे तो? संताजी,

**संताजी**—(हात जोडून) सर्कार, फन्नीस आल्यात.

**पेशवे**—( संताजीला) येउंदे. (येशोदाबाईला) तुह्मी चला आतां.

**यशो**—मग मला येण्याबरोबरच सांगायाचें होतें ;ह्मणजे तिकडच्या तिकडेच गेल्यें असत्यें. (उभीराहून) घटकाभर सुद्धां मनमोकळें करून बोलायाचें नाहीं; सारावेळ आपल्याच कामांत.

**पेशवे**—काय, हावेळ पर्यंत मन बांधून ठेवून बोललों काय? मग आणखी बोलूं. (यशोदाबाई जाये, नाना प्रवेश करितो)

**पेशवे**—(नानास जवळ बसवून घेऊन) कां नाना, आतां बरें

झालें कीं नाहीं? सिंद्यानें इतकी खटपट केल्यानंतर ही आह्मीं त्याचें बोलणें मान्य केलें नसतें तर आह्मी दोषास पात्र झालों असतों.

**नाना**—मी बोलतों ह्मणून राग मानूंनये. आतां आपल्या आंगीं प्रौढता आली. कंचीही गोष्ट करणें झालें तर दूरवर नजर देऊन करीत जा, ह्मणजे झालें; इतकेंच माझें सांगणें आहे.

**पेशवे**—एकून मी सिंद्यास रुकार दिला तो तुमच्या पसंतीस आला नाहीं तर!

**नाना**—आपण कचेरीस बसून एकाएकीं हूं ह्मटलें, त्याला माझा काय उपाय आहे!

**पेशवे**—नाना, सिंद्याचा प्रामाणिकपणा, सहनशीलता आणि श्रम हेकांहीं तुह्मी मनांत आणितनाहीं हें मला मोठें आश्चर्य वाटतें.

**नाना**—(किंचित् उग्रतेनें) त्याचा कंचा प्रामाणिकपणा आणि कंची सहनशीलता आपण पाहिली?

**पेशवे**—पाहा हिंदुस्थानांत त्यानें किती दिवस कष्ट सोसिले, किती लोकांशीं तो भंडला, शेवटीं त्यानें आपला अंमल कसा बसविला, आणि किती तो अब्रूस चढला; ह्या सर्व गोष्टी आह्मांकडून सांगून घेऊन त्यानें केल्या? अथवा सांगण्या सारिखी कुमक तरी आह्मांकडून त्याला मिळाली?

**नाना**—नाहीं; चालूंद्या.

**पेशवे**—इतकेंही करून दिलीची बादशाही सुद्धां भोगण्याचें साम र्थ्य त्याच्या आंगीं असूनही त्यानें तसें केलें नाहीं, आमचा धनीपणा स्मरला; आणि जो अधिकार त्यानें दिलीच्या दर

वारीं स्वतः स्वीकारला असतातर कोणाच्यानेंही दोष देव विला नसता, तो त्यानें आह्मांकरितां संपादिला, आणि त्या ची सनद आतां आणिली आहे.

**नाना**—होय हें सर्व खरें आहे.

**पेशवे**—बरें, इतक्या शौर्यानें आणि हौसेनें जो गृहस्थ आह्मांस भेटण्याकरितां आला, त्याला आपण कोणत्यारितीनें वागवि लें ? त्याला बेटावर येऊन उतरून आज नववा दिवस. परंतु काल पर्यंत तुमची सुद्धां त्याला भेट नाहीं. आणि तुह्मी अनुमोदन दिलें तेव्हां तो आज माझ्या भेटीस आला

**नाना—यांत काय** वावगें झालें ?

**पेशवे—**तो तुह्मीच पाहा आतां. इतकाच त्याचा आह्मि अपमान केला असें नाहीं; तर त्यानें संपादिलेल्या सनदेला उलटा दोष दिला; आह्मी घरबसल्या ठिकाणीं दिल्लीच्या बादशाहाकडून वकील मुतलखीची सनद चालून आली असतां तिचा धिकार केला; हेंबरें केलें काय ?

**नाना**—त्या 'सनदेंत पेशव्यांनां 'महाराजाधिराज' ही पदवि दिली नसती तर ती स्वीकारण्याला कांहीं हरकत नव्हती. त्या पदवीचे मालक छत्रपति, आह्मी नव्हे.

**पेशवे**—बरें आतां छत्रपती महाराजांकडूनही त्यानें परवानगी आणिली. आतां आह्मी त्या सनदेचा अंगीकार नाहीं केला तर त्याला किती वाईट वाटेल पाहा.

**नाना**—अतिशय वाईट वाटेल यांत संशय नाहीं.

**पेशवे**—शिवाय नाना, आणखी एक मोठी गोष्ट राहिली. वकील मुतलखीच्या सनदेबरोबर सिंद्यानें आणखी एक

सनद आणिली आहे. तींत ज्या मुसलमान लोकांनीं आज हजारो वर्षें आमच्या देशांत पाहिजे तसा अंमल चालविला, पाहिजे तशीं अन्यायाचीं आणि अधर्माचीं कृत्यें केलीं, त्यांच्या बादशाकडून याउपरांत आपल्या मुलखांत कोठेंही गोवध होऊं देणार नाहीं ह्मणून कबूली घेतली आहे. हा त्याचा सामान्य पराक्रम काय? इतकें सर्व करून तो आपल्या शौर्याची थोरवी आह्मांला देऊं इच्छित आहे, तर ती आह्मी स्वीकारूंनये! काय न्यायहा!

नाना—ह्मणून आपण स्वीकारतों ह्मणून सांगितलें तें फार बरें केलें.

पेशवे—असें नव्हे; तुह्मी मन छपवून बोलूंनका. तुमचें हार्द काय आहे तें मला कळूंद्या.

नाना—मी काय बोलूं आतां! बोलण्याचा हा प्रसंग नव्हे; सिंद्यानें आपलें मन फार वेधिलें आहे. तुर्त होईलतें पाहात जावें हेंच बरें आहे. तत्रापि इतकें मात्र सुचवितों कीं, वाघाला फसवून सांपळ्यांत आडकविल्याप्रमाणें तो करील; जपा, सावध राहा. छत्रपतीला पेशव्यांनीं निर्माल्य केलें, आणि पेशव्यांला सिंद्यानें निर्माल्य केलें, असें मात्र होऊंनये. सिंद्याचीं कृत्यें आतां फार सुशोभित आणि गोजीरवाणीं दिसतात; परंतु तीं जाळ्यांतले शिशाचे गोळे आहेत; त्यांला पाहून भुललां तर खचीत जाळ्यांत गुंताल हें चांगलें लक्षांत ठेवा. मी जातों आतां. (असें ह्मणून तो वेषानें निघून जातो, आणि पेशवे वर पाहात तक्यावर ध्यानस्थ पडतात, इतक्यांत कृष्णाजीपंत प्रवेश

करितो)

**पेशवे**—(बराच वेळ विचार करून मागें वळून) कोण, कृष्णाजी पंत?

**कृष्णा**—सरकार, (हात जोडून पुढें उभा राहातो)

**पेशवे**—कां आला होतां?

**कृष्णा**—दादासाहेबांनीं पाठविलें होतें. बाईसाहेबांस तिकडे जाण्याविषयीं आज्ञा असावी.

**पेशवे**—कोठें, बेटावर?

**कृष्णा**—होय.

**पेशवे**—विचारा बुवा; त्यांची मर्जी असल्यास मजकडून आडथळा नाहीं. पण दादानीं खूब तयारी केली असेल, नाहीं?

**कृष्णा**—फार मेहेनत घेतलीआहे. आज सकाळीं कचेरीहून परत आल्यानंतर जे कंबर बांधून उभेराहिले ते आतां आंघोळीला गेले. हा वेळ पर्यंत तोंडांत पाणी नाहीं; सारा वेळ राहुटींतून आणि डेऱ्यांतून हिंडत होते.

**पेशवे**—अशी तयारी तरी काय काय केली आहे?

**कृष्णा**—सर्व डेरे तमाम किनखाबाचे उभे केले आहेत. आणि ज्या डेऱ्यांत दरबार भरायाचें, तो तर सगळा भरजरी आहे. त्यांतच बादशहाच्या सिंहासनासारिखी एक बैठक तयार करून तिच्या डाव्या बाजूला श्रीमंतांकरितां रत्नखचित बैठक माडून ठेविली आहे.

**पेशवे**—बरें;

**कृष्णा**—श्रीमंताच्या सिंहासनासमोर बादशाहा कडून आणिलेल्या सर्व चिजा मांडून ठेविल्या आहेत. त्या तर मज सारिख्या

गरीबाला अद्वितीय. त्यांतील हिऱ्या माणकांच्या प्रकाशानें डोळेच दिपून जातात.

**पेशवे**—काय काय जिनसा आहेत?

**कृष्णा**—दोन शिरपेंच, तुरा, बाहुभूषण जोड एक, पोहोंच्या जोड एक, कंठी, कुडक्या, भीकबाळी, कडीं तोडे, मोर्तब, कलमदान, दौत, दोन मोर्चलें, ढाल आणि तरवार. यांशिवाय नऊ वेग वेगळ्या तऱ्हेचे पोषाग आहेत; एक घोडा, सात हत्ती, एक पालखी, एक नालखी अशीं वाहनें आहेत.

**पेशवे**--फारच खटाटोप मांडिला तर मग हा.

**कृष्णा**—हौसेचें काम आहे. उद्यांचा दिवस तर आह्मां सर्व लोकांना स्वर्गीचें वैभव दृष्टीस पडेल. आतांच दुरून पाह्लिें तर तामड्या, पिवळ्या, निळ्या डेऱ्यांच्या रांगांनीं शहराला जी शोभा आली आहे, ती यापूर्वी कधींच आली नसेल असें वाटतें. उद्यांतर सरकार वाड्यापासून छावणी पर्यंत दुबाजू पायदळ, घोडेस्वार आणि हत्ती यांच्या रांगा भरजरी पोषागाच्या एकामागें एक क्रमानें उभ्या करण्याची तयारी ठेविली आहे.

**पेशवे**—हें अतिशयच केलें असें मला वाटतें. असो, तुह्मी शोधघ्या; येण्याची त्यांची मर्जी असली तर घेऊन चला पाहूंदे.

(असें सांगून उठून जातात)

——000——

## प्रवेश २.

सिंद्यांच्या छावणींतला दरबारचा डेरा.

(कृष्णाजिपंत प्रवेश करितो)

**कृष्णा**—कोन हय्, चोपदार.

**अमीन**—(धांवत धांवत येऊन) जी साहेब (सलाम करितो)

**कृष्णा**--कीधर गया था?

**अमीन**—ह्यांयी नजीकके तंबूमे था, साहेब.

**कृष्णा**—सवारि आयी, ह्यां हाजर रहो; किधर जाव् मत्.

**अमीन**—आछा, साहेब.

**कृष्णा**—सब् बंदोबस्त बराबर हये?

**अमीन**—जी साहेब.

(कृष्णाजी पंत घाई घाईनें निघून जातो. कांहीं आवकाशानें पेशवे प्रवेश करितात; व त्यांच्या मागून फडके, पटवर्धन, रास्ते, सिंदे, होळकर, गायकवाड वगैरे सरदार; निंबाळकर, डफळे, घाडगे, घोर्पडे वगैरे मानकरी; नानाफडणीस, प्रतिनिधि, सचिव, आमात्य वगैरे मंडळी प्रवेश करितात)

**महादजी**—(सर्व मंडळी आप आपल्या जाग्यावर उभी राहिल्यानंतर पेशव्यांस हात जोडून) सरकार (बोटानें दाखवून) ह्ये बाछायी तकत हाय्. यावर येकसे योक झोरा ठेवूनशानि तीन येळ खुर्निसा कराव्या; आन् मग सरकारानीं (पेशव्यांच्या-बैठकीकडे हात दाखवून) बसाव.

**पेशवे**—बरें आहे (असें ह्मणून त्या प्रमाणें करितात; मग सर्व लोक बसतात) हा समारंभ सगळा दिल्लीच्या दरबारीं व्हावयाचा.

**होळकर**—(हात जोडून) जी सरकार. पन आमचे दादा हायत तत दिल्लीचीं हाय आन् समदची हाय.

**नाना**—होय, होय; यांत काय संशय?

**महादजी**—यित्की बडयी माला कशाला गरिबाला, नाना?

**हरीपंत**—खरेंच इतकी फार कशाला?

**महादजी**—आमचें हारिपंत लै गमतीं.

**नाना**—(सिंद्याकडे पाहून) हूं, आतां उशीर कशाला? सनद कोठें आहे ती?

**महादजी**—ततेंच तकतावर, सनदबी सारेंबी.

**नाना**—घ्या तर उठा, ठेवा यजमनांपुढें.

**महादजी**—(हांसत) ह्ये काम आपुनच केलें पायिजे.

**नाना**—(व्यंगोक्तीनें) असें कसें होईल? मला दुसरें कांहीं काम सांगा पाहिजे तर.

**महादजी**—(घोटाळल्यासारिखा होऊन हरीपंताकडे पाहून) कां हारीपंत, कसें करावें.

**हरीपंत**—(हलकेंच) घ्या आतां आलें खरें नशीबाला; करितां काय?

**महादजी**—बरें तर; (तक्तावरची सनद घेऊन पेशव्यांपुढें ठेवितो, आणि तीन वेळां जमीनीस हातलावून मुजरा करितो)

**पेशवे**—(सनद वर उचलून धरून सर्व सभेला) ही सनद घेण्याला कोणाची कांहीं हरकत आहे?

**गायकवाड**—(कोणी बोलत नाहींत असें पाहून) कोनाचीबी हारकत हाय् असें दिसत न्हाय्.

**पटवर्धन**—हरकत कां असावी?

**पेशवे**—(कोणी विरुद्ध बोलत नाहींत असें पाहून) बरें तर, सर्वांच्या संमतीनें (नानाकडे पाहातात; तो तोंडखालींकरितो) ही आह्मीस्वीकारिली आहे. (सनद उघडीत सिंद्याकडे

पाहून) दादा तुमचे मुनशी कोठें आहेत?

**महादजी**–(हातजोडून) जवळच हायत सरकार. (मुनशीला हाकमारून पेशव्याजवळ उभा करितो)

**पेशवे**–(त्याच्या हातीं सनद देऊन) पढो.

**मुनशी**–हुकुम सरकार (वाचूं लागतो)

"नाझिमे मुनाझिमे मुल्कोमाल नाहिजे मुनाहिजे दौलत व इखबाल श्रीमंत माहाराजाधिराज सवाई माधवराव नारायण पेशवे रा एलाम् आंके–

**दरींविल**–तुम्नें जो मशरुल् महाम् महादजी सिंदेकूं मुल्क हिंदुस्थानकी बंदोबस्तीके वास्ते मोकरर किये होसो, मशारनिल्हेनें आपनें खुशीसे बहुत इमानदारी व एतेबारके सात मुल्क हिंदुस्तानका बखूबी इंतेजाम किये, और बवजेह अहसन् हम्से मोहब्बत और दोस्ती रखे; इस्वास्ते हम् बहुत खूश् होकर तुमकू आपनें दर्बारका वकील मुतलख् बनायें. मगर् तुमसे हमेशा हमारे दर्बारकी हाजीरबाशी नहो सकेगी, दरीं सुरत् तुम् आपने जानीबसे मशरुल् महाम् सिंदेकूं आपना नायब बनाकर इस् दर्बाकारके कारवायीकी तजविज् रखें. लाजीम्के, तुम् वो खिदमत् आजराहे मेहरबानी कबुल करें"

**महादजी**–मुनशी साहेब जरा टैरो. (तक्तावरचा दुसरा कागद घेऊन त्याच्या हातीं देतो) येवी पढो.

**मुनशी**–आछा. (वाचूं लागतो)

"दरींविला– सिंदे बाहादूरनें हमारे हुजूरमे जाहिर कियेके, मादा गावू हिंदू लोगोंका परीस्तिश्का जान्वर हाय. और

आपनें मुल्कके आक्सर हिंदू रय्यत उसकी परिस्तिश् कर्ते हैं· इस्वास्ते आगर गाव् कुशी ना होनेके वास्ते हुकूमे अशरफ् सा दिर होवेतो हमारी रय्यत हमसे बहुत खुश् रहेगी; अलल् खसूस पेशवा ओंकी दोस्ती व मोहबत कायम् होगी. लेहाजा बहादूर मोयिंज्के यिज्हारकूं नजरमे लाकर आपनें अमल्दा रोंकूं गाव्कुशी ना होनेके लिये हुकुम् देनेमें आया हय्."

(वाचणें संपल्यानंतर सर्व लोकांच्या तोंडांतून वाहवा ह्मणून एकच गजर होतो)

**हरीपंत**—शाबास! सिंद्यांनीं ही मोठी तारीफ करण्या जोगी गोष्ट केली खरी. पहिली सनदही मोठया मानाची आणि अभिमान बाळगण्या सारिखी खरी; परंतु ब्राह्मण आणि शिपाई या दोन नात्यांनीं मी या दुसऱ्या सनदेला विशेष मान देतों. दिल्लीच्या बादशाहाकडून गाई मारणार नाहीं ह्मणून आमचे लोक दस्ताऐवज घेतील ह्मणून आमच्या बाप अजांच्या स्वप्नींही आलें नसेल. परंतु अशी दुर्घट गोष्टही अलीजा बाहाद्दर माहादजी सिंदे यांच्या प्रतापानें आज घडून आली.

**महाद**—ह्मराज, माज्या गरिबाची काय मातबरी हाय! कर्नार करिवनार धनी समर्त (पेशव्यांकडे दाखवून) बसले हायत. ह्येंचा पर्ताप् आन् किरत तिर्बुवनांत गाजतिया. यांसंगं दोस्ती कराया कोन झटनार न्हाय्! (इतकें बोलून वस्त्रें आणि अलंकार पेशव्यांपुढे ठेवून हात जोडून) सरकारांनीं हे आंगावर घालावे. तीं (बोट दाखवून) खोली तयार हाय्,

**पशेवे**—आंगावर घातलेच पाहिजेतका! (नानाकडे पाहातात)

**नाना**—होय, हा समारंभाचा समय आहे; आतांच ते अंगावर धारण केले पाहिजेत.

**पेशवे**—बरें तर. (असें ह्मणून उठतात; त्यांबरोबर सर्व लोक उठतात. महादजी ते दागिने आणि पोषाग खोलींत नेऊन ठेवितो, आणि पेशवे तेसर्व अंगावर धारण करून येऊन आपल्या बैटकीवर बसल्यानंतर सर्व लोक बसतात)

**महादजी**—(अत्यंत हर्षाच्या उद्गारानें) आता बगा, कसा माजा धनी देवावानी सोबतो. हारिपंत, चला आपुन दोगे मोर्चालं घेऊं.(तक्तावरचीं मोर्चेलें घेऊन एक हरीपंताकडे करितो)

**हरीपंत**—ठीक आहे; मीही वाटच पाहात होतों

(मग उभयता पेशव्यांच्या दोहों बाजूस उभे राहून मोर्चलें धरितात).

**नाना**—आतां माझें काम मला करूंद्या (असें ह्मणून तक्तावरील मोर्तब, दौत, कलमदान, ढाल आणि तरवार घेऊन पेशव्यांच्या गादीवर व्यवस्थेनें मांडून ठेवितो)

**पेशवे**—आजचा दिवस मोठ्या उमेदीचा आह्मी समजतों. आज जीं हीं वस्त्रें आमचे अवल दर्जेचे सरदार आणि जीवलग मित्र अलीजाबाहादूर माधवराव सिंदे यानीं आह्मांकरितां आणिलीं, तीं नौकरीचीं नव्हेत; तर उत्तर देश सगळा आपलासा केल्याचीं चिन्हें आहेत असें आह्मी समजतों. असा हर्षाचा दिवस आह्मांला हा पहिलाच नव्हे; मागें कितीएकवेळां आमचे यशस्वी सरदार फडके, पटवर्धन, होळकर वगैरेनीं याच भासल्याचे दिवस दाखविले आहेत. असो, सांप्रत परमेश्वरापाशीं आमचें इतकेंच मागणें काहे कीं, या शूर लोकांचा

यथायोग्य परामर्श आमच्या हातून वेळोवेळीं घडो, आणि याचा धनी ह्मणविण्याची योग्यता आह्मांमध्यें आहे असें जगाला दाखविण्याचा प्रसंग लवकर येवो.

**महादजी**—(हलकेंच) नाना, आतां नजराने सुरुं करावे न्ह, यी?

**नाना**—होय, आणि आपणच आरंभ करावा.

**महादजी**—बर हाय (असें ह्मणून पेशव्यांपुढें नजराणा ठेवतो, आणि मुजराकरून आपल्या कामावर उभा राहून नाच सुरू करण्याला कृष्णाजिपंताला सूचना करितो. मग सर्व सरदार आप आपल्या योग्यते प्रमाणें नजराणे ठेवितात ).

**पेशवे**—(नजराणे वर्स ठेवून झाल्यानंतर) दादा, आतां काय राहिलें?

**महादजी**—(हात जोडून) सर्कार, काय न्हाय. गरिबाचा मनोरत पुर्न झाला; आज मला सवरगाचें सुख मिळालें.

**पेशवे**—(नानाकडे पाहून) तर मग येथल्या दरबारचें काम अटपलें.

**नाना**—होय, उठावें, नालखींत बसावें आतां. विडेही वाटून झाले. अजून वाड्यांतकचेरी भरली पाहिजे.

(मग पेशवे उठतात,आणी त्यांबरोबर सर्व लोक उठतात)

---

## प्रवश ३.

शनिवार वाड्यांतली कचेरी.

(कृष्णाजिपंत व गोविंदहरी प्रवेश करितात)

**गोविं**—कां कृष्णाजिपंत, तुह्मी पुढें आलेतसे?

**कृष्णा**—होय, मागाहून गर्दीतून लवकर येण्यास सांपडणार नाहीं ह्मणून जरा पुढेंच घोडा दाबला. स्वारीही आली; हा

पहा, नगाऱ्यांचा आणि डंक्याचा अवाज अगदीं जवळच ऐकूं येतो.

**गोविं**—रस्त्यावर तर खुब गर्दी बुवा.

**कृष्णा**—छे, ते कांहीं पुसूंनका; अशी गर्दी मी जन्मांत पाहिली नव्हती. रस्त्यांच्या दोहोंबाजूंच्या भिंती जशा काय माणसांच्याच बांधिल्या आहेत; जिकडे पाहावें तिकडे हत्ती, घोडे, मेणे, पालख्या, रथ भरून गेले आहेत.

**गोविं**—आजच्या स्वारीचा थाट तरी खूब मजेचा आहे ऑ.

**कृष्णा**—हें काय विचारायाचें? पेशव्यांची आणि सिंद्यांचा सगळी संपत्ति आज चमकूं लागली आहे.

**गोविं**—अशी संपत्ति आपण कधीं पाहिली नाहीं.

**कृष्णा**— श्रीमंतांकडे तर या चर्म चक्षूंनीं पाहावत नाहीं. तो तुरा! तो शिरपेंच! ती कंठी! तीं बाहुभूषणें! आहा हा हा!!! जसा काय स्वर्गींचा सूर्यच मृत्युलोकीं उतरून आला आहे! आधींच मुखश्री भव्य आणि सुरेख; त्यांत अळंकारांची चकाकी जडली; मग काय विचारता! एकादा अमोलिक हिऱ्याला कोंदण घातल्या सारिखें झालें! आह्मीं आज आपणांला खचीत धन्य मानिलें पाहिजे.

**गोविं**—अंबारींत कां बसले नाहींत बरें? ह्मणजे सर्व लोकांनां चांगले दिसले असते.

**कृष्णा**—नालखी इकडे फारशी नाहीं, आणि मुद्दाम ती तिकडून आणिली आहे; याकरितां तींतच बसलें पाहिजे ह्मणून आमच्या यजमानांचा आग्रह पडला.

(इतक्यांत चोपदारांचा ललकारा ऐकून दोघेही निघून

जातात, आणि पेशवे सर्व मंडळी सहित प्रवेश करितात)

**पेशवे**—(सर्व मंडळी बसल्यानंतर) बरें आतां नाना, आपणां-कडचीं वस्त्रें आणि सनद आणवा.

**नाना**—(हात जोडून) आज्ञा, (मागें वळून) गणपतराव, आणा कोठें आहेत तीं.

**गणप**—येथेंच आहेत (पेशव्यांपुढें तीं नेऊन ठेवितो)

**पेशवे**—(उठून उभे राहातात, आणि सर्व लोक उठतात; मग सिंद्याकडे पाहून) दादा आतां माझी पाळी आहे. हीं घ्या (असें ह्मणून सनद आणि वस्त्रें सिंद्याच्या हातीं देतात)

**महाद**—(पेशव्यांच्या पायांवर डोकें ठेऊन हातजोडून) सर्कार गरीब चाकरावरही मोटी मेर्बानी झाली.

(सर्व बसतात)

**हरिपंत**—असें ह्मटलेंच पाहिजे.

**पेशवे**—नाना, सनद सर्वांनां वाचून दाखवा.

**नाना**—आज्ञा. (सिंद्याच्या हातांतूना तो कागद घेऊन उभ्यानें वाचूं लागतो)

"राज महाराज मशरुल् महम् अलीजा बाहादूर माधवराव सिंदे यांस—

ऐशीजे—आपण बहुत दिवस हिंदुस्थान देशांत राहून पेशवाई अंमल खातरी जोगा बजाविला, आणि दिल्लीच्या दरबाराशीं दोस्ती राखून तेथें पेशवे सरकारची आब्रू वाढविली. याजकारितां आह्मी बहुत खुष् होऊन आपणांस आमच्या हाताखालीं दिल्लीच्या दरबारीं नायब वकील मुतलख नेमिलें आहे तर त्या दरबारीं हाजर राहून हरएक बाबदींत आमचा

उजूर न धरितां आपण मुखत्यारीनें आमचीं कामें बजावित जावें. या कामावर आपल्या घराण्यांतील कोणी हुषार मनुष्य वकनपर नेमण्याची मुखत्यारीही आपणांस दिली आहे."

**पेशवे**—खरोखर आह्मी हा अधिकार दादांना मोठ्या प्रीतीनें देतों. या कामाला तेच लायख आहेत.

**महाद**—(हात जोडून) सर्कार, धन्यांनीं मानली ह्मनून माजी लायकी; न्हायंतर माजी किंमत किती! सरकारचे जोडे उचलणारा चाकर; आन् ह्यादवा पाटील ह्मनून कोनीं ह्मतलॅ तर त्येवड्यानें फुगून बसनारा गडी. येवडी पद्वी, येवडा हुद्दा मला सोबत न्हाय्. पण धन्यांनीं ह्मेर्बान होवून दिला तवा होय ह्मतलेंच पायिजे. रंकाचा राव कर्नार थोर समर्त हायेत. सादू संतांच्या पावलांखालची माती ह्मोट ह्मोठ्या पिर्थीपतींच्या कपाळावर चडून बसती. तशी गत हा ह्यादवा पाटीलबी दिलीच्या दरबारीं वकतपर पेशव्यांच्या नांवावर सोबेल. न्हायंतर त्येची चाक्री त्येला हायेच.

**हरीपंत**—वाहवा, पाटील! भली गंमत केली. हिंदुस्थानाचे पाटील खरे.

**पेशवे**—त्यांनीं आपणांकडे कर्तेपणा घेणें विहितच आहे.

**नाना**—विडे अत्तर गुलाब सुरू होऊंद्या.

**पेशवे**—(सर्वांस विडे पोचल्या नंतर) चला आतां.

(कचेरी बरखास्त होते)

---

**प्रवेश ४——यशोदाबाईचा महाल.**

(दोघी दासी प्रवेश करितात)

**गिरजा**—तुळजे, ती फुलें गॅ कुट टेवलीस? मी मगाच्यानं सोत्ते.

**तुळजा**—कस्ली फुलें ती?

**गिरजा**—डोळ्यातली. फुलें कस्ली असत्याती ह्मयीत न्हाय?

**तुळजा**—अगॅ पन कंची फुलें, गुलाबाची कीं मोत्याची?

**गिरजा**—मोत्याची, मोत्याची.

**तुळजा**—कंशाला! चोरून न्यायाला!

**गिरजा**—तु चोरून नेत अस्तीस वाटतें, तुज्या सायन्या कर्ता; इश् हिडीस् मेलें काय लांड! दळूबायी.

**तुळजा**—ह्मनूनच डोळें मारीत अस्तीस न्हयीकां! आन् रात्रं आंदारात जिन्यामंदी खेला आडवीत अस्तीस.

**गिरजा**—कंदींगॅ, माजी सवते.

**तुळजा**—सवत व्हाया बगतीस, पन होवू देतें कोन?

(इतक्यांत यशोदाबाई प्रवेश करिते)

**यशो**—कायगे भांडतां कां?

**गिरजा**—बाईसाब, तुळजेनें फुलें काडून ठेविली हायेत; कवाच्यान मागते, देयीचना.

**यशो**—कायगे तुळजे, तू मोठी भांडखोर आहेस; फुलें कोठें आहे न? जा आण.

**तुळजा**—(तोंड खालीं करून) जी आनते.

(बाहेर जाऊन मोतियाच्या फुलांचे ताट आणून यशोदाबाईपुढें ठेविते)

**यशो**—(फुलें निवडीत) सुई दोरा आणागे.

**गिरजा**–(दोऱ्याची गुंडी आणि सूई आणून पुढें ठेविले) हीं घ्या बाईसाब.

**यशो**–(फुलें गुंफायाला लागून) गिरजे, फुलें इतकींच कायगे? यांत हार आणि दोन गजरे कसे होतील?

(इतक्यांत पेशवे प्रवेश करितात)

**पेशवे**–आजचा दिवस एकच कां गजरा होईना परता.

**यशो**–(वर पाहून लाजून हांसत उभी राहली) तें कां? फुलांला काय दुकाळ गेला?

**पेशवे**–बरें तर मग, आज चार गजरे झाले पाहिजेत.

(दासी निघून जातात)

**यशो**–ते कोणांकरितां?

**पेशवे**–दोन कोणाकरितां?

**यशो**–माझ्या यजमानांकरितां.

**पेशवे**–दुसरे दोन माझ्या यजमानिनीकरितां.

**यशो**–यजमानीनें आपणच करून आपणच घालावे वाटतें.

**पेशवे**–मी करितों; मला ही सेवा घडावी कधीं? (असें ह्मणत झोंपाळ्यावर बसतात, आणि यशोदाबाईचा हात धरून तिला जवळ बसवून घेतात) हूं द्या आतां तें ताट वर.

**यशो**-खरेंच कां आतां गजरा करणार?(ताट वर घेले)

**पेशवे**–मग अजून संशय वाटतो काय?

**यशो**–नको गड्ये, हें काय? लोक हांसतील (सुई दूर लांबविले)

**पेशवे** हें कांहीं नाहीं, सुई द्या इकडे (एका हातानें तिचा दंड धरून दुसऱ्या हातानें सुई घेऊं पाहतात, पण ती देतनाहीं)

बरें तर नको, मी आपला अशींच फुलें वेणींत गुंफतों ह्मण जें झालें (एकेक फूल घेऊन गुंफूं लागतात)

**यशो**—कोणीं पाहिलें तर हांसतीलकीं आतां.

**पेशवे**—हांसले तर मला हांसतील—बरें, काल नानाच्या घरचें हळदकुंकूला बोलावणें आलें आसतां तुह्मी गेलां नाहीं.

**यशो**—हेम्ह, गेल्यें नाहीं. माझ्या बरोबरीची एकादी असती तर तिच्या घरीं गेल्यें असत्यें. माझ्या चाकरांच्या घरीं कशाला जाऊं. उद्यां गिरजा आणि तुळजाही बोलावणार.

**पेशवे**—छे, तसें ह्मणूंनये. त्यांत आपलेंच नुकसान आहे, हें तुह्मांला फोडून सांगितलें पाहिजे! त्यांच्या घरीं आपण जाण्याची आणि आपल्या घरीं त्यानां बोलावण्याची वहिवाट तुह्मी ठेविलीच पाहिजे. आतां आपणांला वडील कोणी राहिलें नाहीं. आई होती, तीही दुर्दैवानें गेली. तुर्त नानाचेंच घराणें आह्मांला वडिलांच्या जागीं समजलें पाहिजे, हेंच सांगण्याकरितां मी आतां मुद्दाम आलों होतों.

**यशो**—बरें तर, तसें कां होईना. सरकारची मर्जी.

**गिरजा**—(घाई घाईनें आंत येऊन) दादा आले.

**पेशवे**—(झोपाळ्यावरून उठून) येऊंदेत.

(यशोदाबाईहि उठून फुलें घेऊन एकीकडे बसत्ये; इतक्यांत माहादजी प्रवेश करितो, आणि पेशवे त्याला घेऊन झोपाळ्यावर बसतात)

**महादजी**—येकांत चाला वता जनू. (यशोदाबाईकडे पाहून) अन माजी लेक दूर बसली हाय!

पेशवे—नाहीं दादा. तुमचा आणि नानांचा तंटा ऐकून मला कांहीं सुचेनासें झालें, ह्मणून येथें येऊन बसलों.

महादजी—ये परसंगाला नसीबानें फडके जवळ होते ह्मणून नाना बचावला; न्हय तर येळ फार खराब होता सर्कार.

पेशवे—दादा, आपण उभयतां अपसांत भांडतां हें बरें करितां काय?

महादजी—खाचित बरं न्हायीं; पन मी काय करूं? सर्कारांनीं सांगावं. सर्कार सांगत्याल त्येपरमानें आयकन्याला मी राजी हाय.

पेशवे—दादा, आपणांशीं मन मोकळें करून बोलण्याला हरकत नाहीं; खरें जर ह्मणाल तर भांडण प्रथम उकरून काढिलें आपणच.

महादजी—तें कसें? मी हिंदुस्थानाचा खरच मागितला ह्मणून?

पेशवे—होय. तेंच भांडणाचें मूळ. आपण हिंदुस्थानांत मुक्त्यारीनें वागलेत. पुष्कळ खर्च केला खरा, पण पुष्कळ मुलूखही मिळविला. त्या मुलखाचा वसूल आपण आजपर्यंत घेतला, आणि आतांही तो आपल्याच ताब्यांत आहे; असें असून तिकडचा खर्च द्या ह्मटलें तर अन्याय नव्हे कां? तेव्हां नानांनीं बरोबर जबाब सांगितला. आजपर्यंतचा हिशेब देऊन मुलूख स्वाधीन करावा आणि खर्च घ्यावा. यांत काय गैर झालें?

महादजी—(किंचित हांसून) सर्कार, त्यो समदा परकार खरा; आन् मुलूखबी समदा देन्याला मी तयार हाय्; पन नानानें

मजसंगं परतम पासून कसी वरत्नूक ठेवलीया, तेवी सर्कारा-ला ह्मायीत असेलूच. हंगं त्या कर्तांच मींबी कुरापत उ-कारली.

**पेशवे**—होय, तें मात्र खरें; त्याला ही त्यांचीं कारणें आहेत; परंतु मी कांहीं तीं पसंत करीत नाहीं. उगाच संशय आणि भिन्नपणा.

**महादजी**—मजवर सर्कारची ह्मेंबांनी झाल्याली त्येच्यानें वगवत न्हायीं. मी हत आल्यापस्नं त्येंचं पित्त खवाळलया; सर्कार मला संगं घेऊन शिकारीला जात्यात, त्येबी बंद करा-वें ह्मनून त्येच्यामनांत.

**पेशवे**—तें राहूंद्या ह्मणा; त्यांत त्याचा कांहीं संबंध नाहीं. (सुसकारा टाकून) पूर्वींचे दिवस गेले आतां.

**महादजी**—पन त्यें कुट समाजेताय्! मागंदी मुक्त्यारी केली त्या पक्शी काकनभर आदिकूच कराया वगतोया.

**पेशवे**—(संतापानें) दादा, त्याची आठवण काढूंनका, माझ्या सर्वांगाची आग होत्ये. आतां पुढचा विचार बघूया. आपण उभयतां भांडत बसलेत, तर त्यांत आपलेंही बरें नाहीं; आणि दरबारचे तर फारच अहित आहे. याजकरितां प्रथम तंटा मिटविण्याची कांहीं तजविज काढा.

**महादजी**—काय सर्कार सांगत्यालती. एक मी हित्नं निघून गेलों मंजी तंटा आपोआप मिटतोया. तसाच हुकूम होत असला तर उद्याच निगतों. पन—

**पेशवे**—(मधेंच) छे, छे, तें बरें नव्हे. आपण तर येथें आवश्य पाहिजेत. मी कोठें सदासर्वकाळ दुर्मुखलेलें त्याचें तों-

ह बघत बसूं! बिचाऱ्याच्या तोंडावर संतोषाचें लक्षण ह्मणून कधीं नाहींच. उमेदीचें मनुष्य जवळ असलें तर आपल्याला दुप्पट उमेद येत्ये. या शिवाय या नंतर त्याच्या एकट्याच्या हातीं सगळा कारभार ठेवणें बरें नाहीं.

**महादजी**—मग मला हुकुम व्हावा, पाहिजे तसा कब्जा मिटव ह्मणून, ह्मंजे आतां एका घटकेंत संपवितों.

**पेशवे**—तेंही बरें नव्हे. त्याचा स्वभाव कसाही असो, उद्देश कांहीं असोत; एकंदरींत त्यानें आपलें बरेंच हित केलें आहे. तेव्हां त्याचें कांहीं वाईट झालेंतर माझेंच मन मला खाऊं लागेल.

**महादजी**—(गहिंवरून) भलारे धनी! असावातर धनी असा असावा! मग हामी दोगानीं मिळून कारभार चालवावा असा सर्कारचा मनसुबा दिसतो.

**पेशवे**—होय, आणि मी तिसरा आहेच. पण या कामाला तीघांचा एकोपा पाहिजे. आपण एकमेकांशीं भांडत बसलों तर कसें चालेल!

**महादजी**—(हात जोडून)सर्कार मीतर याचर्नांचा बंदा चाकर हाय; हुकमाभायीर एक पावूलबी टाकनार न्हायीं- याच परमानें त्या कडून कबूली घ्यावी ह्मंजे झालें. तंट्याचें मूळ ह्येच. या परमानें झालेंच पायिजे ह्मणून सर्कारचा हुकुम झाला तर मग त्येची काय मगदूर हाय न्हायीं ह्मनन्याची!

**पेशवे**—बरें तर, मी असाच घाट घालतों. युक्तीनें त्यांजवळ गोष्ट काढून पाहातों काय ह्मणतात तें.

**महादजी**—ठीक हाय, हुकूम व्हावा तर मग.

**पेशवे**—बरें आहे.

(महादजी निघून जातो)

**पेशवे**—(मनांत)खचींत, सिंद्या सारिखा मनुष्य आपणास मिळा-याचा नाहीं. त्याजमध्यें शूरत्व, शहाणपण, उल्लास, धारिष्ट, नम्रता हे सारे गुण एक सारिखे दृष्टीस पडतात. त्याला आपण जवळ बाळगलेच पाहिजे. आपण जसा समय पाहात होतों, तसा आतां नशीबानें मिळाला आहे. या संधीस नानांचा तोरा जरा कमी केला पाहिजे.

(इतक्यांत नाना प्रवेश करितो)

**नाना**—काय चाललें आहे?

**पेशवे**—(वर पाहून जरा गोंधळून) नाना, या, (असें ह्मणून उठून त्याला जवळ बसवून घेतात).

**नाना**—मला कशाला इतका मान आतां? आज पर्यंत कसें तरी वेडें वाकडें माझ्या अल्प समजुतीला आलें त्याप्रमाणें काम चालविलें. आतां आपण स्वतः समर्थ झालांच आहां, आणि अकस्मात चांगले मंत्रीही मिळाले; तेव्हां मला आतां निरोप द्या, स्वस्थ काशीवास करितों; तेवढी एक इच्छा पूर्ण झाली ह्मणजे मी कृत कृत्य झालों.

**पेशवे**—नाना, हें काय? आजची चर्या कांहीं विलक्षण दिसत्ये.

**नाना**—आतां झांकून कशाला? सिंद्याचें आणि आपलें जें बोलणें ठरलें, तें मी ऐकिलें. मी अवचीत इकडे आलों तों आपलें बोलणें चाललें होतें. त्याच वेळीं आंत येऊन पुढें लेखणी ठेऊन रजा मागणार होतों. परंतु त्याची स्थिति प्रकारांतरची; तो फटदिशीं पुनः कांहींतरी बोलेल,

आणि तें मला सहन होणार नाहीं; ह्मणून तो जाईपर्यंत वाट पाहिली.

**पेशवे**—मग नाना, तुह्मांस इतका राग येण्याजोगें कांहीं मी त्याशीं बोललों नाहीं. तुमच्या शिरावरचें ओझें कांहीं हलकें करावें, याच हेतूनें मी तो विचार केला.

**नाना**—माझें ओझें कमी करण्याची तजवीज बरी काढिली. त्या कपटी कोल्ह्याशीं माझी आतां आपण सांगड घालणार. हें कधींतरी घडेल? तो कोण मनुष्य आहे हें मी पक्कें जाणतों. पहिल्यापासून त्याचें वागणें मतलबाचें आहे. वरून इतकी नम्रता आणि विश्वासूपणा तो दाखवितो खरा; परंतु आंतून आपल्या दरबाराशीं मोठया वक्रतेनें वागतो. आह्मांवर छाप बसविण्याकरितां त्यानें प्रथम आपली फौज वाढविली; परमुलखी लोक चाकरीस ठेवून कवायिती पलटणी तयार केल्या; मग मुक्त्यारीनें मुलूख सर करूं लागला; तिकडे दिल्लीच्या दरबारीं तर पुरा अंमल बसविलाच आहे; इंग्रजांशीं स्नेह राखिला आहे; आणि आतां आमच्या दरबारच्या कारभारांत ढवळा ढवळी करायाला पाहातो. या सर्वांचा अर्थ काय? आपण विचार करून पहा.

**पेशवे**—तें सर्व माझ्या लक्ष्यांत आहे. परंतु याघटकेस आपली सारी फौज आणि सारा मुलूख आमच्या ताब्यांत देण्याला तो तयार आहे.

**नाना**—आहाहा, अशा भुलथापीच्या गोष्टी सांगून तो आपणांस फसवूं पाहातो, हें पाहून मला अत्यंत दुःख वाटतें. (हात जोडून) धनी, हा विश्वासू चाकर आहे; याच्या बुद्धिवादा-

ला कांहीं मान द्या. आपण अद्यापि गर्भवासी होतेत; तेव्हांपासून यानें आपला अभिमान धरिला; अनेक संकटें सोसून आजच्या मितीपर्यंत एक निष्ठतेनें चाकरी बजाविली; आणि आपल्या दौलतीच्या कल्याणाखेरीज याला पुढें दुसरें कांहीं कर्तव्य नाहीं. असें असून त्या माझ्या डोळ्यांदेखत तो आपणांस मतलबानें बुडवूं पाहातो, आणि आम्ही उडतां हें पाहून मला मरण बरें वाटतें. (गहिंवरून पदरानें डोळे झांकून) याजकरितां सरकार, माझें शेवटचें मागणें इतकेंच आहे कीं मी नाहींसा होण्याची तजवीज प्रथम करा, आणि मग सिद्याच्या मसलतीला कान द्या.

**पेशवे**—(अश्रू ढाळून) नाना, तुह्मी असें निष्ठुर कां बोलतां? मी इतका अपराधी आहे काय? क्षमा करा. तुह्मी मला वडिलांप्रमाणें. माझा सर्व परी तुह्मी सांभाळ केला; आणि पुढें ही करणार तुह्मींच. तुमचें मन दुखवून मला कांहीं करणें नाहीं. स्वस्थ राहा; तुमची मर्जी असली तर मी आजच सिद्याला निरोप देतों.

**नाना**—तेंही बरें नव्हे. तो आपणांशीं द्वेषधरील कंचीही गोष्ट एका एकीं करूंनये. तो नुकताच आला आहे; त्याला आणखी दोन दिवस राहूंद्या; मी सांगतों या गोष्टींचा विचार करा. पुढें त्याला येथून काढणेंच बरें वाटलें तर युक्तीप्रयुक्तीनें कांहीं काम गारीवर त्याला नेमून पाठवा.

**पेशवे**—ठीक आहे तर, असाच बेत करूं.

(दोघे उठून जातात)

---

## प्रवेश. ५

### पेशव्यांचा दिवाणखाना.

(पेशवे प्रवेश करून हातांत एक कागद घेऊन पाहात बसतात इतक्यांत गोविंदराव पिंगळे प्रवेश करितो)

**गोविं**—(नमस्कार करून, कामांत गुंतले आहेत असें पाहून) मी जातों तर आतां.

**पेशवे**—कां ? बसा; आलां कां आणि चाललेत कां ? आलीकडे पुष्कळ दिवसांत तुह्मीं भेटलां नाहीं.

**गोविं**—गरीबाच्या भेटीला कोण विचारतें ? येवढाल्या घडामोडींत दाद कोठे लागत्ये ?

**पेशवे**—माझ्या घडा मोडी कांहीं असल्या ह्मणून माझ्या मित्रांला कांहीं येण्याला प्रतिबंध नाहीं.

**गोविं**-असें असलें तर मग माझीच चूक आहे. हातांत कागद कसला तो ?

**पेशवे**—सिंद्यांच्या छावणींतून आला ह्मणून नानांनीं पाठविला आहे.

**गोविं**—आज पांच चार दिवस अलीजा बहादरची प्रकृत बरी नाहीं. ताप येतो वाटतें ?

**पेशवे**—होय; आणि कालपासून फारच हैराण आहेत ह्मणून या चिठ्ठींत लिहिलें आहे; हा पाहिल्यापासून मी फार दिलगीर आहे. माहादजी फार चांगले मनुष्य.

**गोविंद**—त्याला काय होतें ? तापाचें दुखणें असेंच बेटें; हलकेंच दुखणं खरें पण एक दोन दिवसांत माणसाला बेजार करून टाकतें.

**पेशवे**—ईश्वर कृपेकरून ते पार पडोत ह्मणजे झालें. एकदां बरे झाले ह्मणजे मग लागलेंच येथून निघतील.

**गोविंद**—कां? ते आतां लवकर निघणार कां येथून?

**पेशवे**—होय; त्यांच्या मनांतून येथेंच राहाण्याचें आहे, आणि मींही ठेवून घेण्याचाच बेत केला होता; पण त्यांच्या राहाण्यापासून एकंदरींत बरा परिणाम होईल असें दिसत नाहीं. व्यर्थ तंटा मात्र माजेल.

**गोविंद**—नानांचें आणि त्याचें एक घटिकाभर जमायाचें नाहीं.

**पेशवे**—या दोघांनीं मिळून मला मोठया घोटाळ्यांत घातलें पाहा. ते ह्यांला दोष देणार आणि हे त्यांला दोष देणार.

**गोविंद**—खरें पाहिलें तर दोघेही मतलबी.

**पेशवे**—तें खरें; पण मी समजतों कीं नानांचा सर्व मतलब कायतो माझ्या हिताचा; पण सिंद्यांच्या मनांत कांहीं मतलब असला तर तो मात्र दगयाचा असण्याचा संभव आहे.

**गोविंद**—तो कसा?

**पेशवे**—नाना स्वज्ञातींतले आहेत; त्यानां मजपेक्षां विशेष आगत्याचा प्राणी या जगांत कोणी असेल असें वाटत नाहीं; या खेरीज या (उराला हात लाऊन) वृक्षाला त्यानींच वाढविलें आहे, तेव्हां यावर उलट शस्त्र धरितील असें संभवत नाहीं. परंतु सिंद्यांची गोष्ट निराळी आहे. आजपर्यंत त्यांच्या वर्तणूकींत संशय येण्याजोगें कांहींच मी पाहिलें नाहीं हें खरें आहे, आणि या घटकेस माझा गळा देखील त्यांच्या हातीं देण्यास तयार आहें; परंतु मनुष्याची बुद्धी अस्थीर आहे. त्यांच्या भरभराटीवरून पाहातां उद्याच त्यांचें मन कां

नफिरेल हें सांगवत नाहीं; आणि सर्वांत मुख्य गोष्ट हीकीं, छत्रपतींच्या संबंधानें सर्व मराठे सरदारांच्या मनांत आमच्या विषयीं कांहीं तरी वाईट वागत असेल असा पक्का संशय आहे.

गोविंद—पण सिंदे पेशव्यांच्या दरबारींच अगदी हलक्या चाकरीपासून वाढलेले सरदार आहेत.

पेशवे—होय, आणि त्यांच्या इमानीपणा विषयीं ही माझी बालेवाल खातरी आहे; ह्मणूनच मी आपला बेत आगदीं रहित केला नाहीं, तुर्त मात्र विचारावर ठेविला आहे.

(इतक्यांत कृष्णाजिपंत प्रवेश करितो)

कृष्णा—(नमस्कार करून डोळ्यांला पाणी आणून)सरकार, अनर्थाचा समय आला.

पेशवे—(चकित होऊन) काय हो कृष्णाजिपंत, दादांचें काय वर्तमान?

कृष्णा—अत्यवस्था आहे सरकार- आणि याच क्षणीं स्वारी तेथपर्यंत आली तर दोन शब्द बोलेन ह्मणून त्यांची वासना आहे.

पेशवे—हर, हर, हर, काय अनर्थ गुदरला हा! बरें, आतां अवकाश नाहीं, चला.

(सर्व निघून जातात).

प्रवेश ६

सिंद्याच्या छावणींतली त्याची निजण्याची खोली.

(महादजी बिछान्यावर पडला आहे व त्याच्या शेजारीं दौलतराव व दुसरे कांहीं लोक बसले आहेत)

**महादजी**—(कांपऱ्या स्वरानें) डोळे झांकून अग ग ग, आई; परमेसुरा, पुरे कर आतां, घे येकदा या पाप्याला पदरांत—दवलता, पानिरे.

**दौलत**—(रडत तोंडांत पाणी घालून) आजोबा, घोटघ्या.

**महादजी**—किष्णाजिपंत आला न्हायीं आजून?

**दौलत**—न्हायीं आजोबा; आतां येयाल.

**महादजी**—आतां काय येयात बाबा; मीचालो. माज्या धन्या-ची भेट झाली न्हायीं.

**दौलत**—(बाहेर पाहून) शिर्मंतांची सवारी आली. (असें ह्मणून सर्वांसहित उठून उभा राहतो. आणि पेशवे येऊन महा-दजीजवळ बसतात, पण त्यांस शोकामुळें बोलवत नाहीं)

**महादजी**—सिर्मंत आलेरे?

**दौलत**—होय आजोबा; जवळच बसल्याती.

**महादजी**—(संतोषानें डोळे उघडून पेशव्यांकडे पाहून) सर्कार, ह्ये तोंड बगन्याकर्ता जीव गुंतून न्हायिला व्हता. आतां संतोसानें परान सोडतों.

**पेशवे**—(बोलण्याचा यत्न करितात परंतु दुःखाच्या उद्गारामुळें गळा भरून येतो; ह्मणून एका हातानें तोंड झांकून दुसरा हात त्याच्या आंगावर फिरवितात)

**महादजी**—सर्कार, आपन माजे धनी आन् गुरु हां; मात्यावर हात ठेवून आसिर्वाद द्या.

**पेशवे**—(कष्टानें दुःख गिळून) दादा, मी हतभाग्य, दुर्दैवी; ह्मणून येवढें अमोलिक रत्न मला पचलें नाहीं.

**महादजी**—आपनाला काय कमी हाय? माजीमातर हैस पुरी

झाली न्हार्य.

**पेशवे**—(अनवटी धरून) दादा, काय असेलती सांगा; मी आपल्या चरंजिवाच्या ठिकाणीं समजा.

**महादजी**—माझाबी योच मनसुबा होता. माला पोर ना बाळ; एकटा फाटिंग होतों; होयलि तिकें धन्याचें नांव लौकिक् वढवावें आन् डोळे भरून बगावें. असो, दुसऱ्या जल्मी रीण फेडीन.-- बोलवत नायी,

**पेशवे**—शिव, शिव, शिव, काय मनुष्य; काय मनुष्य जातो! परमेश्वरा, काय न्याय हा.

**महादजी**—दावल---ता—सं—बा---आ----राम्.

**पेशवे**—(आक्रोश करून) गेला. माझा उजवा हात गेला, माझ्या दौलतीचा खांब गेला. (पडतात)

(चोहोंकडे एकच अकांत होतो)

**अपाशास्त्री**—(-दोन घटका मधें गेल्यानंतर प्रवेश करून पेशव्यांस)-सरकार, हें काय? आपल्यासारिख्या सुज्ञाला इतका शोक उचित नव्हे- यांच्या घरचीं मनुष्यें पहा, कशीं विव्हल होऊन पडलीं आहेत. आंत बायकातर मृतप्राय झाल्या आहेत. अशा समयीं सर्वांचें समाधान करून धैर्य देण्याचें एकीकडे ठेवून आपणच दीनवत् शोक करीत बसलां तर वरकड पामर जनानीं काय करावें?

**पेशवे**—शास्त्रीबावा, मोठें रत्न गेलेंहो; साधारण मनुष्य कोणी असतें तर मला इतकें वाईट वाटलें नसतें.

**आपाशास्त्री**—रत्न नव्हे कोण? आणि गेल्यावांचून राहणार कोण? आपण सर्व महादजीचाच मार्ग धरणार आहों. मोठ मोठे

जे विश्वामित्र पराशर प्रभृति ऋषि ज्यांच्या आंगीं प्रति सृष्टि करण्याचें सामर्थ्य, तेही कालाला वश झाले. "जातस्यहि ध्रुवंमृत्युर्ध्रुवंजन्ममृतस्यच" जन्मलेल्याला मरण आणि मेलेल्याला जन्म कधीं चुकणार नाही। यां जीवाला जन्म आणि मरण समान आहेत. जन्माचें सुख किंवा मरणाचें दुःख त्याला किमपि नाहीं. ही केवल आमची भ्रांति आहे. जाग्रतावस्थेंतून मनुष्य जसें सुषुप्तीप्रत जातें, तद्वत् जीव या देहीचा त्याग करून दुसरा देह धारण करितो. याला दृष्टांत पहा कसें सुंदर दिलें आहे. "व्रजंस्तिष्टन्पदैकेनपादेनैकेन गच्छति।यथातृणजलौका, एवंदेहीकर्मगतिंगतः। देहांतरमनुप्राप्यप्राक्तनंत्यजतेवपुः" तृणजलौका जी असते, ती जशी चालतानां एका पादानें पुढच्या तृणाचा आश्रय करून मागलें तृण सोडिते तद्वत् हा जीव कर्मगतीनें भ्रमण करित होत्साता पुढच्या देहाचा आश्रय करून मागल्या देहाचें विसर्जन करितो. आणखी आपणांस विदितच आहे कीं जीव हा एकाकी आणि स्वतंत्र आहे. इष्ट, मित्र, सुहृत्, बंधु, पुत्र, दारादि सर्व केवल व्यामोह आहे. चोहोंकडून मनुष्यें जमून जशीं एका नौकेंत बसून नदी पार होतात, आणि मग स्वेच्छानुसार मार्ग धरितात त्या प्रमाणें हा प्रपंच आहे. कोणाचा कोणीं नव्हे; ज्याचा तोच एकटा. आणखी हा देह क्षणभंगुर आहे. पाण्यावरील बुद्बुदांप्रमाणें याची स्थिति आहे; आज आहे तो उद्यां राहीलच ह्मणून नियम नाहीं, यांचीं उदाहरणें सहस्रावधि नित्यशः पाहातच आहां. तस्मात अमका माझा पुत्र, मित्र अथवा बंधु अकस्मात् का-

त्वाधीन झाला, आणि त्यापासून त्याला दुःख झालें ह्मणून खेद करणें हें केवल अज्ञान आहे. तुह्मांसारिख्या विचार-शील पुरुषांला हें योग्य नव्हें, उठा. दौलतराव उठा, घ्या हे चार असामी. आणि शव बाहेर नेऊन घाला. (असें ह्मणून चौघाला उठवून शव उचलवितात, आणि सर्व निघून जातात.)

---

# अंक ४.

## पात्रें.

---

सवाई माधवराव पेशवे.... ... .... .... .... .... ..पुण्याचे राजे.

परशराम भाऊ पटवर्धन, तुकोजी व काशीराव होळकर, रघूजी भोसले, दौलतराव सिंदे, आणि घाटगे. } सरदार.

बाबासाहेब पटवर्धन.... .... .... .... ....परशराम भाऊचा पुत्र.

नाना फडणीस.... .... .... .... .... .... ....पेशव्यांचा प्रधान.

गणपतराव.... .... .... .... .... .... ......... ..त्याचा कारकून

मशीर उल्मुलुक.... .... .... .... .... ..... ..निजामाचा प्रधान.

यशोदाबाई.... .... .... .... .... .... .... .....पेशव्यांची स्त्री.

तुकाराम आणि राणू.... .... .... .... ..दोघे झिंगलेले शिपाई.

---

स्थळ—खरडेगांवाजळचें मैदान.

## प्रवेश १.

मराठ्यांच्या छावणींतील घाटग्यांच्या डेऱ्याजवळचा प्रदेश.

(राणू आणि तुकाराम दोघे झिंगलेले प्रवेश करितात)

**तुकाराम**—(डुलत डुलत ) अरे चल काय त्या निजामाची बिशाद, मी एक फुकर मारला तर बारा कोस वुडवून देयिन. (असें ह्मणून फूं करून जोरानें फुंकतो, आणि राणूचें तोंड सगळें थुंकीनें भरून टाकतो)

**राणू**—(तोंड पुसत) कितीरे गड्या तुज्या थुकीला स्वास हाय! पन तुकाराम, हे बग, माज्या बाच्या वेळची बंदूक हाय, ती-हातांत घेतली की, पंचीस कोसावरचा मानूस चट्.

**तुकाराम**—मला बाच नायीं.

**राणू**—नको तिच्या बनें; पायिजे कशाला तो; आईच्या जिवाला काळ. तू पन लबाड गड्या; तुक्याचा बाप यिटुबा. "बाप यिटुबा आयि रक्मायी" बग. (गणपतराव व त्याज बरोबर दोघे हुजरे प्रवेश करितात)

**तुकाराम**—रानू, हे बग पंड्रा पुरा मंदी एकेक डुकर हत्ती यिक्ता घीटा! आयिची आन; सुल्री ह्मन.

**राणू**—हात्तीला दोन सोंडा आसत्याती; न्हायींरे!

**तुकाराम**—होय, एकीनें गवत खातोय्, आन् येकीनें पानी पितोय्.

**राणू**—(तोल जाऊन पडूं लागतो) बग मी रानू हाय्, (हात उगारून) बग, बग, गन्या. पडशील, खबर्दार, मारीन (असें ह्मणतां ह्मणतां हाडबडून तुकारामाच्या अंगावर पडतो; आणि दोघे मिळून धाड दिशी खालीं पडतात. राणू तुका-

रामाच्या तोंडांत मारितो; मग दोघे लाथा बुक्यांनीं एकमेकास मारून, ओरडून मोठा दंगा करितात)

**गणपतराव**—(हांसत) कोणरे तुह्मी? (आपल्या हुजऱ्यांकडे पाहून) ध्यारे, ध्या त्यांचीं पागोटीं, आणि अवळा मुसक्या मादरचोदांच्या.

(हुजरे त्या दोघांना उभे करून एकेकाच्या एकेक थोबाडीं देतात)

**गणपतराव**—कोण तुह्मी? कोणाच्या फौजेंतले?

**तुकाराम**—(मिशांवर ताव देऊन) जतकर ढपळ्यांचे सर्दार.

(इतक्यांत घाडगा धांवत येतो)

**घाट**—कोनरे ते? कोन दंगा कर्तो. (गणपतरावाला पाहून) गनपतराव दादा, रामराम.

**गणपतराव**—रामराम घाडगेराव रामराम (हुजऱ्यांस) जारे तुह्मी यांना यांच्या राहुटींत पोंचवून या; तोंपर्यंत मी येथेंच असतों. (ते त्याप्रमाणें गेल्या नंतर घाडग्याकडे पाहून)कां, खुशाल? आपण केव्हां आलां? फार उशीर लाविला?

**घाट**—आतां आलों दादा कायकरूं? मनसें तरी जमाया नग? आन् मीवी जरा गुतलो होतो. आपन कुनीकडे गेलां होतां?

**गणपत**—मी टपवर्धनांच्या छावणींत गेलों होतों; आतां परत फडणीसां कडे जातों.

**घाट**—काय वरत्मान?

**गणपत**—वर्तमान कशाचें? सकाळीं लढयीची तयारीकरा.

**घाट**—(दचकून) हॉ! इतक्यांत? एक दोन दिस लडायी सुरूं होत व्हायीं मंत होतेन्.

**गणपत**—होय, तसा बेत होता खरा; निजामअली कांहीं सोयीवर येईलतर पाहावें ह्मणून एक दोन दिवसांचा अवकाश करणार होते; परंतु त्याचे वकील आतां येऊन गेले; त्यांच्या बोलण्यावरून दोन धक्के खाल्याखेरीज तो कांहीं शुद्धीवर येत नाहीं असें पाहून श्रीमंतांनीं उद्यांच तयारी करण्याचा निश्चय केला; आणि ही सूचना देण्याकरितांच मी आतां पटवर्धनांकडे गेलों होतों. त्यांजकडूनही सर्व सरदारांस आतां वरदी येईल.

**घाट**—हें काय दादा? आज भवूतदिस सिर्मंतांची आन् निजामाची दोस्ती चालून आंतां मंदीच लडायी कशी जुपली? सिर्मंतांची थैली आली खरी; पन तींत चांगला खुलासा व्हायीं.

**गणप**—त्याच्याच कडून या लढयीचें कारण उद्भवलें. तें कसें ह्मणालतर, आमची चौथ व सरदेशमुखीची फार दिवसांची बाकी निजामाकडे राहिली होती; ती आह्मी मागितली तेव्हां त्यानें आपलीच बाकी उलट आह्मांकडे यायची आहे ह्मणून चोवीस कलमांची याद पाठविली; ती खोटी व आपली बाकी खरी ह्मणून फडनीसानीं अठ्ठाविस कलमांची याद पाठविली. ती पाहून मशीर उलमुलूख भर कचेरींत बसून आमच्या वकिलांजवळ श्रीमंतांला आणि फडणीसांला बेअदबीचे शब्द बोलिला; आणि हा हिशेब समजून देण्याला फडनीसांलाच कसें येथें आणितों पहा, ह्मणून धमकी देऊन लश्कर जमवूं लागला. हें वर्तमान पुण्यास समजण्याबरोबर इकडूनही तयारी झाली, आणि लढयी जुंपली-

घाट—असें काय!—फौजतर लै जमली दादा; मी येतानां दुरून समिंदर वगटल्यावानी जालें बगा; जिकडें बगावें, तिकडें मअनसचें मानसें. सोनपत पानपतच्या लडायीआल्याड यित्कें मानूस कंदी जमलें न्हवतें.

गणपत—होय; दौलतराव सिंदे, होळकर आणि पटवर्धन हे तर पुण्यांसच लश्करासुद्धां होते; गोविंदराव गायकवाडांनीं पंचवीस हजार फौज पाठविली; वरकड रास्ते, विंचूरकर, मालेगांवकर, प्रतिनिधि, सचिव, निंबाळकर, चव्हाण, डफळे, पंवार, थोरात, पाटणकर, वगैरे सरदार जवळच आजू बाजूला होते; इकडून बोलावणीं जातांच लागलेंच एकामागून एक येऊन जमले; आपणांसच उशीर लागला; भोसले सुद्धां नागपुराहून कालच येऊन दाखल झाले.

घाट—समदं मानूस किती होयलि दादा?

गणपत—एक लाख तीस हजार, स्वार व पायदळ मिळून; शिवाय पेंढारी दहा हजार.

घाट—आवा बा बा! दीड लाख मानूस जालें! निजामाचा जमाव यित्का थोटा कशानें असनार!

गणपत—नाहीं, त्याचीही सव्वा लाख फौज आहे.

घाट—(आश्चर्यानें) हं, मग बरोबरीच हाय. हामच्या लश्कराची समदी मुक्त्यारी.?

गणपत—पटवर्धनांकडे. फडके असते तर त्यांचें हें काम; (खेदानें) पण गेला बिचारा.

घाट—हेयजी दादा; लै थोटा मानूस, थोठा सरदार; थादजीबी तसाच; दोनी थोटी रतनं गेलीं.

गणपत–मरणाला कोणाचा उपाय आहे? पण बाबूराव फड-
क्यांच्या ताब्यांत झेंडा आहे तरी.

(इतक्यांत गणपतरावाचे हुजरे परत येतात)

घाट–(त्यानां पाहून) हे आपले शिपायी आले.

गणपत–जातों तर आतां, रामराम; आपणही पटवर्धनांकडे जा-
ऊन हाजिरी लाऊन या.

घाट–होय; पन पान सुपारी घेत नाहीं?

गणपत–नको आतां, उशीर झाला.

घाट–बरें तर रामराम.

(दोघे निघून जातात)

---

### प्रवेश २.

पेशव्यांच्या डेऱ्यांतली त्यांची बसण्यची खोली

(पेशवे प्रवेश करून पान सुपारी खात बसतात; इतक्यांत नाना
आणि पटवर्धन लढयांच्या पोषागानिशीं प्रवेश करितात)

पेशवे–कां? तयारी झाली?

पटवर्धन–हो, केव्हांच.

पेशवे–तर माझ्याच कडून उशीर ह्मणा.

नाना–पण आपणच खुद्द आज रणभूमीवर येण्याची तितकी
गरज नाहीं; कां भाऊ?

पटवर्धन–होय; आज पहिलाच दिवस आहे; तेव्हां आजच यजमा-
नांनीं इतकी तसदी कशाला घ्यावी?

पेशवे–(निकरानें) छे, तें होणें नाहीं; मी आज कोणाचेंही
ऐकणार नाहीं. माझे दंड फुरफुरतात; आज बाहेर पड-

लोच पाहिजे. घरीं बसणें असतें, तर मग पुण्यासच रा-
हिलों असतों.

**नाना**—तसें नव्हे. आतां लढयी आरंभिलीच आहे; आजच्या
रागरंग पाहून उद्यां परवां मर्जीस वाटेल तेव्हांजातां येईल.

**पेशवे**—तें कांहीं मला पसंत नाहीं. (आवेशानें) आजच कां
आह्मी त्यानां पिटवून लावूंनये? किंवा निजामाचे मुंडकें
उडवूं नये? मग उद्यां कोणाशीं युद्ध कर ह्मणतां!

**नाना**—मर्जी तर. (पटवर्धनांस) भाऊ, यानां संभाळणें तुह्मां-
कडे तर.

**पटवर्धन**—येऊंद्या; काळजी सोडा तुह्मी. त्यांच्यापर्यंत लढयी
येते कशाला?

**पेशवे**—फौजेची व्यवस्था कशी काय केली?

**पटवर्धन**—सरकारी फौज व होळकराची मध्यभागीं उभ्या केल्या
आहेत; भोंसले व सिंदे आपआपल्या सैन्यासहित उजव्या व
डाव्या बाजूला उभे आहेत. बाकी सरदारांच्या टोळया कांहीं
पुढें व कांहीं पाटीमागें ठेविल्या आहेत. माझ्या चार पल-
टणी घेऊन बाबा तोंडाशीं उभा आहे. नाना, मी, बाबूरा-
व आणि काशीराव होळकर असे चवघे मध्य भागीं सरकारा-
पाशीं राहाणार.

**पेशवे**—ठीक आहे मी हा आलोंच. (घाई घाईनें विडा अटपूं
लागतात)

**नाना**—भाऊ, चला तर आपण पुढें जाऊं.

(दोघे निघून जातात आणि यशोदाबायी प्रवेश करिते)

**यशो**—तर आतां जाणारच कां मग?

**पेशवे**—जाणार? येथें कशाला आलों तर?

**यशो**—आजचा दिवस येत नाहीं ह्मणून सांगून पाठविलें तर नाहीं कां होत?

**पेशवे**—मला कोणीं जुलूम केला आहे? मी आपल्या संतोषानें जातों.

**यशो**—नकोग बायी मला तो संतोष. बळेंच जिवाला घोर करून घ्यायाचा; काय तर?

**पेशवे**—लाखो लोक जमले आहेत. त्यांच्यापेक्षां मला जास्ती घोर कसला?

**यशो**—इतके लोक आहेत; मग गेलेंच पाहिजे कशाला तें?

**पेशवे**—पाटावर बसून गोड गोड खातानां कधीं या लोकांची आठवण होईल कां पण?

**यशो**—पुरेग बायी आतां; किती सांगितलें तरी आपलें आहे तें आहेच.

**पेशवे**—होय; वडील माणूस उभें राहून इतकें सांगते; आणि ऐकत नाहीं ह्मणजे?

**यशो**—तितका थोरपणा कशाला मला, या पायांच्या वटकीला? (जवळ बसून खांद्यावर हात टाकून काकुळतीनें) खरें गड्ये, माझें येव्हढें ऐकिलेंच पाहिजे; पायांपडल्ये; पदर पसरून मागून घेत्यें.

**पेशवे**—हें काय! वेड बीड लागलें कीं काय! असें समजलें असतें तर पुण्यासच ठेवून आलों असतों.

**यशो**—(फुंदत) तर काय करूं? कांहीं अधिक उणें झालें तर कोणांला विचारूं? माझ्या करितां येव्हढें ऐकणें होई-

ल ह्मणून विनविलें.

**पेशवे**—हें काय बोलणें! दुसरें कांहीं असतें तर ऐकिलें असतें आज लक्षावधि लोक माझ्या करितां जिवावर उदार होऊन आले आहेत. त्यांनांही कोणी बायका पोरें नसतील! माझ्या करिता त्यांनीं आपलें मन किती कठोर केलें असेल पाहा? त्यांनां आज मरायाला पुढें पाठवून मी घरीं बायकोचें तोंड पाहात बसूं! परमेश्वराजवळ तरी काय जबाब देऊं? त्याच्या घरीं सर्व सारिखे आहेत. आतां येथें ह्मणजे मी सर्वांच्या पुढें जाऊन तरवार उपसलीच पाहिजे असा अर्थ नाहीं. माझे लोक पुष्कळ आहेत, आणि चांगले लढाऊ आहेत. मी तेथें जाऊन उगाच उभा राहिलों तर पुरे; त्यांच्या आंगीं दुप्पट जोर येईल. मग अपेश ह्मणून येणारच नाहीं, खातरी बाळगा. नाहीं तर पानपतच्या लढयी प्रमाणें याही लढयीचा शेवट झाला तर माझें दुर्लौकिक किती! मग मराठ्यांचें नांव तरी राहील काय?

**हशो**—(रडत) येथून बाहेर निघाल्याबरोबर मला आगींत पडल्यासारिखें होईल मेलें; मग कोणाकडे पाहूं! कोणाशीं बोलूं! काय करूं?

**पेशवे**—जरा इकडे तिकडे हिंडावें, फिरावें; नाहींतर पांच चार बायका जमवून कांहीं तरी खेळत बसावें! ह्मणजे मी इतक्यांत येतों; असें धैर्य काय टाकावें! (अनवठीस हात लावून) हूं द्या आतां निरोप मला; बाहेर सगळे लोक वाट पाहातात, उशीर झाला. (असें ह्मणून उठतात)

यशो–(वर पाहून डोळे पुसत) निघायचेंच तर मग आतां?

पेशवे–होय; निघायाचेंच; उपाय नाहीं.

यशो(–पदरानें तोंड झांकून) जय जगदंबे, आई, भवानीं, माझ्या अनाथेचा अभिमान तुला असूंदे. मला येव्हढें सौभाग्य दानदे. हजार ब्राह्मण अनुष्ठानास लावीन; आणि सहस्र चंडीचा पाठ करवीन; आणि मी जिवांत जिवंत आहे तोंपर्यंत नवरात्रांत निश्चक्र करीत जाईन. (डोळे उघडून जागसे तों पेशवे गेले असें पाहून) गेले. मला सोडून गेले. आतां कसचें तें तोंड माझ्या दृष्टीस पडतें! अजुन जवळच असलेतर आणखी एकादां डोळेभरून पाहीनतरी. (उठून जाते).

---

## प्रवेश तिसरा.

### रण भूमीचा एक प्रदेश

(परशुरामभाऊ आणि काशीराव होळकर घोड्यांवर बसून, कांहीं स्वारांसहित प्रवेश करितात)

काशीराव–भावू, सिमंत हामच्या फौजेमधीच ऱ्हायिले अस्ते तर बरें होतें.

परशु–वावाजवळ राहिले ह्मणून त्यांना काय भीति आहे! त्यांनाही लढयी पाहाण्याची हौस आहे. आमचीं चार पलटणें पुढें भिंती सारिखीं उभीं आहेत, तीं पडल्यानंतर श्रीमंतांच्या जीवाला भय कीं नाहीं! तोंपर्यंत आमचें काय येथें काम आहे! आणखी जरा पुढें जाऊन शत्रु कसा बेतानें येतो त्याचा आदमास घेऊं, आणि परतूं ह्मणजे झालें.

काशी—फुडचें लस्कार जरा लांब हाय; पन हकड बगा डाय वाजूला; लोक किती जवळ येवून भिडले.

परशु—(डावीकडे पाहून दचकून) आहो! ती पठाणांची टोळी आह्मांवरच तुटली. शिपायीहो हुषार!

(असें ह्मणतांच सर्व स्वारांच्या तरवारी एकदम् चमकूं लागतात; इतक्यांत पठाणांची टोळी आगदी तुटून आंगावर येते—आणि मारामारी सुरूं होत्ये)

परशु—काशीराव संभाळा, तुह्मी पुढें सरका, आपल्या लोकांचें धैर्य खचूं देऊं नका. आमचें लष्कर जवळच आहे.

(समोर पठाणांचा दाढीवाला एक मोठा सरदार पाहून) तोंपर्यंत मी या बड्या दाढीवाल्याचा समाचार घेतो.

पठा. सर.—आछा, आव् तो भला; लेकिन ये मुसलमीनके सात सामाना हाय्; बमनकी पोली नै हाय् ईधर. (असें ह्मणून तरवारीचा एक घाव घालतो.)

परशु—(तो ढालीवर संभाळून) आवी ये बंमनका हात समाल (असें ह्मणून त्याच्या डाव्या मांडीवर वार करितों)

(मग दोघांची बरीच चकमक झडल्यानंतर पटवर्धनाचा घोडा पडतो, आणि तो उडी टाकून जमिनीवर उभा राहातो; इतक्यांत पाठीमागून दोन स्वार भिऊं नका, भिऊं नका ह्मणत किती एक पलटणी लोकांसहित भरधांव येतात, आणि पटवर्धन त्यांजकडे पाहूं लागतो)

पठा. सर.—पिछे क्यौं देखता बे बंमन, तेरेकूं कोयीनै छुडा नेका. (असें ह्मणून उजव्या खांद्यावर जबर वार करितो)

परशु—आवा धार. (असें ह्मणून मुर्छा येऊन खालीं पडतो)

पठा. सर.—कायका बाबा और कायका मामा; अबी तेरी मुंडी उडातों देख. (असें ह्मणून घोड्याखालीं उडी टाकून पटवर्धनाच्या छातीवर पाय देऊन तरवार उगारतो)

पहिला स्वार—(इतक्यांत त्याला गांठून) समाल तेरा हात. (असें ह्मणून तरवारीसुद्धां त्याचा पंजा उडवितो)

पठा. सर.—(मागें पाहून) अरे, ये दुसरा दुशमन आया, और तिसराबी आता. हमारी शिकार गयी, और ज़िंदगी गया. कुच्छ फिकीर ने. (असें ह्मणून कंबरेंतला जंबिया काढून डाव्या हातानें उगारून त्याच्या आंगावर धांवतो)

पहि. स्वार—बुढे, कायकूं मरता? भागजाव, छोडदेताऊं.

पठा. सर.—येतो दुशमन नहिं. लालखां पठाण हाय. (असें ह्मणून डाव्या हातानें जंबिया मारतो)

पहि. स्वार—(तोही हात तोडून ) और क्या करनेका तेरा इरादा हाय बोल ) इतक्यांत पांच पठाण आपल्या सरदाराच्या मदती करितां येतात)

दुसरास्वार—(त्यांस गांठून) पिछे हटजाव, नै तो मर जायगा. (मग दोघेहि स्वार त्यांच्या आंगावर पडून सपाट्यासरशीं दोघांस ठार करितात; बाकी तिघे पहिल्या स्वारावर एक दम् हल्ला करून त्याचें घोडें पाडितात.

काशीराव—(दुरून पाहून) अरे घात झाला, घात झाला! शिमंत, शिमंत. घोडें पडलें! (धावून येतो)

पेशवे—काशीराव, घाबरूं नका; माझा घोडा पडला ह्मणून कांहीं चिंता नाहीं. (असें ह्मणून समोरच्या पठाणाच्या छातीवर

वार करून त्याला खालीं पाडतात; (मग दुसऱ्या स्वारास हाक माखून) बाबा, या बाकीच्या दोघांचा समाचार मी आणि काशीराव घेतों; तुह्मी भाऊंची अवस्था काय झाली आहे पाहा.

**बाबा**—आज्ञा, (असें ह्मणून आपल्या बापाजवळ बसतो) (इतक्यांत पटवर्धनाच्या दोन पलटणी येऊन मिळतात; आणि सर्व पठाण पळून जातात)

**पेशवे**—(बाबा जवळ येऊन) कसें काय बुवा?

**बाबा**—(जखम बांधीत) जखम फार जबर नाहीं; आतां शुद्धीवर येतील.

**परशु**—मी शुद्धीवरच आहे, घाबरूं नको; पाणी मात्र दे. (इतक्यांत डावे बाजूकडून जासूद धांवत येतो)

**जासूद**—(रामराम करून) सरकार, मोगल मागे हटले.

**काशीराव**—व्हवा! कसें काय झालेंरे?

**जासूद**—सिंद्यांचा फिरंगी सरदार पेरन यानें त्ये पल्याडच्या टेकडीवर तोफा चढवून खूब मार दिला तवा इलिचपुरच्या नबाबाचा ल्योक पडला; आन् समदे मोगल मागे सराकले. (इतक्यांत उजव्या बाजूकडून दुसरा जासूद येतो)

**दु. जासूद**—(रामराम करून) महाराज, बोसल्यांच्या बाणांच्या तडाक्याला भिवून निजामअली पळाला.

**परशु**—(उमेदीनें उठून उभा राहून) शाबास. शाबास.

**पेशवे**—लढयी तर फारशी झाल्यासारिखी दिसत नाहीं

**परशु**—मोगल भित्रे बेटे; ते काय लढनात. बरें झालें, चला आतां आपणही त्यांच्या पठीस लागूं.

**पेशवे**—पण काळोख पडला; प्रथम चोहोंकडे मशाली पेटविण्याचे

हुकुम फिरवा.

परशु—आज्ञा, पण आतां माझी एक विनंती आहे.

पेशवे—ती काय?

परशु—सरकारानीं आतां तळावर जावें, लक्ष्मी आतां संपलीच. निजामाला मऊ आणण्याचें काम आतां माझें.

पेशवे—ठीक आहे; मीही तोच विचार करीत होतों.

परशु—बाबा, सरकारांबरोबर तेथपर्यंत जाऊन—मै, बरोबर एक पलटण घे.

बाबा—फार बरें आहे.

पेशवे—(पटवर्धनाला) जाऊं तर मग? फार तुह्मी तुटून आंगावर पडूं नका; आणि हैराण होऊं नका; युक्तीनें त्यानां नरम करा ह्मणजे झालें; आतां कांहीं उशीर लागणार नाहीं.

(सर्व निघून जातात)

**प्रवेश ४.**

पेशव्यांच्या डेऱ्यांतली त्यांची बसण्याची खोली

(परशुरामभाऊ व नाना प्रवेश करून वाट पाहात बसतात, इतक्यांत पेशवे प्रवेश करितात)

पेशवे—कां भाऊ काय वर्तमान, सांगा प्रथम?

परशु—सरकारानीं पाहिजे तसें आतां निजामाला लुटावें.

पेशवे—शाबास; इतक्यावर आलें! काय काय झालें सांगा तर.

परशु—आह्मी एक सारिखी त्यांची पाठ घेतली, ते रानोमाळ पळत सुटले. आंधारांत त्यांचे फार हाल झाले. निजाम-तर खरड्याच्या किल्ल्यांत जाऊन बचावला! त्याजबरोबर आदमासें दहाहजार लोक राहिले होते, ते किल्ल्याच्या सभों-

र्ती त्यानें ठेविले. मग आह्मी जाऊन त्या लोकांच्या सं-भोंवतीं मोर्चे उभेकरून तोफांचा मार जेव्हां सुरूंकेला, तेव्हां ते घाबरूनअंत पळाले. मग अंतून वकील आले.

पेशवे—मिजामाजवळ सव्वा लाखापैकी कायती दहा हजारच फौ-जें राहिली? बाकीचे—

परशु—बहुतेक पळाले? कांहीं मेले.

पेशवे—बरें, ते वकील काय ह्मणतात?

परशु-सरकार सांगतील त्यां प्रकारच्या तहाला कबूल आहों ह्मणतात.

पेशवे—मग आतां हें नानांचें कामं, मजकडे काय आहे?

नाना—काय काय मागण्याचें त्याचें मी टिपण केलें आहे! त्याला आपली संमती पडली ह्मणजे त्याप्रमाणें सांगून पाठवितों. (टिपण दाखवितो)

पेशवे—वाचा.

नाना—(वाचतो) मशीर उल्मुलुखास प्रथम आमचे स्वाधीन करावा.

पेशवे—ठीक, पुढें चालूंद्या.

नाना—आह्मी १८ लाखांचा मुलूख तुह्मांस दिला आहे तो परत द्यावा. दौलताबद किल्ला द्यावा. तीस कोट रुप-ये आमची बाकी, आणि आतांचा फौजेचा खर्च द्यावा. यां शिवाय भोसल्यांचे १९ लाख रुपये तुह्मांकडे येणें आ-हे; ती बाकी फेडून पुढें तीन लाख अठरा हजारांचा मुलू-ख घास दाण्याबद्दल त्यांस तोडून द्यावा. झालें.

पेशवे—ठीक आहे; चालूंद्या. मजकडून कांहीं हरकत नाहीं.

(सर्व निघून जातात)

---

## प्रवेश ५.

पेशव्यांच्या कचेरीचा डेरा.

(सर्व सरदार व मानकरी प्रवेश करितात)

**परशु**—(नानास) ही लढयी इतकी जलद अटपेल असें मला वाटलें नव्हतें.

**नाना**—नशीबानेंच ती लवकर अटपली.

**तुकोजी**—नशीबानें कां? तलवारीनें म्हना.

**रघूजी**—पैल्याच धडाक्याला तिला पिटविली, म्ह.

**दौलतराव**—ही लढयी पवाडे करून गान्यावानी झाली.

**तुकोजीआणिरघूजी**—होय, तर.

(पेशवे प्रवेश करितात आणि सर्व लोक उठतात)

**पेशवे**—(बसून) बसा सर्व; नाना, मशीर उल्मुलूख कोठें आहेत?

**नाना**—(हात जोडून) जवळच आहेत. बोलावणें गेलें आहे.

**पेशवे**—त्यांची बर्दास्त चांगली ठेविली आहेना?

**परशु**—त्यांत कधीं कमती होणार नाहीं. त्यांच्याच कडून पैसा घेऊन त्यांची बर्दास्त राखण्याला आमचे काय गेलें?

**नाना**—पण त्यांचा पैसा आमच्या हातीं आल्यानंतर तो आमचा झाला.

(इतक्यांत मशीर उल्मुलूख प्रवेश करितो; आणि पेशवे उठून पुढें जाऊन हात धरून त्याला जवळ बसवून घेतात)

**पेशवे**—वजीर साहेब, तबीयत कैशी हाय्?

**मशीर**—(हात जोडून) अच्छी हय, सरकार.

**नाना**—वजीर साहेब, आखेरकूं ये तंटेका निकाल आपे किया. आपे दिलदारीसे पेशवे सर्कारके तात्रेमें आयाबराबर सब तंटा खलास होगया.

**मशीर**—नानासाहेब, हमनें ये टंटा सुरू किया. और पिछे उसका निकाल दुसरा कोन करेगा? (पेशव्यांकडे पाहून हात जोडून) सरकार, हमनें बहूत तकशीर किया; सर्कारकूं और नानासाहेबकूं हमनें बहूत मगरूरी बतायी; और दर्बारमें बैठके बेअदबीका बात बोला. माफी होना खाविंद.

**नाना**—(पेशवे कांहीं बोलत नाहींत असें पाहून) वजीरसाहेब, आपकी कुच तकशीर नै; और वो हमारे ध्यानमेंबी नै. आपकी और हमारी दोस्ती बहून दिनकी पीछे जो माफक चलतीथी, ओयी माफक आगेबी चलना, एत्ता हम मंगता.

**मशीर**—नानासाहेब, हंम बहृत लाचार हाय; जबाब देनेकूं सकता नै.

**तुकोजी**—(हलकेंच) आत्तां कसला जबाब देतोय्?

**परशु**—(हलकेंच) त्याचा जवाब पाहिजे कशाला तो?

**दौलत**—(हलकेंच) त्यांड बगा, कस खेटरानीं मारल्यावानी केलय्.

**नाना**—(पेशव्यांचें तोंड उतरलेलें पाहून) सर्व लोक इतक्या आनंदांत असून सरकार कांहींच बोलत नाहींत, याचें कारण काय असावें?

**पेशवे**—(किंचित् हांसून) नाना, काय सांगू! मला मोठा चमत्कार वाटतो. मोगलांनीं भित्रेपणानें आपली येवढी अमर्यादा करून घेतली; निजामअली रणांत उभा राहून

लढतातर त्याचे लोक पळते काय! लढयीला आरंभ झाला ? झाला इतक्यांत त्यानें आपणच पळ काढिला; मग लाखो धैर्यवान् आणि जीवावर उदार होऊन भांडणारे लोक असूनही बिचारे पळूं लागले; काय करितील! पण त्यांस आपण पळविलें, आणि आपल्या भुज बळानें आजची लढयी जिंकिली, असें समजून आमचे लोक वृथा अभिमान किती बळिगतात पाहा. यांच्या समोर शत्रु पळाला येवढें खरें; पण यांनीं पळविला नाहीं; तोच अविवेकानें भिऊन पळाला; याजकरितां आमच्या लोकांची खोटी बढयी आणि निजामाचा नामर्दपणा पाहून माझ्या मनाला फार वाईट वाटतें.

(सर्व लोक स्तब्ध बसतात)

**नाना**—(नाच, विडा, अत्तर गुलाब वगैरे समारंभ झाल्यानंतर पेशव्यांकडे पाहून हात जोडून) आतां कधीं कूच करण्याचा बेत करावा?

**पेशवे**—येथें काय आतां आपलें काम राहिलें? उद्यांच कां नाहीं निघूं?

**परशु**—उद्यां मेजवानीचा समारंभ आहे; आणि—

**पेशवे**—बरें तर परवां (असें मध्येंच घाईनें बोलून उठतात)

(कचेरी बरखास्त होते)

# अंक पांचवा.

## पात्रें.

सवाईमाधवराव पेशवे.... .... .... .... .... ......पुण्याचे राजे.

यशोदाबाई.... .. .. .... .... .... .... .... .... ....त्यांची स्त्री.

आप्पाशास्त्री.... .. .. ...; .. . .... .... .... ....न्यायाधीश.

बाबुराव फडके, दौलतराव सिंदे, तुकोजी होळकर .. ....सरदार.

नाना फडणीस ....... .... .... .... ... ... .... ....प्रधान.

गणपतराव. .. .... .... .... .... .... .... ....त्याचा कारकून.

गोविंदराव पिंगळे.... .... .... .. . .... ....दुसरा एक कारकून.

रामचंद्र जोशी.... .... .... .... .... .... ....पेशव्यांचा वैद्य.

महंमद मिया.... .... .... .... .... .... .. . .... ....शस्त्र वैद्य.

सावजी, विठू, गोविंदा.... ..शनिवार वाड्यांतल्या बागेंतले माळी.

शिवरामसिंग.... .... .... .... .... .. .गार्दीलोकांचा सरदार.

स्थळ पुणें.

## प्रवेश १.

नानाच्या कचेरींतली एक खोली.

(गणपतराव आणि गोविंदराव पिंगळे प्रवेश करितात)

**गोविं**—फडनीस आतां आले होते नाहीं हो?

**गण**—होय, आले होते.

**गोविं**—मग इतक्यांत कोणी कडे गेले?

**गण**—श्रीमंतांकडे गेले आहेत वाटतें.

**गोविं**—मोठ्या रागानें गेले असतील तर.

**गण**—तसा रंग दिसला खरा.

**गोविं**—मग संभाळाहो; (चोहोंकडे कोणी नाहीं असें पाहून) तुमच्या यजमानांला लवकरच आतां वेड लागणार मला वाटतें.

**गण**—तुह्मांसारिख्या दाहा पांचांला वेड लावतील.

**गोविं**—होय, तें खरें; निदान तुह्मांला तरी लावतीलच; कारण तुह्मांवर त्यांची फार मेहेर्बानी आहे. "अव्यवस्थित चित्तानां प्रसादोपिभयंकरः"

**गण**—कां बरें, असें कां ह्मणतां? असें ह्मणायाजोगें फडणीसांनीं काय केलें आहे?

**गोविं**—मग कायतर; बळवंतराव नागनाथावर किती मर्जी, किती विश्वास, त्याची किती प्रशंसा; शेवटीं एका क्षणांत त्याच्या पायांत सवा मणाच्या बेड्या ठोकून बिच्याऱ्याला माहेर घर दाखविलें.

**गण**—हें मात्र लोकांच्या मनात राहिलें; पण त्याची लुच्चेगिरी

कोणी पाहात नाहीं.

**गोविं**—त्यानें काय लुच्चे गिरी केली ! कांहीं दंगा, बखेडा, बंड, फितुरी, खून, कांहीं तरी !

**गण**—ही फितुरी नव्हे तर काय मग ? मोठा विश्वासू मनुष्य ह्मणून दादासाहेबांच्या चिरंजीवांच्या बंदोबस्ताकडे त्याची नेमणूक केली. आणि त्याच्याच द्वारें श्रीमंतांचीं आणि बाजीरावाचीं पत्रें चालूं लागलीं. केवढा विश्वासघात हा !

**गोविं**—हा तुह्मांस विश्वासघात वाटला, नाहीं ? कारण तुमच्या यजमानांस तसा वाटला ह्मणून. येरवीं यांत कांहीं अर्थ नाहीं.

**गण**—मला तुमचा मोठा चमत्कार वाटतो. जी गोष्ट कधीं घडूनये ह्मणून फडनीस रात्रंदिवस जपतात. ती बळवंत रावानें घडूं दिली ; इतकेंच नव्हे, आपण स्वतः त्यानें पत्रें चालवून श्रीमंतांचा आणि बाजीरावाचा स्नेह करून दिला. हा तुमच्या मतें कांहींच अपराध नव्हे ?

**गोविं**—हा मोठा अपराध बुवा, खचीत ! आणि फडणीसां सारिख्या मुत्सद्याला हा येवढा मोठा अपराध वाटला, "अयं विशेषः". कोत्या नजरेचे बेटे तुह्मी आपलपोटे ; पोक्तपणा कमी.

**गण**—तुह्मांस लोक विक्षिप्त ह्मणतात तें खोटें नव्हे तर मग.

**गोविं**—तुह्मी मला शिव्या सुद्धां द्याल, यांत कांहीं नवल नाहीं. पण बाजीराव व त्याचे बंधु यांशीं इतका द्वेष आतां कां ? याचें कारण मला सांगा बरें.

**गण**—हें बोलणें पुरे करा आतां फडणीस इतक्यांत येतील.

**गोविं**—ते कसचे इतक्यांत येतात! बहुत करून येणारच नाहींत. पण कोण आहेरे बाहेर, रखमाजी.

**रख**—जी, (आंत येतो)

**गोविं**—अरे समोरच राहा जा; फडणीस इकडे येतानां दुरून पाहिलेंस ह्मणजे आह्मांला कळव.

**रख**—जी व्हय् (जातो)

**गण**—बरें तर मग, चालूंद्या तुमचें तरी ह्मणणें काय आहे ऐकूंद्या खरें. काय ह्मणतां, बाजीरावाशीं द्वेष करूंनये?

**गोविं**—होय, करूंनये; त्याला स्नेहानें वागवावें; त्यांतच आपला फायदा आहे.

**गण**—तो कसा?

**गोविं**—ऐका; दादासाहेब आणि त्यांचें कुटुंब हीं उभयतां फार वाईट मनुष्यें होतीं; तीं होतीं तोंपर्यंत त्यांस व त्यांच्या मुलें त्यांच्या चिरंजिवांस अटकेंत ठेविलें तें ठीकच होतें. पण-तीं दोघीं आतां जीवंत नाहींत. त्यांचे मुलगे तिघेही चांगले समजूतदार आहेत. त्यांस आपण अमक्यांचे पोटचे ह्मणविण्याला मोठी लाज वाटते, आणि हें ते लोकांत उघड बोलून दाखवितात. इतकेंच नव्हे, तर कशीतरी श्रीमंतांची मर्जी संपादन करून आपण मोकळे राहिलों ह्मणजे मोठें मिळविलें असें ते समजतात, आणि त्याप्रमाणें झटून प्रयत्न करितात. याशिवाय त्यांच्या इच्छेप्रमाणें श्रीमंतांचेंही मन त्यांच्याकडे वळलें आहे हें लक्षांत आणा. असें आसतां फक्त त्यांच्या वडिलांचा द्वेष मनांत आणून त्याच्या जिवाला उगाच नाम

केल्यापासून व त्यांच्या आणि श्रीमंतांच्या मध्यें पुनः वैमनस्य उत्पन्न करण्याच्या खटपटींत अशीं अनर्थाचीं कृत्यें केल्यापासून काय परिणाम होणार आहे तो पाहा. कांहीं झालें तरी ते सर्व एका कुटुंबांतले आहेत. आणि एकमेकांवर ममता करितात. तेव्हां फडणीसांच्या खटपटीनें त्यांची जूट न मोडतां उलट जास्ती बळकट होण्याचाच संभव फार आहे. असें झालें ह्मणजे फडणीसानीं विनाकारण आपलाच जीव धोक्यांत घातल्याप्रमाणें नव्हें काय!

**गण**—तर त्या त्रिवर्ग बंधूंस मोकळें ठेवून त्यांचें आणि श्रीमंतांचें पाहिजे तितकें रहस्य चालूं द्यावें असें तुमचें ह्मणणें. पण युक्तीयुक्तीनें गोडी दाखवून त्यानीं एकदम् दंगा उसळला तर!

**गोविं**—हा वेडेपणाचा संशय; हा संभव फार कमी. आपली न्यूनता त्यांच्या लक्षांत चांगली वागये, त्यांस मोठे सरदार किंवा मसलती लोक कोणी अनुकूल नाहींत, आणि श्रीमंतांच्या मर्जीप्रमाणें चालण्यापासून त्यांची मान मरतब यथास्थित चालण्यास कांहीं हरकत नाहीं. असें असून पुनः आपल्या वडिलाचाच मार्ग धरण्यांत त्यांस कांहीं फायदा दिसेल असें मला वाटत नाहीं. इतकेंही असून त्यांनीं तसाप्रसंग आणिलाच तर मग ते स्वतः अपराधी झाले; त्यांस पकडा, आणि पाहिजे तशी शिक्षा द्या. येवढा मोठा राज्यकारभार चालवितां, कमलाही शत्रु समोर आला तरी मागें हाटत नाहीं: अशा बाहादरानें यःकश्चित्, निराश्रित, आणि निर्दोषी अशा तिघां पोरांनां भ्यावें! काय चमत्कार हा! इतकें कशाला! श्रीमंतांसच एकादा बंधु असता तर

कसें केलें असतें? त्याला ही कैदेंत ठेविलें असतें? आ-
णि असा उपद्रव केला असता?

गण—तुमचे विचार मोठे विलक्षण आणि (इतक्यांत रखमाजी
येतो, त्यलापाहून ) कारे?

रख—दादा, फंनीस आले; अपनांस बुलावत्यातीं.

(सर्व निघून जातात)

---

## प्रवेश २.

पेशव्यांची बसण्याची खोली.

पेशवे—(प्रवेश करून कांहींवेळ विचार करीत बसल्या नंतर सुस-
कारा टाकून) हं, हा थेरडा पुनः बळावला अं; काय चिंताआ-
हे! (मनांत) माझीं पत्रें बळवंतरावाजवळ सांपडलीं ह्मणून
त्या गरिबाला यानें कैदकेलें. बाजीरावाशीं माझा आगदी-
च स्नेह नसावा, माझे कोणी जिवाळ्याचे स्नेही नसावे, आणि
मी याच्या हुकुमांत वागावें, असें या मतलबी कारभाऱ्याच्या
मनांतून. महादजीच्या वेळेसही यानें असेंच केलें. पण तो
याचा बाप होता. ह्मणून बचाजी लागलाच मऊ आला,
आणि मजजवळ येऊन बायकांप्रमाणें रडूं लागला. आ-
तां पण हा मला सुखानें राहूं देणार नाहीं. (इतक्यांत ना-
ना प्रवेश करितो).

नाना—(क्षणभर उभाराहून पेशवे आपणाकडे पाहात नाहींत
असें पाहून) काय? कोणीकडे ध्यान लागलें आहे?

पेशवे—(दचकून कांहींसे गोंधळल्यासारिखे होऊन) या नाना,
कांहीं नाहीं, उगाच बसलों होतों.

(दोघेही क्षणभर स्तब्ध बसल्या नंतर)

**पेशवे**—(कर्कशपणें) मग त्या बळवंतरावाला काय केलें?

**नाना**—(ठासून) आणखी माझ्या तोंडातून ऐकण्याची मर्जी असलीतर सांगतों. पायांत बिड्या घालून त्याला जबरदस्त कैदेंत ठेविलें आहे; आणि उद्यांच सिंहगडावर पाठवितों.

**पेशवे**—(कांहीं क्रोधमुद्रेनें) काय या बोलण्यांत अर्थ आहे? असें आहे तर मीहि तुमच्या प्रमाणेंच साफ सांगतों कीं बळवंतरावाला आतां या घटकेस मोकळा केला पाहिजे; नाहीं तर वाईट परिणाम होईल. मजवर तुह्मी इतका अंमल चालविण्याचें कांहीं कारण नाहीं.

**नाना**—(रागानें) ती गोष्ट विसरा आतां. माझ्या सांगण्याप्रमाणेंच तुह्मी वागलें पाहिजे; आणि तसें वागणें आहे कीं नाहीं येवढेंच विचारतों. सगळा पोरखेळ चालविला आहे, नाहीं?

**पेशवे**—(धिक्कारून व्यंगोक्तीनें) आतां असलें बोलणें येऊंलागलें काय? मागें महादजी असतानां बोलणें फार वेगळ्या तऱ्हेचें होतें.

**नाना**—त्याचेंच आतां हें फळ भोगिलें पाहिजे.

**पेशवे**—(आवेशानें) पण तुह्मी कोण? तुह्मांस इतका अधिकार कोणी दिला? तुह्मी नसलांतर काय झालें असतें?

**नाना**—(क्रोधयुक्त छद्मानें) मी कोण, हें सांगणारे असते तर त्यांनीं सांगितलें असतें. मी नसतों तर हा माधवराव पेशव्यांच्या गादीचा मालक झाला नसता. कोणीकडे भीक मागत गेला असता कोण जाणे.

**पेशवे**—(पराकाष्टेच्या संतापानें डोळेलाल करून) फार बडबडूं नको

नको थेरडूमा, येथेंच तुकडे पाडीन. कोणरे तो आहे!
(कोणी जबाब देतनाहीं) (नाना उठून खोलीच्या दाराशीं
जाऊन शिवरामशिंग, ह्मणून मोठ्यानें हाकमारितो. आणि
शिवरामशिंग धांवत येऊन त्याच्या समोर उभा राहातो)

**शिवरा**—काय हुकुम हाय्?

**नाना**—तुमचे लोक कोठें आहेत सगळे?

**शिवरा**—समदे हाजर हायत सर्कार.

**नाना**—येथें हाजर राहून तुह्मी फार हुषारीनें पाहारा केला पाहिजे. बाहेरचा मनुष्य कोणी आंत फिरकूं देतां नये कामां. समजलें?

**शिवरा**—जी सर्कार हुकुम. पन् माजी एक यिनंती हाय्, जरीं भायिर यावे.

(दोघे निघून जातात)

**पेशवे**—भ्रांत होऊन बराच वेळ बसल्यानंतर स्मृतीवर येऊन मनात) हें सगळे स्वप्न तरी नसेलनां! (डोळे चोळून चोहोंकडे पाहातात, आणि बाहेर जाऊन आपले खासगीचे हुजरे कोणी नाहींत असें पाहून आंत परत येतात; मग निराश होऊन वर पाहात तक्यावर पडून मनांत) छे, छे, स्वप्न कोठचें! मी भ्रांत झालों; माझी आकल गुंग झाली. माझ्या डोळ्यांपुढें प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टीला मी स्वप्न ह्मणून संशय घेतों. या लुच्यानें पूर्वीच सगळी तयारी करून ठेविली होती; माझे लोक सगळे काढून टाकिले; आपला पाहारा माझ्या सभोंवतीं बसविला. हा माझा अपमान करण्याकरितांच मुद्दाम येथें आला होता. हर, हर, माझी योग्यता

हेंच काय? यानं करून बसविलेली बाहुली! लाहानपणीं मी ऐकिलेल्या सगळ्या गोष्टी खऱ्याच! पेशव्यांचा मी कोणी नव्हे! कदाचित् याच्या बोलण्याचा भाव तसा नसेल. पण आतां जगावें कशाकरितां? माझी आब्रू काय राहिली? माझे कोण आहेत? आतां काय आशा राहिली? (अश्रुढाळून) परमेश्वरा, असा प्राणी कशाला निर्माण केला? हा खोटा आणि गुलामगिरीचा राज्याधिकार कोणी मागीतला होता? याचेक्षां गरीब ब्राह्मण होऊन खरोखरी भीकच मागत कोठें तरी राहिलों असतों तर तें फार सुखाचें झालें नसतें काय? बरें, असो, कांहीं झालें तरी चिंता नाहीं. मी या कोल्याच्या हातीं कधीं वागणार नाहीं; प्राण गेला तरी बेहेत्तर आहे. मी कोण आहे या विषयीं त्याची पक्की खात्री करीन; नाहीं तर आजच माझें जिणें सरलें. हा शिवरामशिंग कोण, आणि त्याचे लोक किती दिवाणखान्यांत जमले आहेत तें तरी पाहूं या. (उठून जातात.)

---

## प्रवेश तिसरा.

पेशव्याची निजण्याची खोली.

(पेशवे बिछान्यावर पडले आहेत आणि जवळ त्यांची पत्नी यशोदाबाई बसली आहे)

**यशो**—(पेशव्याच्या तोंडाकडे निरखून पाहात मनांत म्हणते) बाई, हे दुखणें तरी कसलें म्हणावें? दिसण्याला कांहीं दुखणें नाहीं; पण अन्न तटत चाललें, आणि तोंडावर पंडूरकी येऊं लागली. मनांत माते, जगदंबे, कोल्हा-

पुरची माहालक्षुमी, यांतून कधीं पार पाडशील? आज पासून आठ दिवसांत बरें करशील तर मी तुझ्या दर्शनास येऊन हजार दंपत्यांचें भोजन करवीन, आणि तुला लो-टांगण घालीन. काय तरी करूं आतां? मला कोठें गेलें तरी कांहीं केलें तरी चैन पडेना. जवळ येऊन ब-सल्यें तर किती बोलावें, किती हसावें, किती मस्करी करा-वी; तें कांहीं राहिलें नाहीं; आतां रडणें माझ्या कपाळीं आलें. (फुंदून रडूं लागत्ये)

**पेशवे**—(तिच्या अनवटीस हात लावून) कां? रडें कां केसळलें? मी फार वेळ बोललों नाहीं ह्मणून?

**यशो**—होय, नाहीं कां तर? मी कोणाशीं बोलावें? काय आशेनें जीव धरावा? जिकडे पाहावें तिकडे मला उदा-स वाटतें.

**पेशवे**—(उदास हा शब्द ऐकण्या बरोबर पूर्वीची प्रीतिमुद्रा फि-रवून उदास वृत्तीनें) हा सगळा मनाचा खेळ आहे. आजपर्यंत आपण लाडी गोडीनें राहात होतों ह्मणून तुझ्या मनाला आतां उदास वाटूं लागलें. एकदां असेंच राहा-ण्याची संवय पडली ह्मणजे मग कांहीं वाटणार नाहीं. किती जरी ममतेनें राहिलों तरी आपण वेग वेगळे प्राणी आहों, आणि दोघींही कधीं ना कधीं तरी मरणारच; पण एकदांच मरूं असाही कांहीं निश्चय नाहीं. याजकरितां माझ्या वांचूनच या जगांत काळ काढण्याची संवय केली पाहिजे.

**यशो**—(धैर्य खचून खेदयुक्त विस्मयानें) अगाई, असें बोलणें काय हें! आतां काय झालें? इतका कंटाळा कां?

**पेशवे**—कंटाळा नव्हे; मी खरी गोष्ट सांगतो. (तिचा हात धरून) तुझा हात फारच गार लागतो. धैर्य सोडूं नको. मनुष्यानें आपण कोण व आपला शेवट कसा होणार हें सर्वदा लक्षांत वागविलें पाहिजे. हा प्रपंच सर्व खोटा मोहपाश आहे. यांत आगदीं गढून जाऊंनये. कोणत्या घटकेस हा देह नाहींसा होईल याचा नेम नाहीं, आणि बोलावणें येईल त्या क्षणीं तयार असलें पाहिजे.

(इतक्यांत रामचंद्र जोशी वैद्य येतो आणि यशोदाबाई उठून एकीकडे उभी राहाते)

**पेशवे**—या जोशीबुवा. (उठून बसून जवळ जागा घेतात)

**राम**—आपण कशाला उठून बसलां? बरें, हात पाहूं. (नाडी व जीभ परीक्षा करून पाहातो)

**पेशवे**—जोशीबुवा, खरें सांगा, माझ्या आंगांत काय दुखणें आहे ह्मणून आपण निदान केलें, आणि कशावर औषध देतां?

**राम**—मलाही या दुखण्याचा मोठा विचार पडला आहे. नाडी पराकष्टेची तीव्र झाली आहे, अन्नावर वासना नाहीं, आणि केव्हां केव्हां बुद्धीला भ्रंश होतो, इतकीं कायतीं व्याधीचीं लक्षणें; दुसरें तिसरें कांहीं नाहीं. यावरून पित्त प्रकोप होऊन एके प्रकाच्या त्रिदोषाचा संधि असावा असें आरंभीं अनुमान करून त्याच्या परीक्षार्थ औषधाची योजना केली. परंतु आतां तें दुखणें नव्हें अशी माझी पुरी खात्री झाली.

**पेशवे**—माझी नाडी आणि जीभ कशाला उगीच परीक्षा करून पाहातां? मला नाहीं कां समजत? माझ्या अंगांत

काहीं दुखणें नाहीं.

राम—नाहीं कसें ? व्यथेवांचून अशी स्थिती कधीं होणार नाहीं. कांहीं मनस्तापाची व्यथा असावी असा माझा तर्क होतो.

यशो—मग त्याला काय आपण उपाय योजणार ?

पेशवे—मला कोणत्याही तपाची व्यथा नाहीं, आणि कसलाही उपाय नको. मी आपोआप बरा होईन. नाहीं झालों तर (दांत चावून मोठ्या आवेशानें) मान कापीन.

यशो—पाहिलें ! पाहिलें ! (हलकेंच) अशा बरळण्याला काय करावेंगे बाई आतां ? (रडूं लागते)

राम—(यशोदाबाईस) आपण स्वस्थ राहावें, कांहीं काळजी करूं-नये. (पेशव्यांस) आपण जरा गच्चीवर इकडे तिकडे हिंडूं चला, मला जरा बोलायाचें आहे.

पेशवे—चला जाऊं. मलाही कंटाळा आला आहे.

(सर्व निघून जातात)

---

## प्रवेश ४.

बाराद्वारांच्या बंगल्याभोंवताच्या बागेतला एक प्रदेश.

(गोपाळा, विठू आणि सावजीमाळी प्रवेश करितात)

साव—गोपाळा, ऊठ, ऊठ; तंबाकू घाल जरा; येळ जाला, मोट जुपू चला.

गोपा—व्हय् मामा, उठतों. (आळसानें आंग मोडून जांभयी देत) पन ही बकुळीची मावली लै गार हाय् न्हाय, मामा ?

**विठू**—न्हय्, लै गार हाय; आन् आमचं गोपाळ बाळ लै झो-पेलां आलय. काय करील बिचारा; काल रातभर झोप न्हाय्.

**साव**—कारे झोप का न्हाय्! कायी शिकार बिकार आडळली वती?

**विठू**—व्हय्; शिकार होती; पन ह्येचिच शिकार होन्याचा वक-त आला वता.

**गोपा**--(चिलमींत तंबाकू भरीत) ह्यो लुच्चा हाय् मामा; ह्येच काय ऐक्ता!—पन थापी लै कोर्डी झालीया; पानी न्हाय्.

**सावजी**—(जवळच्या कारंजाकडे बोट दाखवून) त्ये कारंजाच्या हौदांत जरा पानी असेल बग; बुडवून आन्.

(गोपाळा हातांत थापी घेऊन जातो)

**सावजी**—(विठूला हलकेंच) कायरे, कसली काय शिकार हुती मला सांग तरी सांग.

**विठु**—ह्यो ज्येच्या घरात न्हातो की न्हाय, त्येचीच बायको.

**सावजी**—यिसु कोकन्याची बायको साजी ती! अरे गुलामा, काय लबाड हायरे हा! वरून तर भागवानी त्येच्याशीं दोस्तीनें वागतो.

(गोपाळा परत धांवत येतो.)

**गोपा**—(हलकेंच) पल्याड कुटं तरी तमाकू वोडू चला; (कारं-जाजवळच्या भिंतीच्यावर हात दाखवून) गच्चीवर शिर्मंत बुवं हायित्; हितं नको.

(तिघेही बसल्या ठिकाणींच वांकून पाहातात)

**सावजी**—व्हय, हायत्; पन आमी कायी त्येस्नी दिसत न्हाय.

यिकडं फिरून बसूंया मंजी जालें.

(तिघेही कारंजाकडे पाठ करून बसतात)

**सावजी**—(चकमक झाडून विस्तु पेटवीत) कायरे गोपाळ्या, हा यिटू काय सांगतो? तू लै कहार वुडवून दिला ह्मंतो!

**गोपा**—ह्यो सोदा हाय्, आपुन कर्तो त्ये कुटं सांगतोय्.

**सावजी**—मंजी त्येनं सांगितलेलें समदं खरंच तर!

**गोपा**—त्येचंबी खरंच हाय्.

**विटू**—माझं कायरे खरं? तुला काय ह्मायीत हाय्!

**गोपा**—आन् माजं तरी काय तुला ह्मायीत हाय्!

**विटू**—काल रातभर साजी निजते त्ये खोलीच्या माडीवर आंदारांत चोरावानीं दडून बसून फाटं कोनरे जीव घेऊन पळून आला?

**सावजी**—बग, कसं भायीर निगतं बग. (चिलीम ओढतो)

**गोपा**—(विटूला) समदं खोटं हाय्; तू लुच्चा हायस्.

(इतक्यांत त्यांच्या पाठीमागें कांहीं पडल्याप्रमाणें मोठयानें अवाज होतो, आणि कोणी मनुष्य आर्त स्वरानें किंकाळी फोडितें. पाठीमागें पाहातात)

**सावजी**—कायरे तिच्या भनं, कायी दिसत तर न्हाय्.

**गोपा**—(चोहोंकडे पाहून) भूत बीत तर नसेल नां?

**विटू**—व्हय्; कायीबी न्हाय्; याला काय ह्मनावं तर?

(तिघेही बसल्याच ठिकाणीं चोहोंकडे टकमक पाहातात; पण कांहीं दिसत नाहीं असें पाहून त्यांचे हात पाय गार होतात.)

**गोपा**—(जरा घाबरून) भुतच व्हय खररे बाबा; आनां काय

करावं!

**विठू**—कल्टच्या असलेला नारळ चकला.

**गोपा**—(अधिकच घाबरून) तर आतां आमी जगत न्हाय.

**सावजी**—(धैर्यानें) चल माकडा, बायकावानी नकरा तर किती करशील? असल्या भागूबाईला ती कोकनी रांड काय म्हन भळी कोन जानें! (हांसतो असें पाहून) तोंड काय वासतो हिजड्यावानी! (उभा राहून कारंजाकडे पाहून घाईनें) अरे दुठा घात झाला; वरून हौदांत कोनी पडलें.

(सर्व उभे राहून पुनः पाहातात, आणि हौदाकडे धांवत जातात. तेथें कांहीं अंतरावर उभे राहिल्यानंतर)

**विठू**—(विस्मयानें) कोनरे बाबा ह्यो?

**गोपा**—तोंड दिसत न्हाय.

**सावजी**—(जरा पुढें सरसावून हौदाच्या काठावर उभा राहून) हायरे, दुनिया बुडाला! (असें ह्मणून मोठयानें आरोळी ठोकतो, आणि दोन्हीं हात वर करून, तोंड पसरून, डोळे पांढरे करून चित्राप्रमाणें उभा राहातो)

**विठू आणि गोपाळा**—कायरे ह्यो शिपायी पिक्त्यामंदीच घाबरला! ह्येलाच भूत बडाबलंकी काय? (दोघेही पुढें सावजीच्या जवळ जातात आणि एकाएकी चकित होऊन उरावर हात हापटून त्याच्याच प्रमाणें उभे राहातात)

(अशा स्थितींत तिघेही बराच वेळ उभे राहिल्यानंतर)

**सावजी**—(शुद्धीवर येऊन मोठयानें) धांवारे धावा! घात झाला! श्रिमंत पडले! धनी गेला! जग बुडालें! धांवा!

धावा! (हौदांत उडी टाकितो: त्याच्या बरोबर विठू आणि गोपाळा उड्या टाकितात)

**विठू**—जीव हाय् काय बगावं मामा आदी.

(तिघेही पेशव्यांस उचलूं लागतात; शरीरांत कांहीं चेतना नाहीं असें पाहून)

**सावजी**—आतारे कसला जीव ऱ्हातो, या पुसांच्या उंचीवरून पडल्यानंतर?

**गोपा**—(पेशव्यांच्या मांडीकडे पाहून आणखी जास्त घाबरून) थांबारे थांबा, हालवूं नको; हे काय जालें बगा! मांडींतून कारंजाची नळी पार झाली! धोतर फाटलें! रगात किती आलेंय् बगा!

(इतक्यांत या तिघांचा गलबा ऐकून चोहोंकडून मनुष्यें धांवत येतात; एका क्षणांत वाडाभर पुकारा झाल्यामुळें हजारो मनुष्यें हौदासभोंवतीं जमून एकच हाहाकार होऊन जातो)

**रामचंद्र जोशी**—(माळ्यांस) चलारे तुम्ही वर या; आतां शिवूं नको. (ते वर आल्यानंतर आपण खालीं उतरून पेशव्यांची नाडी, छाती, डोळे वगैरे परीक्षा करून पाहून आनंदानें मोठ्यानें ओरडतो) भिऊं नकाहो, भिऊं नका! जीव आहे! भिऊं नका!

**महंमदामियां**—(धांवून येण्याबरोबर हौदांत उडी टाकून) क्यों, वैद माहराज, ज्यान् हाय नै!

**राम**—ज्यान हाय्; लेकिन् वो देखो (पेशव्यांच्या मांडीकडे दाखवून) नळी पार हो गयी हय्. (गणपतरावास) पाणी आणवा पाणी, जलद.

**महंम**—(पाहून) कुच फिकीर करो मत. (असें ह्मणून) (आपल्या आंगावरचा शेला फाडून दाहा पांच तुकडे काढतो. मग चार असामी खालीं बोलावून पेशव्यांस हलकेंच उचलायला सांगतो. व आपण सरदिशी एकदम मांडींतून नळी ओढून काढितो, आणि जखमेच्या दोहों तोंडांवर आपले दोनही हात बळकट दाबून धरून पेशव्यांस वर उचलून आणवितो. मग) चेला, इधर आव्, मोलमका डबा निकालो.

**चेला**—जी साहेब हाजर हाय्. (डबा उघडतो)

**महंम**—(आपल्या काखेंत धरिलेलीं फडकीं दाखवून) ये देखो, ये चिंधियां लेव्, और दोबूच् बनाकर उनकूं मोलम लगाव्; और दुसरे दो छोटे चिंधियांकूं मोलम लगा कर रखो. (चेल्यानें त्याप्रमाणें केल्यानंतर महंमदमियां आपला एकेक हात काढून जखमेच्या दोहों तोंडांत एकेक बोळा बसवून; एकेक तोंडावर एकेक पट्टी बसविल्यानंतर मांडी फडक्यानें आवळून बांधितो)

**राम**—हो गया नै? मुझे पानी डालकर शांर जरा थंडा करनें बराबर स्वासबी जलनें लगा.

**नाना**—आंगावर स्मृति आलीका? जोशी बावा?

**राम**—अद्यापि नाहीं; परंतु आतां लवकरच येईल.

**महंम**—कुचबी होता नै डरो मत. ये पट्टी दोघडी ऐसी रहने देव्; पिछे हम् दूसरे हिकमत करेंगा.

**नाना**—तर मग आतां आंत घेऊन चला. मेणा आणारे.

(सर्व निघून जातात)

## प्रवेश ५.

### पेशव्यांची निजण्याची खोली.

(पेशवे मरणोन्मुख होऊन बिछान्यावर पडले आहेत, व त्यांच्याजवळ उशाशीं लागून बाबूराव फडके, आप्पाशास्त्री, रामचंद्र वैद्य, नाना फडणीस बसले आहेत; कांहीं अंतरावर परशुरामभाऊ, तुकोजी, दौलतराव वगैरे कांहीं मुत्सद्दी लोक बसले आहेत. यशोदाबाई उशागतीं कांहीं अंतरावर एक सारिखी रडत दासींच्या आंगावर लोळती आहे, आणि सर्वांच्या मुद्रा पराकाष्ठेच्या दीन झाल्या आहेत)

**अप्पा**—इतक्यांत चलन वलन आगदी स्तब्ध झालें पाहा. श्वासोत्श्वास मात्र चालतो.

**बाबू**—झोंप लागली ह्मणावें कीं काय समजत नाहीं.

**राम**—(बाबूरावाच्या कानांत हलकेंच) तें कांहीं नाहीं. समाप्तीचें लक्षण हें. मात्रेच्या जोरानें श्वास चालतो.

**नाना**—जोशी बावा, नाडी तरी पाहा.

**राम**—(नाडी पाहून भीत भीत) फार क्षीण झाली आहे. आतां परमेश्वरावर भरंवसा.

(सर्व डोळ्यांला पाणी आणितात)

**पेशवे**—(झोंपेंतून जागे झाल्याप्रमाणें करून) आहा, हा, हा; (हलक्या व अशक्त स्वरानें) नारायणा, किती यातना सोसूं! पुरे आतां, मुक्त कर या पाप्याला. (डोळे झांकूनच) जवळ कोण आहे? बाबूराव?

**बाबू**—(रडत) सरकार, जवळच आहे; आज्ञा व्हावी.

**पेशवे**—तुह्मी मा—झे बा——ळ——मै————त————र.

बाबू.—(गादीवरून) होय, आणि या चरणांचा एक निष्ठ सेवक. सरकारांच्या मनांत कांहीं हेतु असला तर तो बिनघोर कळवावा. तो शेवटास नेण्याकरितां माझा जीव देण्यास मी सिद्ध आहे.

पेशवे—भ—रं—व—सा!

बाबू.—हा मी माझ्या धन्याच्या पायावर हात मारितों (तसे करून); हें माझें वचन पार न पाडीन तर मी हरीपंत फडक्याच्या वीर्याचा नव्हे.

पेशवे—बाजी—रा—वा—ला गा—दी—व—र ब—स—वा.

(हें ऐकण्याबरोबर नानाच्या उरांत धडकी भरते, आणि सर्व लोक चकित होऊन एकमेकाच्या तोंडाकडे व नानाच्या तोंडाकडे पाहूं लागतात).

बाबू.—आज्ञा; सरकारची आज्ञा शिरसामान्य आहे; हा विडा उचलिला; कांहीं झालें तरी चिंता नाहीं.

दौलतराव आणि तुकोजी—(हात जोडून) धनी, हामीबी दोगं चाकर चर्नापासी हाजर हांऊं; (आवेशानें) आन ह्ये कामांत बाबूरावासंगं जीव द्याया हामीबी तयार हांऊं.

पेशवे—(आनंदाची मुद्रा दाखवून) शा—बा—स.

आपाशा—भले! बाणेदार सरदार खरा, पेशव्यांचा वंशज खरा, दृढ निश्चयी खरा! (नानाकडे वक्र दृष्टीनें पाहून)" विनायकं विकुर्वाणो रचयामास वानरं."

राम—(पेशव्यांकडे पाहून बाबुरावास हलकेंच) झालें; समाप्तीची वेळ जवळ आली.

बाबू.—(हलकेंच) आणखी एक वेळ मात्रा देऊन पाहातो:

आणखी चार शब्द बोलिले तर आजून त्यांच्या मनांत काय आहे तें तरी समजेल.

राम—नाहीं; आतां चालणार नाहीं; मात्रेचा गुण एकवार मात्र.

बापू—तर आतां आम्ही आशा सोडिलीच पाहिजे!

(पदरानें तोंड झांकून रडूं लागतो; तें पाहून सर्व लोकांस एक दम गहिंवर येतो)

पेशवे—यशो—ऑ—ऑ—ऑ———ना—रा—य——

अप्पा—झालें! समाप्ति झाली! आमचा जीवगेला! धनी गेला! राज्याचा स्तंभ गेला! हाय्रे परमेश्वरा! (मोठयानें रडूं लागतो, आणि चोहोंकडे एकच अकांत होतो)

यशो—(मोठयानें हंबरडा फोडून) अगे आई! काय माझें नशीब झालें! मी कशाला रांड जगल्ये! हा जीव पाहिजे कशाला! (दोन तीन वेळां धडा धड जमीनीला डोसकें हापटल्ये, आणि निश्चेतन होऊन पडल्ये)

बापूराव आणि रामचंद्रजोशी—अरे! रे! रे! रे! घात झाला! धरा! धरा! धरा! (धांवत तिच्याजवळ जातात) (सर्व लोक उठून तिच्याजवळ जाऊं पाहातात; पण अप्पाशास्त्री आणि नानाफडणीस जागच्या जागींच खिळल्याप्रमाणें बसून पापण्या न हालवितां तिच्याकडे पाहातात)

राम—(यशोदाबाईची नाडी पाहून खेदयुक्त विस्मयानें) काय चमत्कार! सारें विलक्षणच!

बापू—काय! पाणी आणवूं!

राम—आतां कशाला पाणी आणवितां! झालें! बाईनीं यजमानांचा मार्गच धरिला!

गाठिलें तर अग्नि धरणार सुद्धां कोणी नाहीं. अशा मनुष्याचा सहवास असा; आणि कर्में या प्रकारचीं. याचें कदापि कालत्रयीं कल्याण होणार नाहीं. (पाय हापटून) वंशक्षय होईल! या जन्मीं अपमान, अपकीर्ती, आणि दुर्निवार क्लेश यांत मरण येईल; आणि सप्तजन्म सप्त पूर्वज सहित नरक वास घडेल. अशा पंचमहापातक्याशीं आज पर्यंत मला संसर्ग घडला! तन्मूलक मलाही चांगलेंच प्रायश्चित्त योग्य आहे. याजकरितां या राज्याचें किंवा यांतील कोणत्याही मनुष्याचें नांव सुद्धां जेथें माझ्या कानीं कधींही येणार नाहीं, तेथें जाऊन भिक्षावृत्तीनें कालक्षेप करीन. (निघून जातो)

(पडदा पडतो)

---

**समाप्त**

अप्पाशास्त्री—(तें ऐकून परा काष्ठेच्या संतापानें लाल होऊन मुसमुसत उठून उभा राहून, धोतर खांद्यावर टाकून)... आटपलें; येथें पेशव्यांच्या राज्याची समाप्ति झाली! हें ब्राह्मणांचें राज्य नव्हें! ब्राह्मण राजा, ब्राह्मण मंत्री, ब्राह्मण सरदार! पण यांतल्या लोकांचीं कृत्यें? मांगांचीं! थेट मांगांचीं! चांडालांच्या घरींही अशीं दुष्कर्में घडत नसतील! एका मागून एक राजद्रोह!—पुत्र हत्या! अ म हत्या! स्त्रीहत्या! आणखी काय पाहिजे? भरपाई झाली नाहीं? (किंचित् राहून) आहाहा! माझ्या आंगावर रोमांच उभे राहातात! केवढा स्वार्थ बलवत्तर हा! शास्त्र सांगतें, "विषवृक्षोपिसंवर्ध्यस्वयंछेत्तुमसांप्रतं." पण येथें पाहा, लोक काय करितात. हे माधवराव पेशवे गर्भवासी होते, तेव्हांपासून ज्यांनीं यांचें केवल स्वपिंडाप्रमाणें संगोपन केलें, तेव्हांपासून राज्यपदावर यांचें नाव गाजविलें, आणि सर्व प्रकारें यांस ऊर्जित दशेस आणिलें, तेच स्वार्थसाधक नीच चांडाल आज यांच्या व यांच्या कुटुंबाच्या मरणास मूल झाले. आणि पाहा, इतका सर्व अनर्थ हा कशाकरितां? प्रजेच्या कल्याणाकरितां? नव्हे! परोपकाराकरितां? नव्हे! न्यायसंरणाकरितां? नव्हे! नव्हे! नव्हे! तर केवल [illegible] करितां. आपल्या सत्तेंत न्यूनता पडूं नये ह्मणून. आपला अधिकार चिरकाल चालावा ह्मणून. पण आपणास तरी मार्कंडेयाचें आयुष्य? निदान दाहा पांच वर्षें तरी जगण्याचा भरंवसा? नाहीं; तेंही नाहीं; पुढच्या घटकेस काय अवस्था होईल, याचा सुद्धां नियम नाहीं. फार तरी काय? दैवयोगानें आतांच मृत्यूनें